21-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

SGJ/ 11:00

21-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

SGJ/ D/ KTG/ 11:00

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**विरोधी पक्षाकडून देण्यात आलेल्या प्रस्तावा बाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून अधिवेशनामध्ये प्रस्ताव दिले जात असतात. अधिवेशनाच्या मागील आठवडयाचा तसेच या आठवडयाचाही प्रस्ताव चर्चेसाठी आलेला नाही. विरोधी पक्षाकडून अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयात अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेसाठी दिला जात असतो परंतु तो प्रस्ताव सुध्दा आलेला नाही. त्यामुळे विरोधी पक्षाचे तीन प्रस्ताव पेंडींग आहेत. दोन दिवसांनी अधिवेशन संपणार आहे. विदर्भातील सिंचनाचे प्रश्न, विजेचे प्रश्न असतांना विदर्भाच्या प्रश्नाच्या संदर्भातील एकाही प्रस्तावावर या अधिवेशनात चर्चा होऊ शकलेली नाही. जर विदर्भातील प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात प्रस्ताव आले नाही तर विदर्भात अधिवेशन होऊनही विदर्भातील प्रश्नांना न्याय मिळणार नाही. त्यामुळे उद्या प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर विरोधी पक्षाच्या प्रस्तावाला न्याय द्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात आपण लक्ष घातले तर विरोधी पक्षाचा प्रस्ताव चर्चेसाठी येऊ शकेल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, दोन दिवसापूर्वी मी विदर्भातील मेळघाटच्या संदर्भात नियम 289 च्या दोन प्रस्तावाच्या सूचना दिल्या होत्या त्यामुळे त्या प्रस्तावावर कमीत कमी सव्वा तासाची चर्चा होणे आवश्यक आहे.

**उप सभापती** : माननीय सभापती महोदयांनी, आपल्या 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचने संदर्भात एक तासाची चर्चा घेण्याचे मान्य केली आहे. ही चर्चा कधी घेतली जाईल यासंदर्भात मी आजच निर्णय देणार आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. या प्रस्तावामध्ये "रायगड जिल्हयातील समुद्र व खाडी किना-यालगत असलेल्या गावातील तसेच या परिसरातील भात पिकाखालील जमिनी खार भूमी बंधारे नसल्यामुळे तसेच या संबंधी असलेल्या योजनांची निगा व दुरुस्ती वेळीच होत नसल्याने या परिसरात खारे पाणी शिरुन जमिनीचे क्षेत्र मोठया प्रमाणात बाधित होणे, याबाबत शासनाने नाबार्ड योजनेअंतर्गत खार भूमी योजना मंजूर केलेल्या असणे, सदर योजनेअंतर्गत घ्यावयाच्या कामांसाठी मागविलेल्या निविदांमध्ये ठराविक ठेकेदारांचीच मक्तेदारी निर्माण झाल्याने जनतेत निर्माण झालेला असंतोष, या विषयावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" या विषयावर चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची सूचना सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी दोन मिनिटात नियम 289 अन्वयेच्या सूचनेवर आपले म्हणणे मांडावे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कोकणातील खार लँडच्या संदर्भात राज्य शासन अर्थसंकल्पात तरतूद करीत नसते. या विषयाच्या संदर्भात सभागृहात अनेक वेळा चर्चा झाल्यामुळे कोकणातील खार लँडच्या संदर्भात नाबार्डने 40 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु यासंदर्भात टेंडर्सचे फॉर्मच दिले जात नाही. खार लँडच्या कार्यालयाला टाळे लावले गेले आहे तसेच अधिका-यांनी आपले मोबाईल सुध्दा बंद करुन ठेवले आहेत. खार लँडची कामे शेतकरी जाळयाने करीत असतात. खार लँडचे जे अधिकार आहेत त्यांना समुद्राचे प्रवाह कसे राहतील, भरती-ओहटीमुळे किती नुकसान होईल याचे ज्ञान नसते. हे अधिकारी आमच्या शेतक-यांकडून माहिती घेऊन एस्टीमेट बनवत आहेत. खार लँडच्या संदर्भात जी कामे सुरु आहेत, ज्या कामांची टेंडर्स निघाली आहेत त्यांची सर्व प्रक्रिया थांबवून तेथील शेतक-यांना, जोळयांना काम मिळेल यासंदर्भातील कार्यवाही राज्य शासनाने करावी तसेच या विषयाच्या संदर्भात प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन कोकणाच्या संदर्भातील प्रश्नावर चर्चा सुरु करावी अशी विनंती मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचने अन्वये करीत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार मानतो. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. या प्रस्तावातील विषय कोकणातील शेतक-यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. समुद्राच्या पाण्याने कोकणातील लाखो हेक्टर जमीन नापीक होत आहे. खार लँडचा विषय महाराष्ट्र शासनाकडे आहे की, नाही असा प्रश्न निर्माण झालेला आहे. खार लँडला खाते आहे की, नाही, खार लँडची यंत्रणा आहे की, नाही याबत शासनाने पहिल्यांदा आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. खार लँडच्या संदर्भात शासनाकडे निधी नाही. परंतु आता खार लँडच्या संदर्भात जी काही कामे केली जात आहे त्या खार लँडच्या अधिका-यांना खार लँडचे ज्ञान नाही. खार लँडचे` ज्ञान नसलेल्या अधिका-यांना खार लँडचे काम करण्यासाठी बसवले जात आहे.

सभापती महोदय, मागील निवडणुकीच्या वेळी कोकणासाठी पॅकेज जाहीर करण्यात आले होते. परंतु कोकणाच्या पॅकेजसाठी शासनाने निधी न दिल्यामुळे कोकणाच्या जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत. कोकण पॅकेजचा पैसा दिला गेलेला नाही तसेच खार लँडचा पैसा सुध्दा कोकणाला दिला गेला नाही. परंतु खार लँडच्या संदर्भात आता जी काही कामे काढली जातात ती कामे मॅनेज करुन दिली जात आहेत. स्थानिक माणसांना खार लँडची कामे दिली तर चांगल्या प्रकारे खार लँडची कामे होऊ शकतील. खार लँडमध्ये आता मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे आता खार लँडच्या संदर्भात जी काही कामे सुरु आहेत त्या सर्व कामांची चौकशी व्हावी अशी माझी मागणी आहे. त्यामुळे खार लँडच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: लक्ष घालून कोकणावर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी मी विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेल्या नियम 289 अन्वयेच्या सूचनेन्वये प्रश्नोत्तराचा स्थगित करुन खार लँडच्या प्रश्नावर चर्चा सुरु करावी व या चर्चेला दोन तासाचा अवधी द्यावा अशी विनंती करतो.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. खार लँडचा विषय रायगड व कोकणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. खार लँड बंधा-याची कामे

श्री. संजय केळकर ...

होत नसल्यामुळे कोकणातील लाखो शेतकरी अडचणीत आले आहेत. खार जमीन विकास कार्यालय हे फिक्सींग कार्यालय आहे की, काय असा संशय जनतेमध्ये निर्माण झालेला आहे. खार लँडच्या संदर्भातील कामे रायगडमध्ये न जाता ठाणे शहरातील रेस्टहाऊस मध्ये, हॉटेल मध्ये बसून केली जात आहे. त्यामुळे खार लँडचे अधिकारी केवळ फिक्सींग करण्याचे काम करीत आहेत. खार लँडची कामे होत नसल्यामुळे रायगड जिल्हयाचे तसेच कोकणातील शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. शेतकऱ्याला जर अजून अधिक अडचणीत आणावयाचे नसेल तर खार लँडचे काम लवकर झाले पाहिजे. खार लँडच्या कामाच्या संदर्भात निधीची तरतूद झाली आहे परंतु फिक्सींगमुळे कामे होत नाहीत. त्यामुळे या प्रस्तावाच्या संदर्भात सभागृहात चर्चा घडवून आणावी तसेच खार लँडच्या टेंडर्समध्ये जे घोटाळे सुरु आहेत त्यांना ताबडतोब स्थगिती द्यावी अशी विनंती करतो.

धन्यवाद.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सनमाननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी आमच्या दृष्टीने महत्वाचा असलेला खार लँडचा प्रश्न नियम 289 अन्वये उपस्थित केल्यामुळे मी या प्रस्तावाच्या सूचनेला समर्थन देण्यासाठी उभा आहे. कोकणातील फळांचा विषय सोडल्यानंतर कोकणातील जनतेच्या दृष्टीने उदरनिर्वाहाचा एकमेव पर्याय हा भात शेती आहे. त्यामुळे ख-या अर्थाने खार लँडच्या संदर्भातील चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे. खार लँडसाठी आता पैसे उपलब्ध आहेत परंतु पैसे उपलब्ध असून सुध्दा कामे केली जात नाहीत, कामामध्ये कोण अडथळे आणतो,

यानंतर श्री. भारवि..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

झारीतील शुक्राचार्य कोण आहेत हे देखील स्पष्ट झाले पाहिजे. कोकणातील बंधाऱ्यांचे काम त्वरित सुरू व्हावे म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, ही चर्चा या सदनामध्ये घडून यावी आणि कोकणाच्या प्रश्नाला न्याय मिळावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रस्ताव मांडण्याचा अधिकार विरोधी पक्षाचा असतो. असे असताना सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी या प्रस्तावाला माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असताना समर्थन दिलेले आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव स्वीकारणे आपल्याला आवश्यक आहे. त्यासाठीच मी उभा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कोकणातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा, महत्त्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी मांडला आहे. कोकणाचे मुख्य पीक धान आहे. धानाबद्दल शेतकऱ्यांवर अन्याय होत असेल तर ते चुकीचे आहे. माझी माहिती अशी आहे की, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी सांगितल्याप्रमाणे तेथे फिक्सिंग सुरू आहे. 25 लाख रूपयांची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे एका गंभीर अशा विषयावर हा प्रस्ताव आणलेला आहे. त्यास सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी समर्थन दिलेले आहे. त्यामुळे यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी निवेदन केले पाहिजे किंवा येथे चर्चा सुरू करण्यास आपण आम्हाला संमती दिली पाहिजे, अशा प्रकारची मागणी मी येथे करतो.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हा महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे आपण चर्चेला वेळ दिला तर आमची चर्चा करण्याची कधीही तयारी आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज त्यांचा शेवटचा दिवस आहे. त्या ऑफिसला टाळे लागले आहे. अधिकारी मोबाईलवर देखील भेटत नाही.....

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सभागृहात चर्चा ही झालीच पाहिजे. चर्चा करण्याकरिताच आपण सभागृहात बसलो आहोत. परंतु, प्रश्नोत्तराचा तास हा देखील महत्त्वाचा असतो. त्यातून महाराष्ट्रातील जनतेला माहिती मिळते. तो स्थगित न करता इतर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**उप सभापती** : माननीय मुख्यमंत्र्यांचा सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचे म्हणणे समजण्यात थोडासा गैरसमज झाला असावा असे मला वाटत. त्यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा असे म्हटले नाही.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज शेवटचा दिवस आहे. त्या ऑफिसला टाळे लागले आहे. अधिकारी मोबाईलवर देखील भेटत नाही. मी सन्माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांना देखील काल भेटलो होतो. असे असताना ते अधिकारी मात्र भेटत नाही. करोडो रूपयाची कामे एक माणूस ठरवित आहे. त्यासंबंधी मी परवा चर्चा केली होती. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी देखील या सूचनेला पाठिंबा दिलेला आहे. एक माणूस ठाण्यामध्ये बसून सर्व काही ठरवत आहे. हे बरोबर नाही. एवढेच माझे म्हणणे आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मी माहिती घेतो व त्यात तातडीने काही करावे लागले तर ते करण्यात येईल. पण मला माहिती घेतल्याशिवाय काहीही करता येणार नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उपस्थित केलेला विषय आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे मी नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेस अनुमती नाकारतो.

........

**पृ.शी./मु.शी.**: प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ वाढविण्याबाबत.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : प्रश्नोत्तराच्या तासातील 15 मिनिटे वाया गेली असल्यामुळे आपण 15 मिनिटे वाढवून द्यावीत.

**उप सभापती** : ठीक आहे. मी आपल्याला प्रश्नोत्तरासाठी 15 मिनिटे वाढवून देतो.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मानननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या पॅकेज अंतर्गत**
**पीक निहाय मदत करण्यासंबंधीचा शासन निर्णय**
**येत्या दोन दिवसामध्ये निर्गमित करण्याबाबत.**

श्री.पांडुरंग फंडकर : सभापती महोदय, आता सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. हिवाळी अधिवेशन सुरू झाल्यानंतर पहिल्याच दिवशी विदर्भातील, खानदेशातील व मराठवाड्यातील लाखो शेतकऱ्यांच्या कापूस, धान, सोयाबीन या तीनही पिकांना भाव मिळावा म्हणून मोठी मागणी विदर्भातून झाली. कापसाला सहा हजार रूपये हमी भाव द्यावा अशी मागणी करण्यात आली. त्यासंबंधी आपल्या सभागृहात दोन दिवस चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन हजार कोटी रूपयांचे पॅकेज कापूस व धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी जाहीर केले. ते पॅकेज मोघम होते. त्यात कापूस उत्पादक शेतकऱ्याला, धान उत्पादक शेतकऱ्याला, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला किती मदत देणार याचा उल्लेख नव्हता. हेक्टरी मदत देणार असाल तर किती हेक्टर पर्यंत देणार आहात याचा काहीही उल्लेख नव्हता, कुठलीच स्पष्टता नव्हती. त्या दिवशी आम्ही मागणी केली होती. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी अधिवेशन संपण्यापूर्वी या संबंधीचा जी.आर.काढला जाईल असे उत्तर दिले होते. आता अधिवेशन संपायला दोन दिवस राहिलेले आहेत. त्यानंतर जी.आर.काढला तर शेतकऱ्याला न्याय मिळाला की नाही यासंबंधी आम्हाला प्रतिक्रिया सुद्धा देता येणार नाही. म्हणून तो जी.आर.आज निघाला असता तर उद्या व परवा आम्हाला त्यावर प्रतिक्रिया देता आली असती. त्यामुळे तो जी.आर.केव्हा काढण्यात येणार आहे यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला अवगत केले पाहिजे. सदर जी.आर.आज निघणार आहे की, उद्या निघणार आहे की, परवा अधिवेशन संपताना निघणार आहे यासंबंधीची स्पष्टता आज झाली पाहिजे. तेव्हा यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले पाहिजे अशी मी आपल्या मार्फत विनंती करणार आहे.

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी अगदी स्पष्टपणे त्या दिवशीच्या निवेदनात सांगितले होते की, यासंबंधीचा निर्णय अधिवेशन संपण्याच्या आत घेतला जाईल. माहिती मागविण्याचे काम सुरू आहे. मी पॅकेज हा शब्द वापरणार नाही. कारण त्याचे फार गैर अर्थ लावले जातात. आम्हाला दोन हजार कोटी रूपयांची मदत द्यायची आहे. त्यामध्ये स्पष्टता आहे. त्यात कुठेही असंदिग्धता नाही. आता पर्यंत एवढी मोठी मदत कधीच दिलेली नव्हती हे आपल्याला देखील माहिती आहे. प्रत्येक पिकाचे क्षेत्र किती आहे याची देखील माहिती आपण दिली आहे. ती माहिती 2-4 टक्क्याने मागे पुढे होऊ शकेल. या तीन पिकांमध्ये कोणाला किती मदत द्यायची यासंबंधीच्या अटी घातलेल्या आहेत. त्यात आणखी काही अटी समाविष्ट करावयाच्या काय याचा निर्णय होणे बाकी आहे. आकडे येत आहेत. लवकरात लवकर म्हणजे उद्या नाही तर परवा यासंबंधीची माहिती दिली जाईल. त्यानंतर मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना भेटून चर्चा देखील करू शकतो. आपली फार चांगली चर्चा झालेली आहे. चांगल्या सूचना आलेल्या आहेत. प्रस्तावाच्या निमित्ताने ज्या सूचना करण्यात आल्या आहेत त्याचा गंभीरपणाने विचार करून निर्णय घेण्यात येणार आहे. सगळी माहिती गोळा करून विदर्भातील शेतकऱ्यांना योग्य तो न्याय देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच विदर्भाला कायमस्वरूपी योग्य तो न्याय देण्यासाठी देखील विचार सुरू आहे. या बरोबरच कायमस्वरूपी कोणत्या योजना घेण्यात येणार आहेत याची देखील माहिती त्यात देण्यात येईल. माहिती गोळा करण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे. शक्य झाल्यास उद्या नाही तर अधिवेशन संपण्याच्या आता जी.आर.काढण्याचे आश्वासन मी सभागृहाला दिलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या न्यायबुद्धीबाबत आम्हाला संशय नाही. जी.आर.काय आहे हे आम्हाला उद्या कळले तर आमची प्रतिक्रिया देता येईल. अधिवेशन संपता संपता संध्याकाळी 4.00 वाजता जी.आर. काढला तर प्रतिक्रिया देता येणार नाही. शासनाने या चर्चेला मान्यता दिल्याबद्दल आम्ही त्यांना धन्यवाद दिले होते. माननीय मुख्यमंत्री विदर्भाला न्याय देतील याबद्दल आम्ही साशंक नाही. आमचे एवढेच म्हणणे आहे की, उद्या माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले तर बरे होईल. परवा निवेदन करणार असाल तर ते प्रश्नोत्तराच्या तासाच्या आधी आम्हाला अपेक्षित आहे. शुक्रवारी संध्याकाळी 4.00 वाजता निवेदन केले तर त्यासंबंधातील प्रतिक्रिया व्यक्त करता येणार नाही.

**उप सभापती** : ठीक आहे.

......

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कळणे येथील अवैध खनिज उत्खननाबाबत**

**(1) * 22812 श्री.परशुराम उपरकर : तारांकित प्रश्न क्रमांक 19365 ला दिनांक 3 ऑगस्ट, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कळणे येथील खनिज उत्खनन करण्याकरीता ठेकेदार यांनी ज्या सर्व्हे नंबरमधील जेवढया हेक्टरमधील उत्खनन करण्याकरीता परवानगी घेतली आहे ती एकूण जमीन किती हेक्टर व त्यांचा सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर काय आहे,

(2) तसेच सदर कळणे येथील खनिज नियमाप्रमाणे 30 मीटर खोलीपर्यंत उत्खनन करण्याची परवानगी असताना 200 मीटरपर्यंत उत्खनन केले आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, खनिज पट्टयांमधील खनिज उत्खनन करण्यासाठी परवानगी घेतलेल्या जमिनीवरील उत्खनन संपल्यामुळे बाजूच्या जमिनीतील खनिज उत्खननाची परवानगी न घेता बेकायदेशीर खनिज उत्खनन करत असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(4) तसेच कळणे येथील पाड्यालगत वन विभागाची जागा असून त्यातील झाडे तोडून त्या भागात वन जमीन असलेल्या जमिनीत खनिज उत्खनन केल्याचे निष्पन्न झाले आहे हे ही खरे आहे काय,

(5) तसेच, खनिज उत्खनन करणाऱ्या ठेकेदारांनी खनिज उत्खनन परवानगी घेतलेल्या सर्व्हे नंबर पलिकडील शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये जाण्याकरिता कंपनीचा कामगार शेतकऱ्यांने जावू देत नसल्याची तक्रार प्राप्त झाली आहे हे खरे आहे काय,

(6) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(7) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सचिव अहिर,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) मौ.कळणे, ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग येथील सर्व्हे नंबर 57 मधील 32.25.00 हे आर. क्षेत्रावर मे.मिनरल्स ॲण्ड मेटल्स लि. यांना लोह खनिजासाठी खाणपट्टा मंजूर करण्यात आला आहे.

(2) नाही, भारतीय खाण ब्युरो, मडगाव, गोवा यांनी मंजूर केलेल्या खाणकाम कार्यक्रम योजनेनुसार खनिज उत्खनन केले जाते.

(3) नाही, उप अधिक्षक, भूमिअभिलेख, दोडामार्ग यांनी खाणपट्टा क्षेत्राचे सीमांकन केले असून सीमांकित क्षेत्रातच खनिज उत्खनन केले जाते.

(4) नाही.

(5) नाही.

(6) व (7) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22812.....

श्री.परशुराम उपकर : सभापती महोदय, 200 मीटर पर्यंत उत्खनन केले आहे काय, असा प्रश्न विचारला असता माननीय मंत्र्यांनी मायनिंग कार्यक्रम योजनेनुसार खनिज उत्खन्नाचे काम केले जात आहे असे उत्तर दिले आहे. किती लाख टन उत्खनन करावयाचे हे मायनिंग कार्यक्रमामध्ये नमूद असते. त्यामुळे खोल गेलेल्या उत्खननाची चौकशी महसूल व मायनिंग विभागामार्फत केली जाणार आहे काय ? उत्खनन करीत असताना अतिक्रमण झाले आहे असे मी म्हटले आहे. 26 जानेवारी रोजी दोडामार्ग कार्यालया समोर काही जण उपोषणाला बसले होते. त्यातील सर्व्हे नं 57 चा हिस्सा क्र.5 श्री.मानसिंग देसाई, सर्व्हे नं.60 चा हिस्सा क्र. 1.25 श्री.मानसिंग देसाई, सर्व्हे नं.60 चा हिस्सा क्र.1.11 श्री.वामन घाडगे, सर्व्हे नं 60 चा हिस्सा क्र.10 श्री.गुणाजी देसाई, सर्व्हे नं.60 चा हिस्सा क्र.1.12 श्री.सखाराम देसाई, सर्व्हे नं.60 चा हिस्सा क्र.1.4 श्री.उस्मान खान .....

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 22812...

श्री. परशुराम उपरकर....

सर्व्हे नं. 6 चा तृतियांश श्री. सदानंद देसाई, सर्व्हे नं 6 चा पंचमांश या सर्व्हे नंबरमध्ये अतिक्रमण करुन माती काढली गेल्याचे निष्पन्न झाले आहे आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिल्यानंतर भूमि अभिलेख विभागाकडून प्राप्त झालेल्या पंच यादीमध्ये व नकाशामध्ये नमूद केले आहे हे खरे आहे काय या जमिनीमध्ये उत्खनन करणाऱ्या कंपनीच्या नावे अजूनही 7/12 झालेला नाही हे खरे आहे काय जे साठे खत तयार करण्यात आले आहे त्याविरुध्द जमीन मालक न्यायालयामध्ये गेले आहेत हे खरे आहे काय या खनिकर्मामुळे त्याठिकाणी असलेल्या झाडांची तोड करण्यात आली आहे, या खनिज पट्टयालगत असलेल्या उगाडे गावातील सर्व्हे नं 68 हा वन क्षेत्राला लागून असतांना त्या ठिकाणी असलेली झाडे तोडली हे खरे आहे काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नानुसार आपण त्यांना 7.5 लक्ष टनापर्यन्त उत्खननाची परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांनी म्हटले ते खरे आहे की, आपण डम्प केल्यानंतर वरील उंची 200 मीटरची ठेवल्यामुळे त्यांना नोटिस देण्यात आली होती. आपण आता त्यांना 2.5 लक्ष टनापर्यन्त, 200 मीटरच्या आतमध्ये उत्खनन करण्यास परवानगी दिलेली आहे. त्याचप्रमाणे 20 मीटरचे डंपिंग गेल्यानंतर व उत्खनन केल्यानंतर मातीच्या ढिगाऱ्यामुळे उंची वाढल्यानंतर सन 2010 मध्ये कंपनीला नोटिस देण्याचे काम करण्यात आले. ही नोटिस दिल्यानंतर आय.बी.एम. म्हणजेच इंडियन ब्युरो ऑफ मायनिंगने त्यांना सस्पेंड करण्याची कारवाई केली होती. त्यानंतर त्यांनी जमिनीची लेव्हल केल्यामुळे 2011 मध्ये त्यांची परवानगी पूर्ववत करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी तेथील शेतकऱ्यांबद्दल सांगितले. याबाबत प्राप्त झालेल्या दोन तक्रारींमुळे जिल्हाधिकाऱ्यांनी त्याबाबतची माहिती घेतली. त्यामध्ये कंपनीने शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीमध्ये उत्खनन करण्याचे काम केले आहे काय, त्याचप्रमाणे वन खात्याच्या जमिनीमध्ये सुध्दा काम केले आहे काय? याची माहिती घेतली. वन विभागाकडून मिळालेल्या अहवालामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, वन विभागाच्या क्षेत्रामध्ये त्यांनी कुठेही उत्खनन केलेले नाही. शेतकऱ्यांच्या जमिनीवरील अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती मागविली परंतु ती प्राप्त झालेली नाही. माननीय सदस्यांनी इतर शेतकऱ्यांची नावे घेऊन त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

ता.प्र.क्र. 22812...

श्री. सचिन अहिर....

7/12 चा उल्लेख केलेला आहे. त्याबाबत पुन्हा एकदा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या सर्व गोष्टींची चौकशी करुन योग्य ती कारवाई करु.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मे.मिनरल्स ॲण्ड मेटल्स लिमिटेड या कंपनीला लोह खनिजासाठी खाणपट्टयाला केव्हा मंजुरी देण्यात आली आहे? दुसरा प्रश्न असा की, मंजूर केलेल्या खाणकाम कार्यक्रम योजनेनुसार खनिज उत्खनन केले जाते, या योजनेचे स्वरुप काय आहे?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन 2009 मध्ये 7.5 लक्ष टन उत्खनन करण्याची कार्यवाही करण्यासाठी कन्सेंट टू ऑपरेट देण्याचे काम केले आहे.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, मेरी जानकारी के अनुसार यहां पर खनिज का मतलब आयरन ओर से है. लिखित प्रश्न के उत्तर में बताया गया है कि भारतीय खान ब्युरो मडगाव, गोवा ने खनिज उत्खनन की मंजूरी दी थी. इस संबंध में मेरे दो प्रश्न हैं. एक प्रश्न तो यह है कि आयरन ओर के उत्खनन की परमीशन देने का काम भारतीय खान ब्युरो के दायरे में नहीं आता है. इसलिए मैं जानना चाहता हूं कि माननीय मंत्री महोदय का इस बारे में क्या स्पष्टीकरण है ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि महाराष्ट्र के गडचिरोली, चंद्रपुर तथा अन्य जिलों में आयरन ओर के बहुत सारे भंडार हैं. मैं राज्य सरकार से जानना चाहता हूं कि नेशनल मिनरल डॅवलपमेंट कारपोरेशन, जो कि भारत सरकार की पब्लिक सेक्टर अंडरटेकिंग है, उनके द्वारा महाराष्ट्र राज्य में सर्वेक्षण कराकर, क्या महाराष्ट्र में बड़े पैमाने पर आयरन ओर की खदानें खोदने का प्रयास किया जा सकता है ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे् आपण मायनिंग लिज दिल्यानंतर त्या कंपनीकडून किती उत्खनन केले जात आहे यावर नियंत्रण ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी आय.बी.एम. कडे असते. स्थानिक पातळीवर काही प्रश्न असतील तर त्या बाबतची जबाबदारी पार पाडण्याचा आपण प्रयत्न करीत असतो. याचा अर्थ असा की, केवळ आपण खाजगी लोकांना लिज देतो अशातला भाग नाही तर महाराष्ट्र शासनाने देखील स्वत:ची कंपनी केली असून आपल्या ताब्यात 9 खाणी आहेत. एवढेच नव्हेतर छत्तीसगडमध्ये एक मायनिंग लिज घेण्यामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

ता.प्र.क्र. 22812...

श्री. सचिन अहिर....

आपण यशस्वी झालो असून तामिळनाडू पॉवर इंडस्ट्रिबरोबर टाय अप करुन आपल्याकडे 33 टक्के भागीदारी ठेवली आहे. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्याकडे एक महामंडळ असल्यामुळे केंद्र सरकारकडून इतर कोणतीही जबाबदारी घेण्यापेक्षा आपल्या महामंडळाला सक्षम करुन त्याच्या माध्यमातून आपण हे काम करु शकतो. परंतु अजूनही उत्खनन करण्यासाठी ज्या ठिकाणी अशाप्रकारे लोह खनिजासाठी खाणपट्टे उपलब्ध आहेत त्याचे जी.पी.एस. च्या माध्यमातून जॉग्राफिकली सर्व्हे करण्याची कारवाई महामंडळाच्या माध्यमातून प्रस्तावित आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील ताडदेव येथील साने गुरूजी मार्गावरील सर्वे नं. ३८६ या भूखंडाच्या विकासाबाबत**

**(२) * २१६०२ श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ताडदेव येथील साने गुरूजी मार्गावरील सीटी सर्व्हे नं. ३८६ सेठ रमेशचंद्र चिमणलाल चाळ येथील भूखंड विस्थापितांसाठी राखीव असतानाही आरक्षण उठवून सन १९९२ साली पुनर्विकासासाठी परवानगी देण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या पुनर्विकासाबाबत मूळ भाडेकरुंबरोबर झालेल्या करारनाम्यातील अटींची पूर्तता झाली आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीत अनिवासी गाळयाची उंची मंजूर आराखडयापेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे हे खरे आहे काय, तसेच सदर इमारतीमध्ये अतिरिक्त क्षेत्रफळातून म्हाडासाठी १८ सदनिका उपलब्ध केल्या जाणार आहेत हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार चौकशीत काय आढळून आले आहे व अशाप्रकारे नियमबाहय बांधकाम करणाऱ्या विकासकावर आणि त्याला साथ देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्यापपर्यंत कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

सदर भूखंड हा विस्थापितांसाठी नव्हे तर पब्लिक हाऊसिंग/हाय डेन्सीटी हाऊसिंग साठी आरक्षित होता तसेच सदर भूखंड हा खाजगी मालकीचा आहे. दिनांक २२.१.१९९२ रोजी महापालिका विकास नियोजन विभागाने काही अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून आरक्षित भूखंडाचा विकास करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतूदीनुसार भूखंडावरील इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीनुसार भुखंडावरील इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी संमतीपत्र (डी.पी.रिलीज लेटर) दिले होते. तसेच दुरुस्ती मंडळाने विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये पुनर्विकास योजनेस ना हरकत प्रमाणपत्र दिले.

(२) भाडेकरुंबरोबर विकासकाने २५० चौ.फुटाचे गाळे देण्याबाबतचे कारारपत्र केले असतांनाही तेवढया क्षेत्रफळाच्या सदनिका विकासकाने भाडेकरुंना दिल्या नाही, अशा तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तथापि सदर बाब ही विकासक व रहिवाशी यांच्यामध्ये आहे. परंतु मुंबई इमारत दुरुस्ती व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

ता.प्र.क्र. २१६०२... श्री. सचिन अहिर....

पुनर्रचना मंडळाने दि.२६.९.२०११ रोजी दिलेल्या सुधारित ना हरकत प्रमाणपत्रानुसार जुन्या भाडेकरु / रहिवाश्यांना किमान २२५ चौ.फू. चटईक्षेत्र असलेल्या सदनिका देण्याची अट घातलेली आहे. कमी देण्यात आलेल्या चटईक्षेत्रा संदर्भात रहिवाश्यांनी केलेल्या तक्रारी संबंधात उच्च न्यायालयाने नेमलेल्या कोर्ट कमिशनर यांच्या अहवालानुसार तसेच महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशानुसार इ.क्र.ए.बी.सी.डी.ई, अशा पांच इमारतींमध्ये, भाडेकरुंना प्रत्येकी २२८ चौ.फूट चटईक्षेत्र असलेले गाळे वितरित करुन त्यांना पुनर्वसित केले आहे.

(३) हे खरे नाही. सदर इमारतीत अनिवासी गाळयांची उंची मंजूर आराखडयाप्रमाणे आहे. सदर इमारतीमध्ये अतिरिक्त क्षेत्रफळातून म्हाडाला १८ सदनिका (८०९.४६ चौ.मी.क्षेत्रफळ) (surplus built up area) हस्तांतरीत करावयाचे आहे. प्रस्तावित क्षेत्रफळ हे विक्रीसाठी असलेल्या इमारतीत तसेच पुनर्वसन इमारतीत उपलब्ध केलेले आहे व अतिरिक्त क्षेत्रफळ म्हाडाला हस्तांतरीत केल्याशिवाय विक्रीसाठी असलेल्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. सदरहू मालमत्तेच्या पुनर्विकासास विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये २.५ चटईक्षेत्र निर्देशांकानुसार ना हरकत प्रमाणपत्र दिले असल्याने, म्हाडा अधिनियम १९७६ च्या परिशिष्ट-३ नुसार मंडळास एकूण ८०९.३४ चौ,मी.बांधकाम क्षेत्रफळ विकासकाकडून घेणे आहे. तद्नुसार विकासकाने प्रस्ताव सादर केला असून, सदर प्रस्तावानुसार १७ सदनिका म्हाडास सुपूर्द करण्याचे प्रस्तावित आहे. सदर सदनिका ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या प्रश्नाला देण्यात आलेले लेखी उत्तर अत्यंत दिशाभूल करणारे आहे. या ठिकाणी असलेला भूखंड हा पब्लिक हाऊसिंगसाठी असल्याचे उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे व तो काही अटी आणि शर्तीच्या आधारावर देण्यात आलेला आहे. या भूखंडावरील आरक्षण काढण्यासाठी देण्यात आलेले कारण असे आहे की, सदर भूखंडावर रहिवाशी स्वत:ची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन तो विकसित करणार आहेत. त्यानंतर या भूखंडावरील आरक्षण हटविण्यात आले. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, असे कारण असेल तर या ठिकाणी बिल्डर कसा काय आला?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 21602...

श्री. प्रकाश बिनसाळे....

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न होता की, आपण त्या लोकांना २०४ चौ. फुटाच्या सदनिका दिल्या आणि ॲग्रिमेंट २२८चौ.फुटाचे करण्यात आले होते.त्याचप्रमाणे भाडेकरु आणि विकासक यांच्यामध्ये २२५ चौ. फुटाचे ॲग्रिमेंट करण्यात आले होते. याचा अर्थ असा की, आपण कारपेट क्षेत्रफळ २२५ चौ. फुटाचे द्यावयाचे आहे. परंतु या ठिकाणी फ्री ऑफ एफ.एस.आय. असलेल्या २४ चौ. फुटाच्या बाल्कनीचा समावेश करुन त्यांना २२८ चौ. फुटाचे क्षेत्रफळ दाखवून कोर्टाचा हवाला दिला जात आहे. मी टिका करीत नाही परंतु कोर्टामध्ये वकील गरीब टेनंटबरोबर कशापध्दतीने वागतात हे आपणा सर्वांना माहीत आहे. अशाप्रकारे झालेल्या अन्यायाच्या पुष्टीसाठी माहितीच्या अधिकारामध्ये इम्पॅक्ट डिझाईन ग्रुपचे सर्टिफिकेट ऑफ ऑब्जर्व्हेशन मी मिळविले आहे. त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे असे म्हटले आहे की, "But in this case prima facie it appears that said developers have committed to provide said tenants a total carpet area of approx. 228 sq.ft. that too including balcony. In our opinion as per BMC regulations effective carpet area provided to tenant is actual approx. 207 sq.ft. Carpet. Above said factor is against the provision of D.C. regulations since providing carpet area of approx. 207 sq.ft. (Without balcony) is short of provisional area of 225 sq.ft. by approx. 18 sq.ft."

अशाप्रकारे या कार्पेट एरियाचा घोळ केलेला आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी सदनिकेच्या उंचीबाबत सांगितले आहे. रहिवाशांबरोबर केलेल्या ॲग्रिमेंटप्रमाणे त्यांना १२ फूट उंची दिली जाईल असे म्हटले होते तेवढी उंची देण्यात आलेली नाही. सदरचे बांधकाम पहाण्यासाठी राज्यमंत्री माननीय श्री. सचिन अहिर साहेब स्वत: आले होते. त्याठिकाणी १२ फुटाची उंची न ठेवता ९ फूट ठेवण्यात आली असल्याचे सिध्द झाले आहे. अशाप्रकारे लोकांची दिशाभूल केली गेली आहे, यामध्ये त्या टेनंटच्या बाजूने कुणीही उभे राहिलेले नाही. टेनंट उपोषणाला बसले होते त्यावेळी मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते. या बाबत माझ्याबरोबर चर्चा करण्यात आलेली नाही, किंवा सखोल चौकशी करण्यात आलेली नाही. याची एकतर्फी चौकशी केल्यास त्यामध्ये काहीही निष्पन्न होणार नाही. म्हणून येथील रहिवाशांवर झालेल्या अन्यायाबाबत शासन संबंधितांवर कठोर कारवाई करणार आहे काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २१६०२...

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, यामध्ये डी.सी.आर.च्या सेक्शन ९ प्रमाणे असलेले आरक्षण रिलिज करता येते. माननीय सदस्य हे मुंबई शहरातील लोकप्रतिनिधी असून त्यांनाही माहीत आहे की, १६ हजार उपकरप्राप्त इमारतींवर कोणत्या ना कोणत्याही प्रकारे आरक्षण आहे. कलम ३३(७) नुसार त्या जागेवरील रहिवाशांना रिडेव्हलपमेंटमध्ये घरे मिळावीत म्हणून हे रिझर्व्हेशन रिलिज करण्यामागील हा मूलभूत हेतू असतो. याकरिता त्या कलमामध्ये तशी तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय सदस्यांनी त्या रहिवाशांना २२८ चौ.फूट कारपेट एरीया मिळणे आवश्यक होते असे त्यांना वाटत आहे. ३३(७) कलमामध्ये अशी तरतूद आहे की, आपण २२५ चौ.फूट क्षेत्रफळ देण्यासाठी रिस्ट्रिक्ट राहू शकतो. त्यावरील क्षेत्रफळ द्यावयाचे असेल तर ते डेव्हलपर आणि टेनंट यांच्यामध्ये झालेल्या कराराचा विषय असतो. या विशिष्ट केसच्या बाबतीत सन २००४ मध्ये माननीय उच्च न्यायालयामध्ये काही रहिवासी गेल्यानंतर

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21602 . . . .

श्री.सचिन अहिर . . . .

कोर्टाने स्वत: येथील एरिया किमान 228 चौ.फूट चटईक्षेत्र आहे की नाही हे पहाण्यासाठी कोर्ट कमिशन नेमले आणि याबाबतीत कमिशनने अहवाल देत असताना 228 चौ.फूट चटईक्षेत्र देण्यात आल्याचे म्हटले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न असा विचारलेला आहे की, याठिकाणी 9 मीटर इतकी ऊंची असावयास पाहिजे किंवा नाही? परंतु हा संपूर्ण विषय महानगरपालिकेशी संबंधित आहे. त्यामुळे तेथील गाळयांची ऊंची 9 मीटर आहे की नाही ही बाब तपासून पहाण्यात येईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मला याबाबतीत माननीय मंत्री महोदययांना प्रश्न विचारावयाचा आहे की, जेव्हा म्हाडामार्फत भाडेकरु यांच्याकडून ॲग्रीमेंट घेतो, तेव्हा कॉर्पोरेशनला जे प्लॅन्स् सादर केले जातात ते ॲग्रीमेंटला अनुरुप म्हणजे ॲग्रीमेंटमध्ये असलेल्या क्लॉजप्रमाणे त्यामध्ये बाबी अंतर्भूत केलेल्या आहेत की नाही हे पहाण्याचे काम कोणाचे आहे आणि हे पहाण्याचे काम जर म्हाडाचे असेल तर मग हे प्लॅन्स् मंजूर कसे झाले ? यामधून तेथील रहिवाशांवर फार मोठ्या प्रमाणात अन्याय झालेला आहे. माझी शासनाला या प्रश्नाच्या माध्यमातून विनंती राहील की, यासाठी आपण नगरविकास विभागाचे सचिव आणि गृहनिर्माण विभागाचे सचिव यांच्या माध्यमातून एक चौकशी समिती नेमावी आणि त्याठिकाणी भाडेकरुंचेही म्हणणे ऐकून घ्यावे. याठिकाणी ज्या पध्दतीने भाडेकरुंवर अन्याय झालेला आहे, तशा प्रकारे इतर भाडेकरुंवर अन्याय होऊ नये हे पहाण्यासाठी ही समिती नेमावी. तसेच जागेचे जे क्षेत्रफळ आहे, त्याच्या 60 टक्के क्षेत्रफळ हे 60 टक्के क्षेत्र सेल कॉम्पोनंन्टसाठी वापरले जाते आणि 40 टक्के क्षेत्रफळ रिअल कॉम्पोनंन्टसाठी वापरले जाते ही बाब देखील चुकीची आहे.त्यामुळे या सर्व गोष्टींची चौकशी करणार आहात काय ? भाडेकरुंचे हिअरींग घेणार आहात की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, . . . .

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे आहे की,सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचा प्रश्न विचारुन झाल्यावर मी उत्तर देतो, बरोबर आहे.

श्री.सचिन अहिर (खाली बसून) : होय. मी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचा प्रश्न विचारुन झाल्यावर उत्तर देतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.21602 . . . .

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मुंबईतील गरीब भाडेकरुंना या प्रश्नासाठी शासन व्यवस्थेशी झगडा करताना जे काही पाठबळ मिळावयास पाहिजे, त्याऐवजी जर विकासकाच्या मागे सर्व यंत्रणा उभी रहाणार असेल तर या गरीब भाडेकरुंना न्याय मिळणे केवळ अशक्य आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी गाळ्यांच्या ऊंची बाबत उल्लेख केला की, त्याठिकाणी जेवढी ऊंची पाहिजे, त्यापेक्षा ती कमी आहे. तसेच तेथे जेवढे क्षेत्रफळ द्यावयास पाहिजे ते देखील कमी आहे. अशा प्रकारे जेव्हा गोष्टी होतात, तेव्हा या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करुन येथील भाडेकरुंवर झालेला अन्याय शासनाने त्वरित दूर केला पाहिजे या अनुषंगाने शासन त्वरित पावले टाकणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रहिवाशांच्या बाबतीत जी भूमिका मांडलेली आहे, त्याच्याशी शासन देखील निश्चितपणे कटीबध्द आहे. मी याबाबत सांगू इच्छितो की, या विषयाच्या संबंधात 2004 मध्ये कोर्टामध्ये गेल्यानंतर 2005 मध्ये 200 रहिवाशी तेथे रहावयास देखील गेले आहेत. नंतर ज्यांची दुकाने आहेत, कमर्शिअल आहेत, जे अनिवासी आहेत अशा 22 लोकांनी तक्रार केली की, आमच्या गाळ्याची ऊंची 9 मीटर असावयास हवी होती. मी सांगितल्याप्रमाणे महानगरपालिका सर्व प्लॅनिंगला मंजुरी देण्याचे काम करते म्हणून त्या दृष्टीकोनातून येथील गाळ्यांची ऊंची 9 मीटर आहे की नाही ही बाब तपासून पाहिली जाईल. तसेच जर सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे असेल की, या मर्यादेपुरती याबाबत सखोल चौकशी करावी तर ती चौकशी करण्याची देखील शासनाची तयारी आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मी मघाशी प्रश्न विचारताना अशी मागणी केली होती की, येथील रहिवाशांवर जो न्याय झालेला आहे, त्याबाबत नगरविकास विभागाचे सचिव आणि गृहनिर्माण विभागाचे सचिव यांच्या माध्यमातून कमिटी नेमण्यात यावी. त्याप्रमाणे समिती नेमण्यात येणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, याबाबतीत सांगावयाचे तर आपण ही बाब नगरविकास विभागाच्या सचिवांच्या माध्यमातून तपासून घेऊन त्याबाबत चौकशी करु.

**उप सभापती** : ठीक आहे.

----

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील अतिरिक्त गाळे मंडळाकडे वर्ग न करणे**

**(3) * 21584 श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.जगदीश गुप्ता, श्री.संजय केळकर : तारांकित प्रश्न क्रमांक 17881 ला दिनांक 27 जुलै, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील अवितरित गाळ्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी दिनांक 17 ऑगस्ट, 2011 रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, गृहनिर्माण यांचेकडे मागणी केली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, यानुसार शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे आहे.
(2) व (3) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडे प्राप्त गाळयांपैकी बृहतसूचीवरील पात्र लाभार्थींना वितरणाकरीता योग्य नसलेले अवितरित गाळे मुंबई मंडळाकडे वर्ग करून त्याची विक्री सोडत पद्धतीने जाहिरातीद्वारे मुंबई मंडळाच्या नियमान्वये करण्याबाबतचा निर्णय, म्हाडा प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक 6481, दिनांक 06.05.2010 अन्वये घेण्यात आला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने मंडळाकडे उपलब्ध असणाऱ्या 180 चौ.फूट वा कमी क्षेत्रफळाच्या रिक्त गाळयांचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार 180 चौ.फुटापेक्षा कमी क्षेत्रफळाचे 52 निवासी व 46 अनिवासी, 225 चौ.फुटाचे 297 निवासी व 19 अनिवासी आणि पुनर्विकसित इमारतीमधून प्राप्त झालेले 59 निवासी असे एकूण 473 गाळे रिक्त व अवितरीत होते. या 473 गाळयांचा दिनांक 04.07.2011 रोजीच्या जाहिरातीत अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

जाहिरातीनुसार एकूण 152 अर्ज प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेल्या अर्जाची प्राधिकरणाच्या धोरणानुसार विगतवारी करून प्रस्तावित वितरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे. बृहतसूचीवर असलेल्या भाडेकरू / रहिवांशाना रिक्त गाळे वितरणाबाबत प्राधिकरणाचे धोरण अस्तित्वात होते व त्यानुसार आतापर्यंत बृहतसुचीवर असलेल्या भाडेकरू / रहिवाशांना रिक्त गाळयांचे वितरण करण्यात येत होते. आता प्राधिकारणाने त्यांच्या दिनांक 03.03.2011 रोजीच्या ठरावान्वये बृहतसुचीवर असलेल्या भाडेकरू / रहिवाशांना पुर्नरचित इमारतीमधील अतिरिक्त गाळे व ना हरकत प्रमाणपत्राद्वारे पुनर्विकसित केलेल्या इमारतीमधील प्राप्त झालेले अतिरिक्त गाळे वितरणासाठी दिनांक 05.07.2011 रोजी जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून मुंबई मंडळाकडे अवितरित गाळे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता यांच्याकडून रिक्त गाळ्यांची माहिती मागविण्यात आली. या संदर्भात मी मागच्या अधिवेशनामध्ये देखील प्रश्न मांडला होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, याबाबत ताबडतोब चौकशी करुन कारवाई केली जाईल. या प्रक्रियेमध्ये फार मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. मुंबई मंडळाकडे केवळ 17 गाळे वर्ग करण्याबाबतची कार्यवाही सुरु केल्यानंतरही

4.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ती थांबविण्यात आल्याचे उत्तर दिले होते. अशा प्रकारचे उत्तर दिल्यानंतर मी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव तसेच उपाध्यक्ष, म्हाडा यांच्याकडे दिनांक 17 ऑगस्ट 2011 रोजीच्या पत्रान्वये काही माहिती मागितली होती. परंतु संबंधित विभागाच्या सचिवांनी अद्यापपर्यंत ही माहिती पुरविली नाही. आज याठिकाणी जे उत्तर देण्यात आले आहे, त्यामध्ये अवितरित गाळयाची संख्या 473 इतकी असल्याबाबत माहिती देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अवितरित गाळे मुंबई मंडळाकडे वर्ग करुन त्याची विक्री जाहिरात देऊन सोडत पध्दतीने करण्याचा निर्णय दिनांक 06 मे 2010 रोजी घेण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. असे असतानाही आजपर्यंत देखील हे व्यापारी गाळे बृहतसूची वरील भाडेकरु रहिवाशांना वितरित केलेले नाहीत. याबाबतचा निर्णय 6 मे रोजी झालेला आहे हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. याचाच अर्थ असा की, याबाबतीत जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे. एकीकडे म्हाडामार्फत अद्यापपर्यंत जी घरे बांधली गेलेली नाहीत, त्याची लॉटरी काढली आहे आणि दुसरीकडे मात्र 473 गाळ्यांच्या वितरणाबाबत चालढकल सुरु आहे.

माझा प्रश्न असा आहे की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून मुंबई मंडळाकडे अवितरित गाळे वर्ग करण्याचा ठराव कोणत्या तारखेला घेण्यात आला ? दुसरा प्रश्न असा आहे की, त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता यांच्याकडून रिक्त गाळ्यांच्या संबंधातील माहिती कोणत्या तारखेला मागविण्यात आली ? तिसरा प्रश्न असा आहे की, या संबंधातील पूर्णपणे माहिती प्राप्त होण्यासाठी किती महिन्याचा कालावधी लागला ? जर यासाठी वर्षभरापेक्षा जास्त कालावधी लागला असल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदय आज निर्णय घेणार आहेत काय ? असे माझे तीनच प्रश्न आहेत. माननीय मंत्री महोदयांनी त्याचे उत्तर द्यावे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो पहिला प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर दिनांक 06-05-2010 मध्ये आपण प्राधिकारणाने ठराव करुन मुंबई बोर्डाकडे सदरहू गाळे हस्तांतरित करावेत असे सांगण्यात आले. त्यानंतर दिनांक 07-07-2010 रोजी कार्यकारी अभियंता यांच्याकडून 180 चौ.फूटाचे गाळे किती आहेत याबाबत माहिती मागविण्यात आली आणि यासंबंधातील माहिती त्यांनी दिनांक 21-07-2010 रोजी पाठविली. त्यानंतर आपण संबंधितांकडून 225 क्षेत्रफळाचे किती गाळे आहेत याबाबतची माहिती मागवून त्वरित दिलेली आहे. ही माहिती गोळा केल्यानंतर मला माननीय विरोधी पक्षनेत्यांना

5....

सांगावयाचे आहे की, आपण सांगितल्याप्रमाणे याबाबत वारंवार तक्रार आलेली आहे की, काही विशेष लोकांनाच हे गाळे वितरित करण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणून याबाबत अशी भूमिका घेतली की, यासाठी एक पध्दतशीरपणे धोरण करावयास पाहिजे जेणेकरुन सर्व लोकांना या गाळ्यांच्या संबंधातील माहिती मिळेल आणि त्या दृष्टीकोनातून आपण वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊ. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश माननीय श्रीमती सुजाता मनोहर यांच्या माध्यमातून एक निर्णय झालेला आहे की, जेवढे गाळे आहेत, ते आपल्याला खाजगी लोकांना देता येणार नाहीत.जे ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये रहात आहेत आणि ज्यांची नावे मास्टर लिस्टमध्ये आहेत अशाच लोकांना हे गाळे वितरित करता येतील.आपल्याला सर्वांना माहिती आहे की, आता लोक 180 चौ.फू.चा गाळा घेण्यास तयार होत नाहीत. कारण आता आपण 300 चौ.फू.चे गाळे बांधतो. म्हणून ही सर्व माहिती संकलित करण्यासाठी विलंब झालेला आहे. परंतु आतापर्यंत कोणताही गाळा वितरित करण्यात आलेला नाही.

2010 नंतर आता एकच वर्ष झाले असून 2011 या वर्षातील शेवटच्या महिन्यामध्ये आपण आहोत. त्यानंतर निर्णय घेण्यात आला आणि दिनांक 03-03-2011 रोजी नवीन धोरण ठरविण्याच्या बाबतीत एक भूमिका घेतली. याबाबतीत असे धोरण केले की, आता हे सर्व ऑन लाईन करण्यात यावे. कारण लोकांना कोणत्या ठिकाणी गाळे उपलब्ध आहेत हे समजत नाही. काही एन.ओ.सी.चे गाळे येतात आणि मग काही विशेष लोकांना दिले जातात म्हणून याबाबतीत धोरण ठरविण्यात आले की, दर चार महिन्यांनी जे अतिरिक्त गाळे उपलब्ध होतील, त्याची वेब साईटवर माहिती देऊन किंवा ऑन लाईन पध्दतीने किंवा वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन लोकांकडून अर्ज मागविले जातील आणि त्यानंतर त्याची वितरण व्यवस्था केली जाईल. त्यानुसार आपण मे 2011 मध्ये "नवशक्ती" पेपरमध्ये जाहिरात दिली की, मास्टर लिस्ट मधील जेवढे लोक आहेत, त्यांनी अर्ज करावे आणि त्याप्रमाणे आपण 351 लोकांची मास्टर लिस्ट जाहीर करण्याचे काम केले आहे. या मास्टर लिस्टमधील 105 लोकांनी अर्ज केला आणि मास्टर लिस्टच्या बाहेर असलेल्या 47 लोकांनीही अर्ज केले आहेत. या संपूर्ण अर्जांची छाननी करुन यातील कोण पात्र आहेत आणि कोण अपात्र आहेत हे पाहण्यात येणार असून यासाठी आपण काही निकष ठरविलेले आहेत. हे निकष म्हणजे त्यांचे घर तोडल्यानंतर त्यांना ट्रॅन्झिट कॅम्पमध्ये कोणत्या वर्षी ठेवण्यात आले आहे, त्या वर्षाचा बेस पकडून आपण त्यांची .... 6.....

21-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D-6

APR/ KTG/ D/ 11:30

ता.प्र.क्र.21584 . . . . श्री.सचिन अहिर.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिनिऑरिटी लावली पाहिजे. म्हणजेच जर एखादा माणूस 1980 मध्ये ट्रॅन्झिट कॅम्प मध्ये रहाण्यासाठी गेला असेल तर त्याची सिनिऑरिटी 1980 पासून पकडली पाहिजे. तसेच 2000 मध्ये जर कोणाचे घर तोडले असेल तर त्याला सिनिऑरिटीमध्ये घेता येणार नाही. असा बेस पकडून त्या-त्या वॉर्डमध्ये सिनिऑरिटी निश्चित करुन गाळे वितरण करण्याची व्यवस्था करीत आहोत. पुढील एक महिन्याच्या आत विभागाच्या माध्यमातून हे सर्व गाळे वितरित करण्याच्या बाबतीत निश्चितपणे भूमिका घेण्याच्या बाबतीत मुंबई इमारत व दुरुस्ती पुनर्रचना विभागाला सांगण्यात येईल.

----------

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील अपात्र शिधापत्रिका रद्द करण्याची मोहीम प्रभावीपणे राबविणे**

**(4) * 22522 श्रीमती दिप्ती चवधरी , प्रा.सुरेश नवले , श्री.एम.एम.शेख , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहर व पिंपरी-चिंचवडमध्ये अपात्र व्यक्तींकडे असलेल्या सुमारे अडीच लाख शिधापत्रिका रद् करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे सप्टेंबर, 2011 मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या निर्णयाची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याबाबत तसेच अपात्र शिधापत्रिका शोधून काढण्याची मोहीम अधिक वेगाने राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अनिल देशमुख** : (1) व (2) पुणे शहर व पिंपरी चिंचवडमध्ये आतापर्यंत 236172 अपात्र शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या आहेत.

सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश 2001 मधील तरतूदीनूसार राज्यात अपात्र शिधापत्रिका शोधण्यासाठी दि.1.3.2011 ते 31.8.2011 या कालावधीत विशेष शोध मोहिम राबविण्यात आली. सदरहू शोध मोहिमेत ज्या शिधापत्रिकाधारकांनी विहित नमुन्यातील अर्ज सादर केले नाही अथवा अर्जाबरोबर निवासाचे वैध पुरावे सादर केले नाहीत. त्यांच्या शिधापत्रिका अपात्र ठरवून रद्द करण्यात आल्या आहेत. सदरहू अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमेत संपूर्ण राज्यात 1186384 येवढया शिधापत्रिका अपात्र ठरवून रद्द करण्यात आल्या आहेत व त्यावरील शिधाजिन्नस व रॉकेलचा पुरवठा बंद करण्यात आला आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, फार मोठया प्रमाणावर बनावट शिधापत्रिका तयार होत असतात. मला या ठिकाणी अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करावयाचे आहे. त्यांनी 2,36,172 एवढया बनावट शिधापत्रिका रद्द केलेल्या आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, फेब्रुवारीमध्ये महानगरपालिकेच्या निवडणुका होऊ घातलेल्या आहेत. जशा निवडणुका जवळ येतात तशा बनावट शिधापत्रिका तयार करण्याचे काम फार मोठया प्रमाणावर सुरु होते आणि फार मोठया प्रमाणात एजंट त्यामध्ये सामील होतात. या शिधापत्रिका तेथल्यातेथे रद्द होतील यासाठी शासन काही यंत्रणा निर्माण करणार आहे काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, बनावट शिधापत्रिकांच्या बाबतीतील हा प्रश्न आहे. या संदर्भात सन 2008-2009, 2009-2010, 2010-2011 या तीन वर्षात मोहीम राबविण्यात आलेली आहे. सन 2008-2009 मध्ये 29 लाख बनावट शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या. सन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22522. .

श्री. अनिल देशमुख. ..

2009-2010 मध्ये 12 लाख आणि आता सन 2010-2011 मध्ये 11 लाख 86 हजार बनावट शिधापत्रिका रद्द करण्यात आलेल्या आहेत. या ठिकाणी पुण्याच्या बाबतीत प्रश्न विचारण्यात आलेला आहे. सगळीकडे निवडणुका होऊ घातलेल्या आहेत त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाच्या माध्यमातून जी भीती व्यक्त केलेली आहे ती बरोबर आहे. खास करुन मोठया शहरांमध्ये निवडणुकीच्या दरम्यान बनावट शिधापत्रिका तयार करण्यात येतात.

**उप सभापती** : आमच्या शहरामध्ये देखील बनावट शिधापत्रिका तयार होतात.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी जी सूचना करण्यात आलेली आहे त्या संदर्भात अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील आणि त्यावर लक्ष ठेवण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय,. .

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे या बऱ्याच दिवसांनी सभागृहात उपस्थित झालेल्या आहेत त्यांनी प्रश्न विचारण्यासाठी हात वर केलेला आहे मी त्यांना प्रथम प्रश्न विचारण्याची परवानगी देतो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण माझ्या अनुपस्थितीची नोंद ठेवली या बद्दल मी आपली आभारी आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये बनावट शिधापत्रिका असे म्हटलेले आहे आणि शासनाने दिलेल्या उत्तरामध्ये अपात्र शिधापत्रिका तसेच ज्यांच्याकडे वैध पुरावे नव्हते, नमुन्यातील अर्ज नव्हते असे म्हटलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, गेल्या सहा महिन्यामध्ये आम्ही अनेक शिधापत्रिका कार्यालयात जाऊन स्वत: भेट दिलेली आहे. प्रत्येक ठिकाणी दलाल आहेत आणि अधिकारी वर्ग कमी प्रमाणात आहे. त्याचा परिणाम असा होतो की, जे पुरावे दिले जातात ते तपासणारी यंत्रणाच शासनाकडे नाही. असे दोन भिन्न प्रश्न आहेत. बनावट शिधापत्रिका हा वेगळा विषय आहे आणि ज्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे अर्धवट पुरावे असतानासुध्दा शिधापत्रिका दिल्या त्यांच्यावर काय कारवाई केली? ती कारवाई जोपर्यंत होत नाही तोपर्यंत आता फेब्रुवारी महिन्यातील निवडणुकीच्या वेळी 1 लाख नाही तर 25 लाख बनावट शिधापत्रिका तयार होऊ शकतात. म्हणून यामधील मूळ सूत्रधार कोण आहेत हे शोधण्यासाठी गुन्हेगारी पध्दतीची चौकशीची कारवाई कराण्याची आवश्यकता आहे आणि ही कारवाई कोणावर करण्यात आली हे या ठिकाणी स्पष्टपणे सांगण्यात येईल काय?





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, बाहेर बनावट शिधापत्रिका तयार होतात याचाच अर्थ असा की, बाहेरसुध्दा मोठी एजन्सी आहे. अनेक खाजगी लोक हे काम करीत असतात. बाहेरच्या लोकांबरोबर खालच्या स्तरावरचे 17 शासकीय कर्मचारी सापडलेले आहेत. या 17 कर्मचाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. यापेक्षा बाहेर मोठया प्रमाणात एजंट आहेत. आर.टी.ओ. किंवा शिधापत्रिका कार्यालय असो या ठिकाणी मोठया प्रमाणात दलाल फिरत असतात. या ठिकाणी कर्मचाऱ्यांचा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. कर्मचाऱ्यांची भरती लवकरात लवकर करण्यात येणार आहे. कर्मचाऱ्यांच्या भरतीचा प्रश्न हाताळण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मोठया प्रमाणावर बनावट शिधापत्रिका देण्यात आलेल्या आहेत त्या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे त्या संबंधीचे उत्तर या ठिकाणी दिले पाहिजे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. त्यांचा पहिला प्रश्न असा होता की, शासनाच्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली आणि कर्मचारी कमी आहेत असा त्यांचा दुसरा प्रश्न होता. सभापती महोदय, 17 कर्मचारी दोषी आढळले आहेत त्यांच्यावर कारवाई चालू आहे. काही ठिकाणी बाहेरचे एजंट प्रिंटिंग करताना शासनाच्या अधिकाऱ्यांनी पकडले आहेत आणि त्यांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. बाहेरच्या एजंटवर देखील कारवाई चालू आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे याचे कारण असे की, पुणे शहरामध्ये दोन लाख बोगस शिधापत्रिका आणि राज्यामध्ये 11 लाख बोगस शिधापत्रिका पकडण्यात आल्या आहेत त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन. खूप चांगली कामगिरी माननीय मंत्री महोदयांनी केलेली आहे. पण त्याचबरोबर या बोगस शिधापत्रिका कुठल्या तरी अधिकाऱ्याच्या मदतीशिवाय तयार करणे शक्य आहे काय? बाहेरुन काहीही जरी छापून आणले तरी जोपर्यंत त्यावर शासकीय अधिकाऱ्यामकडून स्टॅम्प मारला जात नाही तोपर्यंत ती शिधापत्रिका नियमित करता येईल काय? म्हणून ज्या 17 अधिकाऱ्यांचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे की, ते दोषी आढळून आलेले आहेत. त्या अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात येत नाही?

..4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप. . .

या राज्याचा अन्नसाठा मोठया प्रमाणात चुकीच्या पध्दतीने दिला जात असेल मला असे वाटते की, या 17 अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. एकटया पुणे शहरात अडीच लाख आणि राज्यभरात अकरा लाख बोगस शिधापत्रिका देण्यात आलेल्या आहेत, हाच पुरावा ग्राहय धरुन त्या अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्यात येईल काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी याठिकाणी पहिल्यांदाच सांगितलेले आहे की, हा बनावट शिधापत्रिकांचा प्रश्न गंभीर आहे आणि म्हणूनच शासनाने या संदर्भात शोध मोहीम घेतलेली आहे. ही शोध मोहीम सुरु केल्यानंतर जवळ जवळ 12 लाख शिधापत्रिका बोगस आढळून आल्या त्यामध्ये शासकीय अधिकाऱ्यांच्या व्यतिरिक्त बाहेरचे अनेक लोक सामील आहेत. ज्या बनावट शिधापत्रिका छापण्यात येतात त्या शासकीय कार्यालयात जाऊन नियमित करुन घेण्याची आवश्यकता नाही. या बनावट शिधापत्रिका बाहेर छापण्यात येतात आणि बाहेरच वाटप करण्यात येतात. त्याचा शासनाशी काही संबंध नाही पण यामध्ये जे 17 शासकीय अधिकारी आढळून आलेले आहेत त्यांच्यावर शासकीय नियमानुसार कारवाई चालू आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, काय कारवाई चालू आहे ते सभागृहाला कळले पाहिजे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी महत्वाचा प्रश्न या ठिकाणी विचारला आहे. माझे दोन महत्वाचे प्रश्न आहेत. शासकीय अधिकाऱ्यांवर काय करवाई करण्यात येणार आहे? आणि दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, 11 लाख बोगस शिधापत्रिका पकडण्यात आलेल्या आहेत तेव्हा या 11 लाख बोगस शिधापत्रिकांच्या माध्यमातून किती लाख टन धान्य उचलण्यात आले, ते धान्य कुठे गेले याची चौकशी शासनाने केली आहे का, केली नसेल तर चौकशी करण्यात येणार आहे का आणि गरिबांच्या नावाखाली ज्यांनी लाखो टन बोगस धान्य उचलले आहे, त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या बाबतची माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

..5..



ता.प्र.क्र.22522. . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय, या सगळया चर्चेच्या दरम्यान सातत्याने एक तक्रार करण्यात आलेली आहे की, प्रत्यक्षात निवडणुकीच्या काळात बोगस शिधापत्रिका तयार करण्याचा फार मोठा प्रघात दरवेळी शासनाला आढळून येतो. निवडणुकीच्या आचारसंहितेच्या दरम्यानच्या काळामध्ये उद्‌घाटन करावयाचे नाही अशा प्रकारचे बरेचसे नियम पाळण्यात येतात. या बोगस शिधापत्रिका काढण्यात येणे किंवा नव्याने काही शिधापत्रिका अधिकाऱ्यांवर दबाव आणून तातडीने उपलब्ध करुन घेणे हे सातत्याने होत असते. हे प्रकार थांबवावयाचे असतील तर निवडणुका जाहीर झाल्यापासून मतदानाच्या दिवसापर्यंत शिधापत्रिका देण्याच्या संदर्भात काही बंदी आणता येईल काय याचा विचार शासन करील काय? जे लोक त्या ठिकाणी रहात नाहीत, तसेच ज्यांना आता पर्यंत शिधापत्रिका मिळालेल्या नाहीत अशा बऱ्याच लोकांच्या शिधापत्रिका या काळामध्ये शिधापत्रिका कार्यालयात प्रेशर वापरुन अधिकारी देत असतात, त्यामुळे बनावट शिधापत्रिकांचा फार मोठा सुळसुळाट झालेला आहे. म्हणून 15 ते 20 दिवसांकरिता यावर बंदी घालता येईल काय याचा विचार करावा. इतर वेळीही लोकांना दोन ते तीन महिने शिधापत्रिका मिळत नाहीत तेव्हा निवडणुकीच्या काळात या पध्दतीने शिधापत्रिका देण्याच्या बाबतीत योग्य प्रतिबंध घालता येईल असे माझे प्रामाणिक मत आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 22522....

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, आपली सूचना चांगली आहे पण ते बंद केले तर जे जेन्युईन लोक आहेत, ज्यांना शिधा पत्रिका पाहिजे त्यांना फार मोठ्या प्रमाणावर अडचणी येतील.

**उप सभापती** : मी पंधरा वीस दिवसांकरिता म्हटले.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एखादी पोटनिवडणूक असेल तर संपूर्ण जिल्ह्याला आचारसंहिता असते. त्यामुळे पंधरा वीस दिवसाने काय होणार आहे ? त्यावेळी ते करु नका.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, याचा अवश्य विचार केला जाईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुढची योजना काय करणार हा माझा खरा प्रश्न होता. यापुढे बोगस मतदान होऊ नये यासाठी, या काळामध्ये ज्या बनावट शिधा पत्रिका दिल्या जातात त्या बाबतीत फक्त सूचना देऊन काही होणार नाही. त्या बाबतीत काय उपाययोजना करणार असा माझा स्पेसिफिक प्रश्न होता. जे अधिकारी दोषी आढळून आलेले आहेत त्यांच्यावर काय कारवाई करणार ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, आपण जी सूचना केली ती अतिशय योग्य आहे. हे बरोबर आहे की, निवडणुकीच्या काळामध्ये मोठ्या शहरामध्ये फार गैरवापर होतो. यामध्ये आपण जर पंधरा दिवस हे काम थांबविले तर ज्यांना खरोखरच नियमानुसार शिधा पत्रिका द्यावयास पाहिजे त्यांच्यावर अन्याय होईल, असे मला वाटते. तरी सुध्दा ही बाब मी तपासून पाहतो.

**उप सभापती** : ज्यांच्यावर खरोखरच अन्याय होतो ते तुमच्यापर्यंत कधीच पोहचू शकलेले नाहीत. निदान ज्या ठिकाणी बोगस प्रकार चालले आहेत ते थांबावे यासाठी आम्ही हे सांगत आहोत.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अशा पध्दतीच्या घटना, खासकरुन निवडणुकीच्या वेळी होऊ नयेत म्हणून मुंबई शिधावाटप क्षेत्रामध्ये 15 दिवस शिधा पत्रिका देण्याचे थांबविण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/ D/ KTG/

**नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रातील गावठणाचा पुनर्विकास करण्यासाठी राबवावयाचा कृती आराखडा**

**(5) * 22186 श्री.जयवंतराव जाधव , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , ॲड. उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.अनिल भोसले** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या नाशिक भागात गावठण पुनर्विकास योजना राबविण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने शासनास कृती आराखडा पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच जुन्या नाशिकमधील जुन्या व मातीच्या घरांचा विचार करता येथे गावठाण पुनर्विकास योजना राबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, 2011 मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (1) होय.

(2) होय.

(3) व (4) प्रस्तुत प्रकरणी नाशिक महानगरपालिकेने सादर केलेला गावठाण पुनर्विकासाचा प्रस्ताव नियोजनाच्या दृष्टीने अमान्य करण्यात आला असून ज्या क्षेत्राचा पुनर्विकास करणे आवश्यक आहे अशा क्षेत्रासाठी नाशिक महानगरपालिकेस, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 33 नुसार, व्यापक विकास प्रस्ताव दर्शविणारी योजना तयार करुन शासनास सादर करण्याचे निर्देश दि. 15 सप्टेंबर, 2011 रोजी देण्यात आले आहेत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, नाशिक महानगपालिकेच्या गावठाण भागाच्या पुनर्विकासाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. तसा आपण विचार केला तर नाशिक-पुणे-मुंबई हा सुवर्ण त्रिकोण समजला जातो आणि नाशिकचाही विकास या दोन शहरांबरोबर व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. नाशिक शहराची रचना आणि त्यातल्या त्यात जुन्या नाशिकची रचना सगळी टेकड्यांवर झालेली आहे. तेथील गावठाणाचा पुनर्विकास हा अतिशय रखडलेला आहे. त्यामुळे तेथील जी घरे आहेत ती आता इतक्या नाजूक अवस्थेमध्ये आहेत की, त्या सगळ्यांचा पुनर्विकास होण्याची गरज आहे. त्यासाठी नाशिक महानगरपालिकेने कृती आराखडा सुध्दा तयार करुन दिला परंतु तो महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना विभागाकडून अमान्य करण्यात आला. या सगळ्या परिस्थितीचा विचार करताना, नाशिक हे कुंभमेळ्याचे पवित्र क्षेत्र आहे आणि येत्या दोन

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 22186.... श्री. हेमंत टकले ....

वर्षात कुंभमेळ्याच्या निमित्ताने त्या ठिकाणी फार मोठी गर्दी होणार आहे. त्यामुळे या शहराच्या, या शहराच्या जुन्या भागांच्या आणि या शहरातील जुन्या गावठाणांच्या दृष्टीने हा प्रश्न सोडविणे, त्या ठिकाणी वाढीव एफएसआय देणे गरजेचे आहे. हे करण्यासाठी शासन एफएसआय वाढवून देईल का ? महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना विभाग आणि नाशिक महानगपालिका यांना एकत्र बसवून हा विकास आराखडा लवकरात लवकर मंजूर होण्यासाठी शासन कार्यवाही करील का ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, याबद्दल 15 सप्टेंबर, 2011 रोजी शासनाने नाशिक महानगरपालिकेला व्यापक विकास योजना एमआरटीपी कायद्याच्या कलम 33(ग) नुसार जुन्या गावठाणाकरिता व पंचवटीकरिता सादर करण्यास सांगितले आहे. जितक्या लवकर ती योजना सादर होईल त्यावर शासन नक्कीच निर्णय घेईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे शहरातील वनाज कोथरुड ते रामवाडी येथील मेट्रो प्रकल्पाच्या निधीबाबत**

**(6) * 22465 श्री.मोहन जोशी , प्रा.सुरेश नवले , श्री.सुभाष चव्हाण , डॉ.सुधीर तांबे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.एम.एम.शेख** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहरातील वनाज कोथरुड ते रामवाडी जकात नाका या 15 कि.मी. मार्गाच्या मेट्रो प्रकल्पास माहे जून, 2010 मध्ये मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अद्याप या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करण्यात आला नाही हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(4) अद्याप, याबाबतीत कार्यवाही केली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (1), (2), (3) व (4) सदर प्रस्तावास शासनाने तत्वत: मान्यता दिली असून शासन स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहराची लोकसंख्या आता जवळपास 35 लाखापर्यंत पोहोचलेली आहे. सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने पीएमपीएलच्या 1500 बसेस आहेत आणि फक्त 8 टक्के लोक या पीएमपीएलच्या 1500 बसेसच्या सार्वजनिक वाहतुकीचा उपयोग करतात. 92 टक्के पुणेकर हे स्वत:च्या वाहनाने प्रवास करतात. शहरातील सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या मेट्रो प्रकल्पाबाबत एप्रिल, 2010 मध्ये पुणे महानगरपालिकेने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविला. त्याची छाननी सुध्दा झालेली आहे. त्याबाबत डीआरएमसी पॅटर्नप्रमाणे मंत्रिमंडळाची मंजुरी झाली आहे का ? हा मेट्रो प्रकल्प किती वर्षात पूर्ण होणार आणि या मेट्रो प्रकल्पासाठी जो निधी लागणार आहे त्या निधीची उभारणी शासन कशा पध्दतीने करणार असे माझ ो दोन स्पेसिफिक प्रश्न पुण्याच्या मेट्रोच्या संदर्भात आहेत.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, पुणे हे महाराष्ट्रातील अतिशय महत्वाचे शहर आहे. तेथील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. पुणे शहराच्या शेजारील पिंपरी-चिंचवड शहर आणि ग्रामीण भागामध्ये देखील प्रचंड मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. उद्योगधंद्याच्या दृष्टीने आणि राज्याच्या उत्पन्नामध्ये जी भर घातली जाते त्यामध्ये पुण्याचा अतिशय वरचा क्रमांक आहे. त्यामुळे केंद्र सरकारची मोठ्या महानगरपालिकांना मेट्रो देण्याबद्दची जी व्यापक योजना आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 22465 .... श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

त्या अंतर्गत पुणे आणि नागपूर शहरामध्ये मेट्रो करण्याचा तत्वत: निर्णय शासनाने घेतलेला आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात हे करण्याचा निर्णय ज्यावेळी घेतला त्यावेळी आपण दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला एक सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याची विनंती केली आणि त्या प्रकारचा सविस्तर प्रकल्प अहवाल 2009 मध्ये पुणे महानगरपालिकेला सादर केला गेला. त्यामध्ये दोन टप्पे आहेत. पहिला टप्पा 31 किलोमीटरचा आहे. त्यातील मार्ग क्रमांक 1 हा स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड आणि मार्ग क्रमांक 2 हा कोथरुड-वनाज-रामवाडी हा 15 किलोमीटरचा मार्ग असे दोन मार्ग पहिल्या टप्प्यात आहेत. दुसरा टप्पा सुध्दा प्रस्तावित आहे आणि तो 44 किलोमीटरचा आहे. म्हणजे एकूण संपूर्ण योजना झाल्यावर 75 किलोमीटरची योजना असेल. आता आपण जो विचार करीत आहोत तो पहिल्या टप्प्यातील मार्ग क्रमांक 2 म्हणजे कोथरुड-वनाज-रामवाडी हा जो 15 किलोमीटरचा मार्ग आहे त्याबद्दल तत्वत: विचार झाला आहे. त्याबद्दल जनसुनावणी होऊन नागरिकांच्या आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून ज्या सूचना प्रस्तावित केल्या गेल्या त्याचाही विचार केलेला आहे आणि त्या सर्व मुद्यांचा खुलासा डीएमआरसीच्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून देखील केला गेलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कॅबिनेटने तत्वत: मान्यता कधी दिली असा प्रश्न विचारलेला आहे. त्यामध्ये कोथरुड-वनाज-रामवाडी या स्टॅण्डर्ड गेजच्या मेट्रो मार्गाला महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने 23 जून, 2010 रोजी मंजुरी दिली आणि राज्य मंत्रिमंडळाने 20 एप्रिल, 2011 रोजी तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्यामुळे आता पुढची सगळी तयारी झालेली आहे. तत्वत: मान्यता मिळालेली आहे. केंद्रीय नगरविकास मंत्री यांच्याशी माझी चर्चा झालेली आहे. त्यांनी या दोन्ही शहरांच्या मेट्रोला पूर्णपणे समर्थन देण्याची तयारी दाखविलेली आहे. यामध्ये आता आपल्याला एवढेच पहावयाचे आहे की, काही ठिकाणी हा उन्नतमार्ग व्हावा म्हणजे एलिव्हेटेड मार्ग व्हावा की अंडरग्राऊंड मार्ग व्हावा याबद्दल चर्चा निर्माण करण्यात आलेली आहे. जी जनसुनावणी झ ाली त्यामध्ये हे सगळे प्रश्न विचारात आले. यासंदर्भात जर आणखी सूचना आल्या तर त्याही घेऊन त्यावर विचार करण्यात येईल. परंतु ही मेट्रो लवकरात लवकर

...6...

ता. प्र. क्र. 22465 .... श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

झाली पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत नाही. शासनाचीही तशी भूमिका आहेच.

वित्तीय व्यवस्थापन कसे करावयाचे या बाबतीत ढोबळ मानाने असे ठरले आहे की, पुणे महानगरपालिकेने 10 टक्के हिस्सा घालावा, राज्य शासनाने 20 टक्के हिस्सा घालावा, केंद्र शासनाने 20 टक्के द्यावेत आणि उरलेले 50 टक्के कर्ज काढावे किंवा बीओटी करावे किंवा पीपीपी करावे, अन्यथा अन्य पर्याय देखील शोधावेत.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22465... श्री.पृथ्वीराज चव्हाण...

त्यामध्ये शासन हे जपान सरकारच्या जायका कंपनीकडे येन लोन घेण्याचा विचार करीत आहे. त्याच्या व्याजाचा दर 1.4 टक्के इतका आहे. हे कर्ज 30 वर्षांनी परत करावयाचे असते. त्यामध्ये 10 वर्षे मोरोटोरियम आहे. म्हणजे यासाठी 50 टक्के शासनाचा सहभाग असेल, त्यापैकी 10 टक्के महानगरपालिका, 20 टक्के केंद्र सरकार, 20 टक्के राज्य सरकार आणि इतर मार्गाने निधी उभा केला जाईल. 2014 साल गृहित धरुन या प्रकल्पातील मार्ग क्रमांक-2 चा अंदाजित खर्च 2593 कोटी इतका असेल. यासाठी उन्नत मार्ग घेतला तर जमिनीच्यावर 30 मीटर रुंदीच्या डी.पी.रस्त्यावरुन ही मेट्रो रेल्वे होईल. त्यासाठी जमीन अधिग्रहित करावी लागणार नाही. पण 15 हेक्टर शासकीय जमीन व 4.28 हेक्टर खाजगी जमीन एकूण 19 हेक्टर जमीन डेपो व स्थानकाकरिता लागेल. हा अतिशय महत्वाचा प्रकल्प असून तो वेगाने पुढे राबविता येईल. त्यानंतर पिंपरी-चिंचवडला काय करावयाचे, हिंजवडीला कनेक्टिव्हीटी कशी द्यावयाची, नवीन एअरपोर्टला कशी द्यावयाची याबाबत पुढे विचार करण्यात येईल. पुणे व नागपूर शहर या दोन्ही शहरात मेट्रो रेल्वे प्रकल्प लवकरात लवकर राबविण्यासाठी शासन कटिबध्द आहे.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे मेट्रो रेल्वेने प्रकल्पाच्या संदर्भात दिल्ली मेट्रोच्यामार्फत अहवाल तयार केलेला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने या प्रकल्पाला मंजुरी दिलेली आहे. मार्ग क्रमांक 1 बाबत आपण सांगितले की, डी.पी.आर.तयार आहे. नागपूरच्या मेट्रो रेल्वेबाबत सुध्दा आपण सभागृहाला माहिती दिलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे नागपूर शहराचा डी.पी.आर.अद्याप तयार झालेला नाही. पुणे मेट्रोसंबंधी केंद्र सरकारकडे डी.पी.आर.मंजूर करुन पाठवावयाचा आहे तो केव्हा पाठविण्यात येईल, पुणे महानगरपालिकेने हा प्रस्ताव मंजुरीसह शासनाकडे पाठविलेला आहे. पुण्याच्या या प्रकल्पाला शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. नागपूर व पुणे शहरातील मेट्रो प्रकल्प एकत्रित का करण्यात येत आहेत, याऐवजी फक्त पुणे शहरातील मेट्रो प्रकल्प शासन लवकर मंजूर करणार आहे काय, पुणे शहरातील मेट्रो प्रोजेक्ट आर्थिकदृष्ट्या परवडणारा आहे. नागपूरचा मेट्रो प्रोजेक्ट आर्थिकदृष्ट्या परवडणार नाही अशी माझी माहिती आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी नागपूरचा एवढयासाठी उल्लेख केला की, 10 लाख लोकसंख्या असलेल्या शहरामध्ये मेट्रो रेल्वे असावी किंवा नाही याबद्दल केंद्र सरकारने धोरण स्वीकारलेले आहे. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, पुणे मेट्रोचा विचार स्वतंत्रपणेच केला जाईल. त्याची व्यवहारिकता, फायनान्सिअल मॉडेलिंग स्वतंत्रपणे केला जाईल. त्याला नागपूरला जोडण्याचा काही प्रश्न येत नाही. नागपूर मेट्रो प्रोजेक्टचा विचार स्वतंत्रपणे केला जाईल. त्यासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडे शासनाने निवेदन केलेले नाही. त्यांच्याकडून अजून प्रस्ताव आलेला नाही. हा प्रस्ताव लवकरात लवकर करु. पण नागपूरचा प्रश्न वेगळा आहे. पुणे मेट्रोचे काम लवकरात लवकर करण्याकरिता मी नागरी विकास मंत्रालयाकडे पुन्हा एकदा डिटेल फायनान्सिअल प्रस्ताव घेऊन जाणार आहोत. याबाबत लवकरात लवकर जी.आर.काढण्यात येईल. हा जी.आर.मेट्रो कायद्यानुसार काढण्यात येईल. याबाबत शासनामध्ये अशी चर्चा होती की, हा जी.आर.मेट्रो कायद्याखाली काढावा की रेल्वे कायद्याखाली काढावा. याबाबत केंद्र सरकारचे असे खास मत आहे की, तुम्ही मेट्रो कायद्याखाली हा प्रोजेक्ट राबविणार असाल तरच केंद्र शासन त्याला समर्थन देईल. त्यामुळे अन्य पर्याय राहिलेला नाही. याबाबत अधिक विचार केल्यानंतर या प्रकल्पाचे नोटिफिकेशन मेट्रो रेल्वे कायद्याखाली काढावे अशा निर्णयाप्रत आलो आहोत. हा प्रकल्प राबविण्यासाठी पुणे मेट्रो रेल कंपनी स्पेशल पर्पज व्हेइकल करावे लागेल. येत्या 3 महिन्यात कॅबिनेट डिसिजन, जी.आर.इश्यू करणे, मेट्रो करणे, स्पेशल पर्पज व्हेइकल करणे अशी सर्व प्रकारची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.

श्रीमती दीप्ती चवधरी : पुणे शहर म्हणजे फास्ट गोईंग सिटी असे म्हणतात. माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर ऐकल्यानंतर असे वाटते की, हा मेट्रो प्रोजेक्ट सुरु होण्यासाठी पुढे 5 किंवा 10 वर्षांचा कालावधी लागणार आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी किती वर्षे लागणार आहेत. जर 5-10 वर्षे लागणार असतील तर माझा एक प्रश्न आहे. पुणे शहराची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अतिशय विक आहे. पुणे शहरामध्ये केवळ 1500 बसेस चालू आहेत. वास्तविक या शहराला 3 ते 4 हजार बसेसची आवश्यकता आहे. तो पर्यत पर्यायी व्यवस्था करण्यासाठी शासनाच्या माध्यमातून बसेस खरेदी करण्यासाठी निधी दिला जाणार आहे काय ?

3...



NTK/ D/ ST/ D/ KTG/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : पहिल्या टप्प्यातील दुसरा मार्ग आहे. तो प्रथम घेण्यात येणार आहे या मार्गासाठी 5 वर्षाचा कालावधी लागेल असा अंदाज आहे. पर्यायी व्यवस्था म्हणून बसेस खरेदी करण्याचा विषय महानगरपालिकेचा आहे. मागील वेळी केंद्र सरकारने विशेष सहाय्य देऊन स्टिम्युलस पॅकेज व जेएनएनयुआरएम अंतर्गत काही बसेस दिल्या होत्या. तशा प्रकारची आणखी योजना राबविला येईल काय हे तपासण्यासाठी मी केंद्रीय मंत्र्यांबरोबर चर्चा करीन.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहराच्या वाहतुकीच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा मेट्रो प्रकल्प पूर्णत्वाला नेण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेतला आहे. दिल्लीमध्ये संबंधित खात्याच्या मंत्र्यांकडे पाठपुरावा करुन पुण्यातील जनतेला न्याय दिला आहे त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन राज्याच्या उपराजधानीमध्ये होत आहे. या उपराजधानीमध्ये मेट्रो प्रकल्प लवकरात लवकर सुरु व्हावा, हिवाळी अधिवेशनाची विदर्भाला भेट म्हणून मेट्रो रेल्वे प्रकल्प पुण्यासोबतच द्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 16 फेब्रुवारीला बैठक घेतली होती. त्यावेळी सुध्दा हेच उत्तर देण्यात आले होते की, पुणे मेट्रोला तत्वत: मान्यता दिलेली आहे. फेब्रुवारी पासून आपण डिसेंबरपर्यंत येऊन पोहोचलो आहोत. पुण्यात मेट्रो प्रोजेक्टसंबंधी जनसुनावणी झाली होती त्यामध्ये मेट्रो भूमिगत असावी याबद्दल बऱ्याच लोकांनी सूचना केलेल्या आहेत. पुणे शहरातील वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातले आहे, ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. परंतु मेट्रोबरोबरच वाहतुकीसंबंधीच्या इतर ज्या उपाययोजना आहेत यासंबंधीच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी किती कालावधीत करण्यात येणार आहे ? कारण मेट्रोची अंमलबजावणी होण्यासाठी आणखी काही वर्षे लागतील असे चित्र दिसत आहे. तारांकित प्रश्नाला शासन स्तरावर पुढे कार्यवाही सुरु आहे असे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. कोणत्या स्तरावर ही कार्यवाही थांबलेली आहे ते स्पष्ट झालेले नाही. सभापती महोदय, भूमिगत मेट्रोसंबंधी सरकारने कोणता विचार केलेला आहे आणि पुण्यातील वाहतुकीसाठी इतर उपाययोजनांवर किती आठवड्यामध्ये प्रत्यक्षात अंमलबजावणीला वेग दिला जाणार आहे ?

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, पुणे मेट्रोची रचना कशी असावी यासाठी तांत्रिक सल्ला दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून घेण्यात आलेला आहे. त्यानंतर जनसुनावणी झाली आहे. त्यावेळी अंडर ग्राऊंड मेट्रो असावी की, ओव्हर ग्राऊंड मेट्रो असावी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. अंडर ग्राऊंड व ओव्हर ग्राऊंड यामधील खर्चाचा रेश्यो 1 : 3 पर्यंत वाढतो.

नंतर श्री.गिते.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22465............ श्री.पृथ्वीराज चव्हाण...

त्यामुळे जेथे शक्य असेल तेथे व्यावहारिक ठरेल, जेथे अडचणीचे वाटत असेल अशा ठिकाणी भूमिगत मेट्रो रेल्वे सुरु कराव्यात असा जगभराचा अनुभव आहे. फार घनता असलेल्या ठिकाणाहून अंडर ग्राऊंड आणि जेथे घनता कमी असेल तेथे रत्याच्या वरुन मेट्रो ट्रेन सुरु करण्याचा प्रयत्न आहे. हा तांत्रिक विषय आहे. मेट्रो रेल्वे मार्ग भूमिगत करावेत की रस्त्यांच्या वरच्या बाजूने करावेत हा तांत्रिक विषय आहे. त्यामुळे या विषयातील जे तज्ज्ञ आहेत, त्यांच्याकडे हा विषय सोपवावा असे मला वाटते. मेट्रो रेल्वे मार्गाचा स्टडी तज्ज्ञांकडून पूर्ण झाल्यानंतर यात काही मागे पुढे बदल करावयाचे असतील, त्याबाबतीतील आपले मत तज्ज्ञांचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतर त्यांच्याकडे व्यक्त करु. परंतु पुढील तीन महिन्यामध्ये शासनाला ज्या काही प्रक्रिया करावयाच्या आहेत, त्या पूर्ण केल्या जातील ही माहिती मी सुरुवातीलाच सांगितली आहे. यासाठी पाच वर्षाचा अवधी लागणार आहे. पुणे शहरातील वाहतुकींची कोंडी दूर करण्यासाठी जी कामे हाती घेतली आहेत, ती कामे सुरु आहेत. त्यासाठी महानगरपालिकेस शासनाची जी काही मदत लागेल, ती मदत शासन देण्यास तयार आहे. त्याबाबतीत महापालिकेसमवेत बैठक घेऊन वेगळा निर्णय घेण्यात येईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, महाराष्ट्रात ठाणे शहर आणि जिल्हा या ठिकाणी मोठया प्रमाणात नागरिकीकरण झालेले आहे. एमएमआरडीच्या माध्यमातून असो, शासनाच्या माध्यमातून असो, ठाणे शहरासाठी वेगवेगळे प्रकल्प होणार असे जनतेला शासनाकडून गाजर दाखविले जाते. परंतु ते प्रकल्प काही काळातच खंडीत होतात. मोनो रेलचा प्रकल्प होणार असे मोठा गाजावाजा करुन सांगितले. परंतु तो प्रकल्प आता कोठे तरी बाजुला पडलेला आहे. ठाणे शहरासाठी मेट्रो रेल्वे प्रकल्प प्रस्तावित आहे. सदरचा मेट्रो रेल्वे प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे. ठाणे शहराची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. ठाणे येथील मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : आपल्याला माहिती आहे की, नवीन मुंबईत मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा शुभारंभ झालेला आहे. नवीन मुंबई मेट्रो रेल्वेचे काम चालू झालेले आहे. ठाणे येथील मेट्रोकरिता एम.एम.आर.मध्ये मल्टी मॉडेल कॉरिडॉरची कल्पना मांडण्यात आली आहे. मल्टी मॉडेल कॉरिडॉरमध्ये 8 पदरी महामार्ग, 2 पदरी बीआरटी, 2 मेट्रोचे मार्ग अशा प्रकारचा अलिबाग ते

..2..

विरारपर्यंतचा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प प्राथमिकदृष्टया सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये देखील मेट्रोचा विचार केलेला आहे. मल्टी मॉडेल कॉरिडॉरमध्ये 8 पदरी रस्ता, दोन पदरी बीआरटी आणि 2 मेट्रोचे मार्ग असा खूप मोठा कॉरिडॉर करण्याचा शासनाचा विचार आहे. त्याचे प्राथमिक सादरीकरण माननीय पंतप्रधानासमोर केले आहे. मुंबई महानगर क्षेत्रात मेगा प्रोजेक्ट केले पाहिजेत. त्यासाठी ट्रान्स हार्बर सी-लिंक किंवा कोस्टल महामार्गाचा आम्ही विचार करीत आहोत. यात तिसरा मोठा प्रकल्प मल्टी मॉडेल कॉरिडॉरचा आहे. त्याचबरोबर ठाणे शहरातील विकास करण्याकरिता देखील शासनाच्या वतीने पुढाकार घेतला जाईल. ठाणे शहराची लोकसंख्येची घनता पाहता त्या ठिकाणी मेट्रो रेल्वेसाठी भुयारी मार्ग करावे लागतील. मेट्रो रेल्वेसाठी रस्त्याच्या वरच्या भागात पूल होणे शक्य नाही. या संदर्भात जो काही तांत्रिक पर्याय निघेल, तो पर्याय दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी पाठविण्यात येईल. त्यांच्याकडून जो अहवाल येईल त्याचा आम्ही अभ्यास करणार आहोत.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : हा पुणे मेट्रो रेल्वेचा प्रश्न आहे. हे अधिवेशन नागपूर येथे सुरु आहे. आपण मुंबई, पुणे येथे मेट्रो रेल्वे प्रकल्प राबवित आहात. नागपूर शहरात मेट्रो रेल्वे प्रकल्प केव्हा राबविण्यात येईल? मेट्रो रेल्वे प्रकल्पात कामठी, वाडी आणि बुटीबोरी भागाचा समावेश करण्यात येईल काय आणि तो प्रकल्प केव्हा पूर्ण करण्यात येईल?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : हा मूळ प्रश्न पुणे शहरातील मेट्रो रेल्वे संदर्भातील आहे. म्हणून नागपूर मेट्रो रेल्वेसंबंधीची सविस्तर माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु असून या अधिवेशनात मेट्रो रेल्वे प्रकल्पाविषयी चर्चा करीत आहोत. नागपूर मेट्रो रेल्वेच्या संदर्भात जी काही माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे ती मी या ठिकाणी देऊ इच्छितो. नागपूर मेट्रो रेल्वेच्या अनुषंगाने दोन दिवसांपूर्वी बैठक घेण्यास राज्याच्या मुख्य सचिवांना सांगितले होते. मुख्य सचिवांनी दिनांक 14 डिसेंबर, 2011 रोजी या संदर्भात बैठक घेतलेली आहे. दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी विनंती करणे हा पहिला मार्ग आहे. पहिल्या टप्प्यातील प्रायोजित महामार्ग आहे. त्यात आपल्याला चर्चा करुन काही प्रमाणात बदल करता येईल. पहिल्या टप्प्यातील सीताबर्डी विमानतळ-मिहान-बुटीबोरी हा 25 कि.मी.चा प्रस्तावित मार्ग आहे. सीताबर्डी ते ऑटोमोबाईल स्क्वेअर असा दुसऱ्या टप्प्याचा मार्ग आहे. पहिला टप्पा

..3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

25 कि.मी.चा आणि दुसरा टप्पा 20 कि.मी.चा आहे. पहिल्या महामार्गास अंदाजे 4700 कोटी रुपये व दुसऱ्या टप्प्यास 3800 कोटी रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे. हा खर्च ढोबळमानाने मी सांगितला आहे. खर्चाची आकडेवारी कोणी गृहित धरु नये. त्यासाठी फायनान्सिंग करण्यासाठी एन.आय.टी., नागपूर महानगरपालिका, एम.आय.डी.सी., एम.ए.डी.सी. आणि सिडको यांनी यामध्ये पैसे टाकून इक्विटी घ्यावी आणि स्पेशल पर्पज व्हेईकल ज्याप्रमाणे पुण्यासाठी करण्याचे योजिले आहेत त्याच पध्दतीचा विचार नागपूरसाठी करुन एन.आय.टी.ला नोडल एजन्सी नेमून प्रकल्प राबविण्याचे प्रयोजन आहे. नागपूर येथे दोन टप्प्यातील मेट्रो रेल्वे प्रकल्प व्हावा म्हणून त्या संबंधीचा प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रीमंडळासमोर ठेवण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : माननीय मुख्यमंत्र्यांनी रेल्वे आणि मोनो रेलच्या कायद्यासंबंधी उल्लेख केला. या शासनातील माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी मुंबई ते नागपूर अशी जेट रेल्वे करण्यात येईल आणि त्या संदर्भात सर्व्हे सुरु आहे व ही रेल्वे मुंबईला पाच तासात पोहोचेल असे सांगितले आहे. आघाडी सरकारमध्ये कोणतेही मंत्री कोणत्याही खात्याचे आश्वासन देतात. माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी दोन वेळा जेट रेल्वेच्या संदर्भात नागपूर येथे सुतोवाच केले आहे. जेट रेल्वेच्या संदर्भातील सद्य:स्थिती काय आहे?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, नागपूर ते मुंबई बुलेट ट्रेन सुरु करावी अशा प्रकारची अपेक्षा महाराष्ट्रातील अनेक तज्ज्ञांनी व जनतेने व्यक्त केलेली आहे. त्या संदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे मी अधिक काही माहिती देऊ शकत नाही. यासंबंधी माननीय सदस्यांनी स्वतंत्र नोटीस माझ्याकडे पाठविली तर त्याबाबत त्यांना डिटेल माहिती देता येईल. रेल्वे मार्गासाठी लागणाऱ्या जमिनीचे भाव खूप जास्त असल्यामुळे ते काम खूप खर्चिक होईल. परंतु त्या प्रकल्पाची व्यावहारिकता तपासून घेण्यात येईल. भौगोलिकदृष्टया पूर्व-पश्चिम अशी जोडणी झाली पाहिजे. केंद्र सरकारच्या माध्यमातून मुंबई-दिल्ली इंडस्ट्रीयल कॉरिडॉर आणि दिल्ली-मुंबई फ्रेट कॉरिडॉर हा विशेष प्रकल्प राबविणार आहोत. पूर्व-पश्चिम कॉरिडॉर केंद्र सरकारने राबवावा अशी मी मागणी केलेली आहे. त्यात नागपूरचा देखील समावेश करावा लागेल आणि या बाबतीत मी केंद्र सरकारशी निश्चितपणे चर्चा करुन पुढील मार्ग काढण्यात येईल.

--------

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मूल (जि.चंद्रपूर) पंचायत समिती अंतर्गत पशुधन विकास अधिकारी कार्यालयाकडून दुधाळ जनावरे खरेदीत झालेला अपहार**

**(६) * २२०७९ श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल (जि.चंद्रपूर) पंचायत समिती अंतर्गत पशुधनविकास अधिकारी कार्यालयाकडून सन २०१० मध्ये शेतकऱ्यांना विशेष घटक योजनेअंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे खरेदी करतांना शेतकऱ्यांना हाताशी धरुन जनावरे खरेदी न करतांच संबंधित अधिकारी यांनी अनुदान उचल करुन शासनाच्या पैशाचा अपहार केल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०११ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात अनियमितता दिसून येत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द मासिक सभेत मा.सभापती पंचायत समिती मूल यांनी आक्षेप घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, वा संबंधित पशुधन अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर,श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दि. २२.६.२०१० रोजीच्या पंचायत समिती, मूल जि.चंद्रपूर च्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.२/४ अन्वये विशेष घटक योजने अंतर्गत झालेला खर्च नामंजूर करण्यात यावा असा ठराव घेण्यात आलेला आहे.

तथापि संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, मूल यांनी या अनुषंगाने त्रिसदसीय समिती गठीत करुन चौकशी केलेली आहे. चौकशी अहवालात सदर प्रकरणात अनियमितता झाली नसल्याचे स्पष्ट नमूद केलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, आपल्या अनुमतीने लेखी उत्तराच्या परिच्छेद तीन मध्ये किरकोळ दुरुस्ती करु इच्छितो. अनुक्रमांक- २ व ३ च्या उत्तरातील शेवटच्या वाक्याऐवजी पुढील वाक्य वाचावे.

..५..



ता.प्र.क्र.२२०७९........... श्री.गुलाबराव देवकर...............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"तथापि, दिनांक १५.१२.२०११ रोजी जिल्हास्तरीय समिती अहवाल सादर झालेला आहे,त्यामध्ये अनियमितता आढळून आली आहे" असे वाचावे. उर्वरित उत्तर छापल्याप्रमाणे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय,गेल्या दोन वर्षामध्ये या व्यक्तीने मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. त्या भ्रष्टाचाराच्या चौकशीमध्ये सिध्द झालेले आहे की, प्रत्यक्षात खरेदी झालेली नाही. केवळ विक्रेता आणि खरीददार यांच्या संगनमताने हा व्यवहार केलेला आहे. जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी आयुक्तांना पत्र पाठविले आहे की, ही व्यक्ती प्रमाणपत्र देण्याकरिता प्रति व्यक्ती १५०० ते २००० रुपये घेते. योजने अंतर्गत मृत्यू झालेल्या जनावराचे पोस्टमार्टेमचा अहवाल देण्यासाठी प्रति जनावर १५०० ते २००० रुपये सेवा शुल्क घेतात अशा प्रकारच्या तक्रारी आहेत. प्रशासकीय कामकाजासाठी त्याच्या भेटीस गेल्यानंतर तो भेटत नाही. अशा प्रकारचे गंभीर आरोप जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी आयुक्तांकडे पत्राव्दारे कळविले आहेत. गट विकास अधिकारी यांनी या तक्रारीसंबंधीची माहिती मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कळविलेली आहे. या अधिकाऱ्याने केलेल्या व्यवहारामध्ये बऱ्याच अनियमितता आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

श्री. दिवाकर रावते ...........

माननीय राष्ट्रपतींकडे जर शासनाला जायचे होते तर काल महामहिम राष्ट्रपती आपल्या मुंबईतच होत्या. आमचे आदरणीय श्री. उध्दवजी ठाकरे यांनी बेळगांवचे महापौर व महाराष्ट्र एकीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांसह त्यांची भेट मुंबईतच घेतली. तशी भेट आपल्याला सुध्दा घेता आली असती आणि हा प्रश्न तातडीने त्यांच्या कानावर टाकता आला असता पण आपण तसे केले नाही आणि आपली संधी गेली. म्हणून बेळगांव भागातील मराठी जनतेचा जाच थांबवावयाचा असेल तर हे अधिवेशन संपल्यानंतर तातडीने महामहिम राष्ट्रपती आणि माननीय पंतप्रधानांची भेट घ्यावी. कारण या प्रश्नाच्या संदर्भात नको त्या उचापती काही लोक करीत आहेत आणि बेळगांवकरांना नको तो सल्ला देऊन त्यांना अवमानित करण्याचे काम चालू आहे. ही बाब महत्वाची असल्यामुळे आणि खास करुन मराठी बांधवांना आश्वासित करणे आवश्यक असल्याने यासंबंधात आजच सभागृहात निवेदन करावे

-----------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामदास कदम : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची "अंनिस" नावाची एक संस्था असून त्या समितीच्या माध्यमातूनच सभागृहात अंध:श्रध्दा विधेयक आणण्याचा प्रयत्न झाला होता. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी एक पुस्तक लिहिलेले असून त्यात त्यांनी सांगितलेले आहे की, आमच्या संस्थेला कोणत्याही प्रकारे विदेशातून फंड किंवा अनुदान मिळत नाही. मी यासंबंधी माहितीच्या अधिकारातून माहिती मिळविली असता त्यांच्या संस्थेकडे 1.50 कोटी रुपयाचा निधी जमा आहे तसेच मोठ्या प्रमाणात परदेशातून पैसे मिळतात हे उघड होत आहे. अशा प्रकारे परदेशातून पैसा घेऊन अंधश्रध्देचे निर्मूलन हा कायदा या राज्यात करुन हिंदूंच्या भावना भडकविण्याचा प्रयत्न केला जात आहे, हिंदू धर्मावर घाला घालण्याचे काम ही संस्था करीत असल्याने ती तत्काळ बंद करावी अशी मी विनंती करतो. तसेच शासनाने या संस्थेची सीआयडीच्या माध्यमातून चौकशी करावी.

-------

.......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील प्रकल्पग्रस्त व ज्येष्ठताधारक 285 कामगारांनी पूर्वलक्षी प्रभावाने नियमित करण्यासाठी 11 डिसेंबर 2011 पासून बेमुदत आंदोलन सुरु केले आहे. आज त्यांच्या आंदोलनाचा 11 वा दिवस आहे. आजच्या दिवशी या लोकांनी मुंडन आंदोलन करुन शासनाचा निषेध केला आहे. तसेच त्यांना न्याय न मिळाल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देखील कृषी विद्यापीठ समन्वय समितीचे श्री. संदेश राऊत यांनी दिलेला आहे. हे 285 लोक मुंडन करुन मागील दहा वर्षात अनेक वेळा आंदोलन करुन उपोषणाला सुध्दा बसलेले आहेत, त्यांच्याकडे शासनाने जातीने लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते बेळगांव भागातील मराठी बांधवांविषयीचा मुद्दा सभागृहात मांडत असतात तसा त्यांनी आता सुध्दा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याच धर्तीवर मी चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती या आदिवासीबहुल तालुक्यातील 12 गावांबाबतचा मुद्दा सभागृहाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करीत आहे.

जिवती तालुक्यातील परमडोकी, कोटा, जेडींगुडा, अनंतापूर, कमलापूर, पळसगुडा, माहरजगुडा व इतर पाच अशा बारा गावांमध्ये बंजारा, मातंग, दलित आणि आदिवासी समाजाचे लोक राहतात. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने बीपीएल, घरकूल, स्वस्त धान्य, वीजपुरवठा व रस्ते इ. कोणत्याही सवलती किंवा योजनांचा फायदा मिळत नाही. आंध्र प्रदेशच्या सीमेवर ही गांवे असल्याने आंध्र प्रदेश सरकारने त्या गावातून आंध्र प्रदेशात जाणारे रस्ते तयार करुन दिले आहेत. यातील 40 टक्के लोक तेलगू भाषिक असून ते स्वत:च महाराष्ट्रात राहण्यास उत्सुक नाहीत. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, या गावांमध्ये त्या राज्याची एक आणि आपल्या राज्याची एक अशा दोन दोन ग्रामपंचायती आहेत, त्यामुळे पर्यायाने तेथे दोन दोन वेळा मतदानाची प्रक्रिया होते. अशा परिस्थितीत ही गांवे आंध्र प्रदेशात जाण्याची भीती असल्याने त्या गावांकडे शासनाने विशेष लक्ष देऊन ही गांवे आपल्याच राज्यात कशी राहतील याचा सहानुभूतीने विचार करावा.

--------

........5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "विभागनिहाय संनियंत्रण समित्या स्थापन करण्याबाबत करावयाची कार्यवाही" या विषयावरील श्री. भगवान साळुंखे, वि.प.स. यांच्या दिनांक 7 एप्रिल, 2010 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 4730 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : सोबतची अधिक माहिती छापावी.)

--------

.....6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. सचिन अहिर (गृह निर्माण राज्य मंत्री) : महोदय, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (इमारतींचे परिनिरीक्षण) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी-2010/प्र.क्र.5/न.वि.32 (1), दिनांकित 8 जुलै, 2011 सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-------

श्री. सचिन अहिर : महोदय, महाराष्ट्र नगरपरिषदा (इमारतींचे परिनिरीक्षण) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक एमएमसी-2010/प्र.क्र.5/न.वि.32 (3), दिनांकित 8 जुलै, 2011 सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-------

श्री. सचिन अहिर : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सागरी मंडळ यांचा सन 2006-07 व सन 2007-08 या वर्षाचे प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------

श्री. सचिन अहिर : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन 2009-10 या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

श्री. सचिन अहिर : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन 2009-10 या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

.....7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (कृषी व पशुसंवर्धन राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचा सन 2008-09 व सन 2009-10 या वर्षाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

श्री. सचिन अहिर (गृह निर्माण राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन 2007-08, 2008-09 व 2009-10 या वर्षांचे अनुक्रमे छत्तीसावा, सदतीसावा व अडतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

श्री. सचिन अहिर : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2010-11 या वर्षांचा चाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री. गुलाबराव देवकर (कृषी व पशुसंवर्धन राज्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, पुणे यांचा सन 2007-08 या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

------

यानंतर श्री. जुन्नरे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ ST/ 12:40

**पृ.शी./मु.शी.**:नियम 93 अन्वये सूचना.

**तालिका सभापती ( श्री. मोहन जोशी )** :सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "पनवेल (जि. रायगड) तालुक्यात तळोजा उद्योग क्षेत्रात असलेली ट्रान्सपॉवर इंजिनिरिंग लिमिटेड कंपनी सन 1999 पासून बंद असल्याचे दाखवून कामगारांवर अन्याय करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या सूचनेवर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील मच्छीमार नौका हया एनसीडीसी या केंद्राच्या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य घेऊन बांधण्यात आलेल्या असतांना या नौकांवर पर्सनेट बसवून नियमबाहय बाब केल्याचे उघड होणे, सदर नौकांचे कर्जही थकित असणे, या बाबत मच्छीमारांमध्ये निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या सूचनेवर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, गोपीकिसन बाजोरिया यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गोरगरीब नागरिकांच्या संचालयनी या इन्व्हेस्टमेंट कंपनीमध्ये कोटयावधी रुपयांच्या ठेवी बुडित असणे, त्यामुळे कंपनीने बांधलेल्या निवासी व वाणिज्यिक संकुलातील सदनिका शासनाने जप्त करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या सूचनेवर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयात वागदे, सावरवाडी येथे बांधण्यात आलेला साकव चुकीच्या जागी विना परवाना बांधण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या सूचनेवर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस,श्री. संजय केळकर यांनी "चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील आदिवासी नक्षल भागातील 5 ते 12 वी च्या मुलींमध्ये रक्ताचे नमुने तपासले असता रक्ताक्षयाने बाधित असलेले आढळून आल्याने निर्माण झालेला आरोग्याचा प्रश्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या सूचनेवर शासनाने निवेदन करावे. ..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "पंचायत राज संस्थांच्या सुसूत्रता व परदर्शकता आणण्याच्या हेतूने केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने सर्व राज्यामध्ये ईपीआरआय हा प्रकल्प राबविण्याचा घेतलेला निर्णय व त्यानुसार हा प्रकल्प राबविण्यासाठी खामगाव, पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायतीच्या 13 व्या वित्त आयोगाच्या निधीमधून रुपये 42,000/- परस्पर वर्ग केल्यामुळे ग्रामपंचायतीच्या निधीवर पडलेला आर्थिक बोजा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या सूचनेवर शासनाने निवेदन करावे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील वाघांच्या संरक्षणाकरिता धोरण राबविणे

**मु. शी.** : राज्यातील वाघांच्या संरक्षणाकरिता धोरण राबविणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ. पतंगराव कदम ( वने मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या निवेदनामध्ये फार मोठी संदिग्धता आहे. सभापती महोदय, 5 वाघांचा मृत्यू झालेला आहे, असे मी म्हटले होते परंतु मी जे काही सांगितले ते टाईम्स ऑफ इंडिया तसेच वाईल्ड लाईफ प्रोटेक्शनच्या रिपोर्टवरुनच सांगितले आहे. शासनाने निवेदनात असे म्हटले आहे की, केवळ 3 वाघांचाच मृत्यू झालेला आहे. वाघांच्या अंतर्गत लढाईमुळे एका वाघाच्या पिल्लाचा मृत्यू झालेला आहे. दुस-या घटनेत केबल तोडल्यामुळे एका वाघाचा मृत्यू झ ाालेला आहे व शिकारीसाठी लावलेल्या फासामुळे एका वाघाचा मृत्यू झालेला आहे. तीन वाघांच्या सांगाडयापैकी आपल्याला दोनच वाघांचे सांगाडे सापडलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा पहिला प्रश्न असा आहे की, दोन वाघांच्या प्रकरणामध्ये आपण नेमकी कोणती कार्यवाही केलेली आहे, जंगलामध्ये केबल कोठून आली ? वन विभागामध्ये फॉरेस्ट गार्डची अनेक पदे रिक्त आहेत व रिक्त असलेली पदे कधी पर्यंत भरली जाणार आहेत ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, देशात 51 वाघांचा मृत्यू झालेला असला तरी महाराष्ट्रात केवळ तीनच वाघांचा मृत्यू झालेला आहे. एका वाघाचे पिल्लू अंतर्गत लढाईमुळे मृत्यू पावले आहे. दुस-या प्रकरणात वाघाने ताराचे कंपाऊंड कुरतडल्यामुळे त्याचा मृत्यू झालेला आहे व तिस-या प्रकरणात वाघाचा नैसर्गिक मृत्यू झालेला आहे.

सभापती महोदय, दोन वाघांचे सांगाडे सापडले असून त्यासंदर्भात पोलिसांनी कार्यवाही केलेली आहे. आंध्र प्रदेशात वाघाची शिकार झाली असून त्या वाघाचे सांगाडे आपल्या राज्यात टाकण्यात आलेले आहेत व त्या संदर्भात पोलिसांनी कार्यवाही केलेली आहे. दुस-या प्रकरणात वाघाचा नैसर्गिक मृत्यू झाला आहे. त्या वाघाचे सांगाडे सापडले असून पोलिसांनी त्यावर कार्यवाही सुध्दा केलेली आहे. वन विभागात 1200 कर्मचा-यांची नियुक्ती झाली असून त्यात अजून 100 कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. नव्याने जे 4 व्याघ्र प्रकल्प केलेले आहेत त्याच्या पुर्ततेसाठी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाने सर्व पूर्तता पूर्ण केलेली आहे.

--------

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढयांमध्ये कुशल मनुष्यबळाची नेमणूक न करणे

**मु. शी.** : जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढयांमध्ये कुशल मनुष्यबळाची नेमणूक न करणे याबाबत डॉ.दीपक सावंत वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सुरेश शेट्टी ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, रक्त पेढया हा विषय राज्याच्या जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा स्तरावरील 32 शासकीय रक्त पेढयांद्वारे गरजू रुग्णांना शासकीय रुग्णालयात तसेच खाजगी रुग्णालयात रक्त पुरवठा करण्यात येतो. रक्त पेढयांच्या संदर्भात दोन तीन भाग पडतात. विदर्भातील एका रक्तपेढीचे निरीक्षण एफडीएनेच केले असे नाही तर केंद्र शासनाने सुध्दा यासंदर्भात निरीक्षण केले आहे. विदर्भातील रक्त पेढीचे निरीक्षण केंद्र सरकारने का केले ? आपण निवेदनामध्ये म्हटले आहे की, या रक्त पेढीच्या संदर्भात कोणतेही आक्षेप घेतले गेले नाहीत. त्यामुळे वर्धा जिल्हा सामान्य रुग्णालयात नेमकी काय परिस्थिती निर्माण झाली होती ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, खाजगी रक्त संकलनावर बंदी आणली जाणार आहे, असे आपण मध्यंतरी एका प्रेस कॉन्फरन्समध्ये सांगितले होते. राज्यामध्ये शासकीय रक्तपेढयांपेक्षा खाजगी रक्त पेढया जास्त आहेत. त्यामुळे रक्तपेढयाच्या संदर्भात राज्य शासनाची नेमकी भूमिका काय राहणार आहे ? खाजगी रक्त पेढयांमधून जो रक्त पुरवठा केला जातो त्याचे रेट फिक्स करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी फार महत्वाचा विषय उपस्थित केलेला आहे. वर्धा जिल्हयात नवीन ब्लड कंपोनंट सेपरेशन युनीट सुरु केले आहे. या वर्षापासून प्रत्येक जिल्हयाच्या शासकीय रुग्णालयात ब्लड कंपोनंट सेपरेशन युनीट सुरु करण्याचा तसेच प्रत्येक तालुक्यात ब्लड स्टोरेज युनीट सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रात 225 ब्लड युनीट सँक्शन करण्यात आलेले असून त्यातील 127 युनीट सुरु आहेत व 98 युनीट पुढील काळात सुरु केले जाणार आहेत. तसेच 166 ब्लड सेपरेशन युनीट मंजूर करण्यात आले असून त्यातील शासनाचे 18 युनीट सुरु आहेत. वर्धा जिल्हयात ब्लड कम्पोनंट आणि ब्लड बँकेची स्थापना केली असून त्याचे एफडीआयने इन्सपेक्शन केलेले आहे. ब्लड कंपोनंट सेपरेशन युनीटसाठी ड्रग कंट्रोलर ऑफ इंडियाची परवानगी आवश्यक असल्यामुळे त्यांचे इन्स्पेक्शन केले जात असते. ब्लड बँकेसाठी आपल्याला एफडीआय तसेच ड्रग कंट्रोलर ऑफ युनीट कडून परवानगी मिळालेली आहे.

यानंतर श्री. भारवि..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

विदर्भातील रिक्त पदांसंबंधी देखील प्रश्न विचारण्यात आला आहे. विदर्भात एकूण मंजूर पदे 44 आहेत. त्यापैकी 43 पदे भरण्यात आली आहेत. अमरावतीमध्ये 4 पदे रिक्त आहेत. सदर पदे ही आपण कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर भरली आहेत. संपूर्ण विदर्भाचा विचार करावयाचा झाल्यास आज तेथे रिक्त पदे नाहीत.

येथे माझ्या पत्रकार परिषदेचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. आपल्या राज्यात असा निर्णय घेतला आहे की, शासकीय व खाजगी ब्लड बँकेमध्ये एनबीटीसी आणि नॅकोने जे रेट ठरविले आहेत त्यानुसारच ब्लडची विक्री होणार आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पॅक्ड रेड ब्लड सेल्सचा दर 850 रूपये असा आहे. फ्रेश फ्रोझन प्लाझ्माचा दर 400 रूपये आहे. प्लेटेड कॉन्स्ट्रेटचा दर 400 रूपये आहे. फ्रोझन ब्लडचा दर 200 रूपये आहे. सदर दर हे एनबीटीसीने ठरविलेले आहेत. हे दर 1987-88 मध्ये ठरविले होते. ते अद्यापि सुरू आहेत. काही खाजगी ब्लड बँक जास्त दर आकारतात. आपल्याकडे ब्लड बँकेच्या खूप तक्रारी येतात. एवढेच नव्हे तर खाजगी रूग्णालयामध्ये सर्जरी असेल तर रूग्णांच्या नातेवाईकांना हॉस्पिटल ऑथॉरिटी ब्लड रिप्लेसमेंटसाठी चार जणांना घेऊन यावे असे सांगतात. ब्लडची रिक्वायमेंट किती असते ही पेशंटला, नातेवाईकांना माहीत नसते. पण ते चार जणांना घेऊन या असे सांगतात व प्रोसेसिंग चार्जेस घेतात. नॅशनल ब्लड पॉलिसीमध्ये स्पष्ट सांगितले आहे की, कम्प्लसरी रिप्लेसमेंट अव्हॉईड करायला पाहिजे. व्हॉलेंटरी डोनेशन मार्फत ब्लड घ्यायला पाहिजे. नॅशनल पॉलिसीमध्ये स्पष्ट सांगितले आहे की, प्रत्येक हॉस्पिटलची रूग्णांना रक्त पुरविण्याची जबाबदारी आहे. ती पेशंटची जबाबदारी नाही. या संबंधी आपण 2-3 वेळा आढावा बैठक घेतली आहे.

आपल्या राज्यात 280 ब्लड बँकस् आहेत. त्यापैकी 174 ह्या ट्रस्टच्या आहेत, तर 17 खाजगी आहेत. 77 सेमी गव्हर्मेंट व 12 रेड क्रॉस सोसायटीच्या ब्लड बँका आहेत. खाजगी ब्लड बँकांसंबंधी आपल्याकडे खूप तक्रारी येतात. आपलेच नेते सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई हे ब्लड बँक संघटनेचे अध्यक्ष आहेत. ते ब्लड बँक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना घेऊन मला भेटले. तीन दिवसापूर्वीच नागपूरचे प्रतिनिधी येऊन मला भेटले. यासंबंधी आम्ही त्यांच्या संपर्कात राहून चर्चा करीत आहोत. स्टेट ब्लड बँकेचे अधिकारी आणि खाजगी ब्लड बँकेचे पदाधिकारी यांच्या समवेत आम्ही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

चर्चा केली आहे. मी परवा देखील माझी स्पष्ट भूमिका मांडली आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई मला भेटायला आले होते तेव्हा देखील स्पष्ट भूमिका मांडली आहे की, या राज्यात कमर्शियलाझेशन ऑफ ब्लड आम्ही होऊ देणार नाही. त्यावेळी काही लोकांनी एमआरपी रेट फिक्स करावा अशी सूचना केली. नॅशनल पॉलिसी मध्ये ब्लडचा कमिर्शयल रेट ठरवू शकत नाही. मी परवा देखील सर्व प्रतिनिधींना सांगितले की, महाराष्ट्र राज्यात वाणिज्यिक पद्धतीने रक्त विकायला कोणालाही परवानगी मिळणार नाही. कोणी तशा पद्धतीने विकण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्यांच्यावर कारवाई करू.

त्यांची एकूणच मागणी होती की, 850 रूपये दर हा फार जुना आहे. इलेक्ट्रीकचे भाडे वाढले आहे, आम्हाला ऑक्ट्रॉय भरावा लागत आहे, अशा प्रकारचे त्यांचे म्हणणे होते. तेव्हा आम्ही सांगितले की, तुम्ही बसून चर्चा करून आपले प्रोसेसिंग चार्जेस किती आहेत ते आम्हाला कळवा. त्यानुसार त्यांनी रूपये 1010 ते 1030 पर्यंत ते दर निश्चित केला आहे. आमचे अधिकारी त्यांच्या सोबत चर्चा करणार आहेत. मी त्यांना सांगितले आहे की, अधिवेशन संपल्यानंतर आपण मुंबईमध्ये पुन्हा बसू या. जो काही दर ठरेल मग तो 1010 असेल किंवा 1030 असेल त्यासंबंधी केंद्र सरकारच्या नॅकोला, एनबीटीसीला आपण शिफारस करू या. यासंबंधी राष्ट्रीय पातळीवर बैठक झ ाली आहे. याबाबत मी स्वत: केंद्रीय आरोग्य मंत्र्यां बरोबर देखील चर्चा केलेली आहे. ते स्वत: नवीन रेट ठरविण्यासंबंधी बैठक घेऊन निर्णय घेणार आहेत. भारत सरकार निर्णय घेई पर्यंत आपण स्टे द्यावा असे खाजगी ब्लड बँक पदाधिकाऱ्यांचे म्हणणे होते. त्यासंबंधी सांगू इच्छितो की, आम्ही स्टे देणार नाही. आजचा जो दर आहे तोच लागू राहणार आहे. कुठल्याही रूग्णालयाने रूग्णाना ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दर लावले तर त्यांच्यावर आम्ही कारवाई करणार आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी वर्ध्याच्या बाबतीत सांगितले आहे. तसेच उत्तरात असे म्हटले आहे की, 44 मंजूर पदे आहेत. त्यापैकी 4 पदे रिक्त आहेत. मग 20 पदे आपण कंत्राट पद्धतीने का भरली आहेत ?

..3



BGO/ D/ D/ ST/ KTG/ शरद... 12:50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, विदर्भात 20 पदे भरलेली नाहीत. कृपया त्यांनी कन्फ्युज होऊ नये. काल देखील त्यांनी माझ्या प्रश्नावर गडबड केली होती. विदर्भामध्ये एकूण 44 पदे मंजूर आहेत. त्यापैकी 43 पदे भरली आहेत. एक पद रिक्त आहे. यापैकी 20 पदे ही प्रतिनियुक्तीने आणि कंत्राटी पद्धतीने भरली आहेत. ॲडिशनल लोड आहे म्हणून आपण अेमसॅक्स व नॅको मधून प्रतिनिुयक्तीने पदे भरली आहेत. कारण आपण एचआयव्ही प्रिव्हेन्शनचे काम खूप मोठ्या प्रमाणावर हाती घेतले आहे. तसेच सीकलसेलचे काम देखील हाती घेतले आहे. यासाठी आपल्याला ॲडिशनल मॅनपॉवर लागणार आहे. म्हणूनच आपण अेमसॅक्स व नॅको मार्फत क्वालीफाईड टेक्निशियन्स नेमले आहेत. वर्ध्यामध्ये फक्त दोन बी.एससी., डी.एम.एल.टी.ची दोन पदे रिक्त होती. त्यातील एक पद एनआरएचएम अंतर्गत व दुसरे अेमसॅक्समधून भरले आहे. त्यामुळे आज कुठेही रिक्त पदे नाहीत.

.....

..4

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात सातत्याने लेप्टोस्पायरोसिस रोगाचा प्रादुर्भाव होणे

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात सातत्याने लेप्टोस्पायरोसिस रोगाचा प्रादुर्भाव होणे याबाबत श्री.परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास एक बाब आणून देऊ इच्छितो की, या प्रश्नासंबंधी काल सभागृहात 24 मिनिटे चर्चा झालेली आहे. तोच विषय नियम 93 च्या सूचनेद्वार पुन्हा आजच सभागृहापुढे आलेला आहे. मी यावर उत्तर देण्यास तयार आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रश्नावर काल सभागृहात 24 मिनिटे चर्चा झालेली आहे. त्यास मंत्रिमहोदयांनी सविस्तर उत्तरे दिलेली आहेत. त्याने सन्माननीय सदस्यांचे समाधान झालेले आहे. असे असताना दुसऱ्या आयुधाचा वापर करून सन्माननीय सदस्यांनी तो प्रश्न पुन्हा आता येथे उपस्थित केला आहे. कोणत्या आयुधाचा वापर करायचा हा सन्माननीय सदस्यांचा अधिकार आहे. मी त्यावर गदा आणणार नाही. एक प्रश्नाची तड लागल्यानंतर तो प्रश्न पुन्हा पुन्हा दुसऱ्या आयुधा मार्फत येत असेल तर तो कितपत योग्य आहे याबाबत आपण निर्णय द्यावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली आणि ओरस रूग्णालयाला भेट दिली आहे काय, कणकवली येथे अधीक्षक व ओरस येथे सिव्हील सर्जन कायम स्वरूपी देण्यात येणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ओरस येथील सिव्हील सर्जनसाठी आपण ऑलरेडी फाईल मुव्ह केली आहे. कालही मी सांगितले की, जेवढी रिक्त पदे आहेत ती लवकरात लवकर भरण्याचा प्रयत्न करीत आहोत.

.......

...6

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सी-वूड,नेरूळ येथील डीएव्ही शाळेवर हल्ला करून शाळेतील शिक्षकांना तसेच माणिक विद्यामंदिर,वांद्रे, मुंबई येथील शाळेतील श्री.समीर शिर्सेकर या शिस्तप्रिय शिक्षकाला केलेली जबर मारहाण

**मु. शी.** : सी-वूड,नेरूळ येथील डीएव्ही शाळेवर हल्ला करून शाळेतील शिक्षकांना तसेच माणिक विद्यामंदिर,वांद्रे, मुंबई येथील शाळेतील श्री.समीर शिर्सेकर या शिस्तप्रिय शिक्षकाला केलेली जबर मारहाण याबाबत सर्वश्री कपिल पाटील व जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ही गंभीर घटना आहे. नवी मुंबईच्या सी-वूड येथील डीएव्ही शाळेमध्ये व त्या आधी माणिक विद्यामंदिर, वांद्रे येथील शाळेतील शिक्षकांना मारहाण करण्याच्या घटना घडल्या आहेत. अवघ्या 15 दिवसात दोन मोठ्या घटना घडल्या आहेत. या घटना वारंवार घडत आहेत. शाळांवर हल्ले होत आहेत. शिक्षकांना त्रास दिला जातो. शिक्षकांना असभ्य वागणूक दिली जाते. हे सर्व शासनाने निवेदनात म्हटले आहे. अत्यंत लज्जास्पद वागणूक दिलेली आहे. ज्यांचा काहीही संबंध नाही, कोणताही अपराध नाही अशा वेळी काही गुंड कायदा हातामध्ये घेऊन शाळेत येतात व शाळाप्रवेश किंवा अन्य खाजगी कारणांसाठी शाळांना धमकावतात. कोणी त्यास जुमानले नाही तर त्यांच्यावर हल्ले केले जातात. माझे दोन प्रश्न आहेत. माझ्या मूळ प्रश्नाला शासनाने उत्तर दिलेले नाही. शिक्षकांवर व शाळांवर हल्ले होत आहेत त्याची कारणे स्पष्ट आहेत. अशा हल्लेखोरांना आळा घालण्यासाठी हे हल्ले अजामीनपात्र गुन्हा करण्यासबंधी शासन कायद्यात बदल करणार आहे काय ? असा माझा मूळ प्रश्न होता. त्यास उत्तर आलेले नाही. ते देण्यात यावे. मुंबई आणि बृहन्मुंबई परिसरात ज्या शाळांमध्ये वारंवार प्रकार घडत आहेत त्याचे कारण ॲडमिशन आणि अन्य आहे. त्यामुळे या संदर्भात संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची बैठक आपल्या दालनात बोलावून कठोर कारवाई करण्यासंबंधी पावले उचलली जातील काय ?

यानंतर श्री.सरफरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, घडलेल्या घटनेबाबत आपण कारवाई केली आहे. या ठिकाणी अनलॉफुल असेंब्ली असेल, रॉयटींग असेल, असॉल्ट असेल ही सर्व कलमे लावण्यात आलेली आहेत. किंबहुना, या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. या माध्यमातून मला सर्वच राजकीय पक्षांना एक विनंती करावयाची आहे की, अशा पध्दतीने आंदोलने होतात त्यामधून आपण नेमके कोणते चित्र स्पष्ट करतो याचा कुठेतरी गांभीर्याने विचार केला पाहिजे. यामध्ये सामाजिक संघटना किंवा राजकीय पक्ष सहभागी असतील या सर्वांनी या बाबत कुठेतरी विचार करणे गरजेचे आहे.या ठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यासाठी आपल्याजवळ वेगवेगळी आयुधे आहेत. त्या ठिकाणी हे सर्व लोक शाळेमध्ये आल्यानंतर आणि घोषणा दिल्यानंतर प्राचार्य, मुख्याध्यापकांनी त्यांना बोलावून त्यांच्याबरोबर चर्चा करण्याचा प्रयत्न केला. या निमित्ताने मला सभागृहाच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, या तरुण आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले आहेत. त्याचे परिणाम त्या पक्षाला किंवा संधटनेला आता जाणवणार नाहीत. परंतु भविष्य काळात त्यांना जर पास पोर्ट काढावयाचा असेल किंवा रिक्शा चालविण्यासाठी लायसन्सची गरज असेल तर त्यासाठी कॅरेक्टर सर्टिफिकेटची गरज लागणार आहे. त्यामुळे या तरुणांकरिता भविष्यकाळात ती बाब अडचणीची ठरणार आहे. या करिता सर्वच राजकीय पक्षांनी आपला पक्षीय भेदाभेद बाजूला ठेवून वेगळया पध्दतीने निर्णय घेणे अपेक्षित आहे. या बाबतीत पोलीस आयुक्तांना सूचना देण्यात आल्या असून सर्वच ठिकाणी या बाबत बैठका घेऊन संबंधित शाळेमध्ये कोणत्या प्रकारची व्यवस्था असावी याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, काही गुन्हे हे वारंवार घडत आहेत ते गुन्हे आपण अजामीनपात्र करणार काय याबाबत आश्वासन द्यावे. सर्वसाधारणपणे आपण आवाहन केल्यामुळे काहीही परिणाम होणार नाही त्यामध्ये काहीही फरक पडणार नाही. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो. असे प्रकार वारंवार घडत आहेत. त्यामध्ये ज्यांचा काहीही संबंध नाही असे लोक टारगेट होत आहेत. यामध्ये शिक्षकांचा काहीही संबंध नाही, शाळेतील मुले भयभीत होतात, पालक चिंतेत पडतात, शाळेचे वातावरण बिघडते. म्हणून माझी आपणास आग्रहाची विनंती आहे की, गुन्हा अजामीनपात्र करण्याबाबत आपण पावले उचलणार काय?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांमध्ये लावण्यात आलेली कलमे ही अजामीनपात्र आहेत.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी., मु.शी.**: डहाणू (जि.ठाणे) येथील शासकीय आश्रमशाळेत होत असलेला गैरव्यवहार याबाबत सर्वश्री संजय केळकर, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. संजय केळकर, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "डहाणू (जि.ठाणे) येथील शासकीय आश्रमशाळेत होत असलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मी सभागृहामध्ये आश्रम शाळेतील गैरव्यवहाराविषयीचा प्रश्न उपस्थित केला आहे. या आश्रमशाळा रामभरोसे चालतात की काय असे कधी कधी आपल्याला वाटते. मागील वेळी माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते साहेबांनी वर्षभराचा प्लॅन सांगितला होता. त्या संदर्भात मी नेमके दोन प्रश्न विचारु इच्छितो. आपण या ठिकाणी पोटभर जेवण, अंडी, केळी, दूध देण्याचा प्रयत्न करता परंतु प्रत्यक्षात त्या शाळेमध्ये हा आहार पोहोचत नाहीत हे मी जबाबदारीने सांगत आहे. मी ठाणे जिल्ह्यातील अनेक आश्रम शाळांना वारंवार भेटी देत असतो त्यावेळी अनेक तक्रारी पुढे येत असतात. या आश्रमशाळांची दुरुस्ती होत नाही, त्या ठिकाणी मुलांना सर्पदंश होतात अशा अनेक घटना घडतात. निवेदनात सांगितल्याप्रमाणे सर्पदंशावर उपचार सुरु असतांना चार मुलांचे मृत्यू झाले आहेत. मागील वर्षी सर्प दंशाने दोन मृत्यू झाले आहेत. आश्रमशाळेची दुरुस्ती न झाल्यामुळे त्या शाळेत सर्प येऊन मुलांना चावले, त्यांना वेळेवर दवाखान्यात नेले नसल्यामुळे त्यांचे मृत्यू झाले.

माझा या बाबतीत असा प्रश्न आहे की, शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पैसे उपलब्ध असल्यामुळे टाईम बाऊंड कार्यक्रम तयार करुन त्या आश्रमशाळांच्या इमारतींची दुरुस्ती किंवा त्यांची पुनर्बांधणी करण्यात येणार आहे काय? दुसरे असे की, या निवेदनात दिलेले उत्तर चुकीचे आहे. या मुलांना निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते, त्यांना वेळेवर गणवेश दिला जात नाही, वेळेवर पुस्तके दिली जात नाहीत, औषधोपचाराची व्यवस्था केली जात नाही. या करिता आपण योग्य ती कारवाई करावयास पाहिजे ती न करता मुख्याध्यापकांवर कारवाई करता. तसेच, डहाणूचे प्रकल्प अधिकारी श्री. हडपे यांच्यावर चार्जशीट दाखल झाली असतांनाही त्यांच्यावर आपण कारवाई केलेली नाही. या करिता आपण आणखी एक समिती नियुक्त करणार आहात काय? या ठिकाणी करोडो रुपयांचा गैरव्यवहार होत असतांना या अधिकाऱ्यांना कशासाठी पाठीशी घातले जात आहे हे मला समजत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डोक्यावर बसून आश्रमशाळांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यासाठी टाईम बाऊंड कार्यक्रम तयार करणार काय? तसेच प्रकल्प अधिकारी श्री. हडपे याच्यावर आपण किती दिवसात कारवाई करणार आहात?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी आदिवासी विकास विभागासंबंधी मूलभूत प्रश्न विचारले आहेत त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. महाराष्ट्रामध्ये आश्रमशाळा स्थापन करण्याचा निर्णय झाल्यानंतर 552 शासकीय आश्रमशाळा आणि 556

श्री. संजय केळकर....

अनुदानित आश्रमशाळा काढण्यात आल्या. या आश्रमशाळांमध्ये जवळ जवळ 4 लाख विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना दैनंदिन आहार, जेवण, नाश्ता व इतर सुविधा देतो. या मुलांना आपण जर सर्व सुविधा देत आहोत तर मग या आश्रमशाळा शहराजवळ कां नको असा विचार आतापर्यन्त करण्यात आलेला नव्हता. परंतु आता शासनाने त्या निर्णयामध्ये बदल केला असून यापुढील काळात नवीन आश्रमशाळा काढीत असतांना त्या शहराजवळ किंवा तालुक्याच्या मुख्य गावाजवळ किंवा त्या गावामध्ये काढण्यात येतील. त्यामुळे जर त्या मुलांना सर्वच प्रकारच्या सुविधा द्यावयाच्या असतील तर त्या शाळा जंगलात काढण्याऐवजी शहराजवळ कां असू नयेत या करिता शासनाने निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, 552 शासकीय आश्रमशाळांपैकी बऱ्याच शाळांच्या इमारती या जुन्या झ ालेल्या, पडझड झालेल्या असून त्यापैकी 94 शाळा मार्च अखेर पूर्णपणे बांधून मिळणार आहेत. त्याकरिता आपण एक टाईप प्लॅन तयार केला आहे. त्याचबरोबर या वर्षी 135 आश्रमशाळांसाठी 640 कोटी रुपयांची व्यवस्था केलेली आहे. त्या तालुक्यामध्ये सर्वात उत्कृष्ट बांधकाम कुणाचे झाले असेल तर त्या आश्रमशाळेचे झालेले असले पाहिजे अशाप्रकारचा एक टाईप प्लॅन तयार करुन तीन वर्षामध्ये सर्व आश्रमशाळा बांधून पूर्ण करणार आहोत. 552 आश्रमशाळांपैकी 30ते 32 ठिकाणी शासकीय जमीन नसून त्यासाठी जागा संपादित करण्यात येणार आहे. त्या जागेची किंमत रेडी रेकनरपेक्षा जास्त असेल म्हणजे 30 टक्के असेल तर ती जागा प्रकल्प अधिकाऱ्यांनी घ्यावी, त्यापेक्षा 50 टक्के जास्त किंमत असेल तर ते प्रकरण आयुक्तांकडे पाठविण्यात यावे, आणि 50 टक्क्यापेक्षा जास्त व दुपटीने दर असतील तर ते प्रकरण शासनाकडे पाठविण्यात यावे. अशाप्रकारे वेगवेगळया 400 ठिकाणी आश्रमशाळेसाठी आणि वसतिगृहांसाठी जागा घेतलेल्या आहेत. त्याचप्रमाणे पुणे, नाशिक, ठाणे, औरंगाबाद, नागपूर व अमरावती या जिल्ह्यांच्या ठिकाणी एकेक हजार मुला-मुलींचे वसतिगृह बांधण्यासाठी जागा घेतल्या आहेत. फक्त दोन ठिकाणच्या जागा ताब्यात घेण्याचे राहिले आहे, नागपूरची जागा सुध्दा आठ दिवसात आमच्या ताब्यात येईल. यामध्ये पुणे, ठाणे, पिंपरी-चिंचवडची जागा ताब्यात आलेली आहे, नाशिकची जागा आपण लवकरच ताब्यात घेणार आहोत. अशाप्रकारे सर्व मुलांना शहराजवळ आणण्याच्या दृष्टीने हॉस्टेल उभारण्याचे काम हाती घेतले आहे. या इमारतीच्या विषयामध्ये शासनाकडून कार्यवाही पूर्ण झालेली आहे. त्याचप्रमाणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

त्या मुलांना जेवण दिले जाते त्यासाठी धान्य पुरविण्यामध्ये अडचणी आहेत, त्या सोडविण्यासाठी त्या प्रश्नावर आम्ही पूर्णपणे लक्ष केंद्रित केले आहे. आपण त्या मुलांना गणवेश, साहित्य देत आहोत. हे साहित्य उशिरा देण्यापेक्षा मार्च अखेरपर्यन्त शाळा सुरु होईल त्या दिवशी देण्याची कारवाई पूर्ण करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा अतिशय संवेदनशील विषय असून अनेक माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचे आहेत आणि मंत्री महोदय देखील उत्साहवर्धक असून ते संपूर्ण अभ्यास करुन आले असल्यामुळे सविस्तर माहिती देत आहेत. त्यांच्या आणि आमच्या माध्यमातून त्या खात्याच्या अधिकाऱ्यांना काही सल्ला देता आला तर बरे होईल . मी त्यांना विधेयक संमत करुन पाहिजे काय? असे विचारल्यानंतर त्यांनी "होय" असे उत्तर दिले. तर मग ही चर्चा चालू द्यावी अशी मी त्यांना विनंती केली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मी आपला आभारी आहे. याबाबतीत सांगावयाचे तर सर्व साहित्य मार्च अखेरपर्यंत प्रोसीजर पूर्ण करावयाची आहे. ज्या दिवशी शाळा सुरु होतील, त्यानंतर पहिल्या दोन आठवड्यामध्ये सर्व साहित्य मिळावयास पाहिजे असा निर्णय घेतलेला आहे आणि त्याप्रमाणे कार्यवाही सुरु केलेली आहे आणि श्री.हडपे यांना फेब्रुवारी 2011 मध्ये निलंबित केले असून त्यांच्यावर गुन्हा देखील दाखल केलेला आहे. कारण त्यांना याबाबतीत अधिकार नसतानाही त्यांनी तो वापरलेला आहे. याबाबत संबंधितांना निलंबित केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनीच प्रश्न विचारलेला होता. त्यामुळे त्यांना परत कामावर घेण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुविधांबाबतचा प्रश्न आहे. मी आपल्या माध्यमातून सन्माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून काही पदे भरण्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी काही धोरणात्मक निर्णय या सदनामध्ये शासनाच्या वतीने जाहीर केला होता. त्यावेळी त्याठिकाणी स्वयंपाकी, सफाई कामगार, पहारेकरी यांच्या नेमणुकीबाबत असे आश्वासन देण्यात आले होते की, 2011-2012 चे शैक्षणिक वर्ष सुरु होताना ही सर्व पदे भरलेली असतील आणि ते रेकॉर्डवर देखील आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, सदरहू पदे भरण्याच्या बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली आणि ही पदे केव्हा भरण्यात येणार आहेत याची माहिती देण्यात यावी. तसेच दुसरे म्हणजे या शाळांच्या वेळेच्या बाबतीत थोडासा वाद आहे. 11.00 ते 5.00 च्या ऐवजी 10.00 वाजता शाळा सुरु करण्याच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा. त्यामुळे शाळेची वेळ बदलण्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय निर्णय घेणार आहेत काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबत मी नंतर माहिती सांगतो. मात्र शाळेच्या वेळेच्या संदर्भातील जो निर्णय आहे, तो जूनपासून लागू करणार आहे. त्याअगोदर आम्ही वेळ बदलण्याची कारणे शोधलेली आहेत. कारण याबाबत बरेच प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत, बरीच चर्चा झाली आहे आणि आता आम्ही तेथे बायोमेट्रीक यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेतलेला आहे.त्यानंतर आपण सांगितल्याप्रमाणे एकाच

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते . . . .

सत्रामध्ये म्हणजे सकाळी 10.00 ते 5.00 या वेळेमध्ये शाळा भरविण्याच्या बाबतीत निर्णय घेऊ आणि तिसऱ्या व चौथ्या श्रेणीतील पदे भरण्याच्या संदर्भात स्टे असल्याने ती भरता येत नाहीत. पण शिक्षकांच्या संदर्भात आम्ही निर्णय घेतलेला आहे. त्याबाबत जो स्टे होता, तो देखील उठविण्यात आलेला आहे आणि आता शिक्षकांची भरती करु.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सभागृहामध्ये तारांकित प्रश्नाला उत्तर देताना सन्माननीय मंत्री महोदयांनी रेकॉर्डवर सांगितले आहे की, आम्ही सदरहू पदे 2011-12 पासून भरणार आहोत. त्याबाबतीत काय झाले ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी अगोदरच उत्तर दिलेले आहे की, 3 व 4 श्रेणीतील पदासाठी कॅबिनेटने ठराव केलेला आहे आणि शासनाने त्यावर स्टे दिलेला आहे. त्यामुळे सदरहू स्टे उठल्यानंतर आम्ही ताबडतोब पदे भरु.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मुळात याठिकाणी जे निवेदन दिलेले आहे, त्याच्याशी संबंधित ही सगळी उत्तरे आहेत हे योग्य आहे. परंतु आदिवासी आश्रमशाळेमध्ये जी मुले रहातात, त्यांचा आकस्मिक मृत्यू होतो, काही जणांचे उपचाराच्या दरम्यान मृत्यू झालेले आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, जेव्हा कधी या आदिवासी आश्रमशाळा मुख्य ठिकाणी आणल्यानंतर मग त्यांची सर्व व्यवस्था कराल. खरे म्हणजे आपण नाराज होऊ नका, पण मला हे सर्व "मुंगेरीलाल के सपने" सारखे वाटत आहे. म्हणून मला आपल्याला असे विचारावयाचे आहे की, राज्यामध्ये बाल हक्क आयोग आहे. त्याचबरोबर बालकांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या बऱ्याच सी.आर.सी म्हणजे चाईल्ड राईटस् कमिट्या या शासनाने नेमलेल्या आहेत. त्यामुळे यासंदर्भातील ज्या तक्रारी आहेत, त्याबाबत आदिवासी कल्याण विभाग आणि चाईल्ड राईटस् कमिट्या आहेत त्यांच्याशी तुम्ही जुळवून का घेत नाही ? कारण ह्या कमिट्या सरकारच्याच आहेत. ते एन.जी.ओ.नाहीत. या मुलांचे हितरक्षण होत नसेल तर कोर्टाने दखल घेण्याच्या अगोदर तुमच्या अधिकाऱ्यांना बालहक्क आयोग आणि चाईल्ड राईटस् कमिट्यांकडून काही सूचना किंवा मार्गदर्शन मिळू शकेल.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, तशा प्रकारच्या सूचना दिल्या जातील आणि या बरोबरच शाळेमध्ये मुलांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या आई-वडिलांना सानुग्रह अनुदान म्हणून जी मदत देत होतो, त्यामध्ये दोन-तीन वेळेला बदल झाला. सुरुवातीला 5 हजार आणि नंतर 15



APR/ D/ KTG/ 13:10

हजार अशा प्रकारे मदत देण्यात येत होती. पण आता अशा घटनेमध्ये मदत देत असताना त्यात वाढ करुन ते 75 हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,मला थोडासा वेळ द्यावा.आम्ही आश्रमशाळेच्या बाबतीत अनेक प्रश्न उपस्थित केले, पण कधीही समाधानाकारक उत्तरे मिळाली नाहीत. आता सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर साहेबांच्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही सगळे लेखन साहित्य देतो. पण माझ्याकडे पंचनामा आहे. दाभोळसा आश्रमशाळा, जव्हार जिल्हा, ठाणे येथील विद्यार्थ्यांना पाट्या दिल्या गेल्या.

(सन्माननीय सदस्यांनी सदरहू पाटी सभागृहामध्ये दाखविली.)

या पाटीवर कोणी काही लिहू शकते काय ? अशा प्रकारच्या पाट्या तुमच्या आश्रमशाळेमध्ये दिल्या जातात. याचा पंचनामा दिनांक 19-09-2011 रोजी केलेला आहे. याठिकाणी आश्रमशाळेतील मुलांना लेखन साहित्य दिले जाते असे सांगण्यात येते. परंतु अशा प्रकारच्या पाटीवर कोणता विद्यार्थी लिहू शकेल ? आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची ही क्रूर चेष्टा आहे. तसेच या विद्यार्थ्यांना दोन-दोन वर्षाची जुनी पुस्तके देण्यात येतात. त्यांना दोन-दोन वर्षे कम्पॉस-बॉक्स दिले जात नाही. तेथे प्रयोगशाळा नाही मग अशा स्थितीमध्ये तेथील विद्यार्थ्यांना काय शिकविणार आहात ? येथील विद्यार्थ्यांना कशा प्रकारच्या गोष्टी देत आहात हे मी तुम्हाला दाखवितो.

सभापती महोदय, तेथील विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी दिलेला हा साबण पहावा. त्यांना "लाईफ बॉय" साबणाच्या ऐवजी "लाईट बॉय" साबण आंधोळीसाठी दिलेला आहे. ही कंपनी कोणती आहे ते माहिती नाही. "लाईफ बॉय" चे नाव बदलून ते "लाईट बॉय" केले. परंतु अशा प्रकारचा साबण विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी दिला जातो.तसेच हा कपडे धुण्याचा "साबरमती साबण" आहे.आपण महात्मा गांधीजींचे नाव घेता असता.पण प्रत्यक्षात तुम्ही लोकांना फसवित आहात. या साबणाची संपूर्ण वडी विद्यार्थ्यांनी कपडे धुण्यासाठी वापरावयाची आहे. अशा प्रकारे यांच्याकडून विद्यार्थ्यांची क्रूर चेष्टा करण्यात येत आहे आणि त्याबाबत कोणतीही कारवाई होत नाही. यासंबंधातील प्रश्न टाळण्यात येतात. आदिवासी विभागाकडे करोडो रुपयांचा निधी येतो. तसेच त्याठिकाणी देण्यात येणारी "कोलगेट" पेस्ट पहावी. पण ती कोणत्या कंपनीची आहे ते पहावे. त्याचप्रमाणे हे टॉप क्रीम असून ते विद्यार्थ्यांना अंगाला लावण्यासाठी दिले जाते.त्यामध्ये इनग्रिडीयंटस् आहेत ते पहावे आणि या सर्व गोष्टी एफ.डी.ए.कडे तपासणीसाठी पाठवावे म्हणजे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची कशा प्रकारे क्रूर चेष्टा सुरु आहे ते समजेल. खरे म्हणजे हे सर्व पाहिल्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी राजीनामा द्यावयास पाहिजे आणि असे प्रकार केवळ जव्हार, ठाणे येथील आश्रमशाळांमध्ये होत आहेत असे नाही तर यांच्या काळामध्ये मेळघाट पासून नंदूरबारपर्यंत हे सगळे राजरोसपणे सुरु आहे. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील एकतरी आश्रमशाळा दाखवावी की, जेथे असे होत नाही. तसेच या मुलांना कोणते तेल द्यावयाचे हे लिहिलेले असते, पण "सन राईज" नावाचे किर्ती कंपनीचे तेल दिले जाते.

सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, ही आश्रमशाळेतील मुलांची क्रूर चेष्टा आहे, हे सगळे थांबविण्यात यावे. कारण यामध्ये करोडो रुपये खर्च होत आहेत. तसेच या ठिकाणी सांगण्यात आले की, 42 आश्रमशाळांसाठी जागा उपलब्ध नाही. ठाणे जिल्ह्यामध्ये कुडाच्या भिंतीमध्ये आश्रमशाळा चालविली जाते. अशा अनेक आश्रमशाळा आहेत. आता जो निधी प्राप्त झाला आहे, त्यातून मुलींसाठी न्हाणी-घरे बांधणार नाहीत. तेथील मुली आजही नदीवर आंघोळ करणार. त्यांच्यासाठी शौचालय नसणार. तसेच माननीय मंत्री महोदयांनी तेथील शौचालयामध्ये जाऊन दाखवावे, माझे त्यांना चॅलेंज आहे की, एकतर मी तरी राजीनामा देतो किंवा माननीय मंत्री महोदयांनी तरी राजीनामा द्यावा. माननीय मंत्री महोदय, आपण आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची इतकी क्रूर चेष्टा करु नका. तेथील विद्यार्थ्यांना जी पाटी देण्यात येते, ती मी येथे दाखविली आहे आणि ते आश्रमशाळेच्या संबंधातील प्रश्न नाहीत काय ? याचे उत्तर द्यावे. परंतु जर हे प्रश्न नसतील तर मी मग बाहेर निघून जातो. त्यामुळे श्री.खोजरे आणि श्री.हडपे यांच्यावर क्रिमिनल प्रोसीडींग केल्याचे सांगितले आणि हे सर्व श्री.हडपे यांच्या काळात घडलेले आहे. पण त्यांना वाचविण्यात आले. याबाबतीत कोणत्याही प्रकल्प अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही. हा स्वतंत्र हिंदुस्थान आहे काय ? हा प्रगत महाराष्ट्र आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे म्हणणे संपले असेल तर मला याबाबत सांगता येईल.

(सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत बसून बोलतात.)

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न विचारण्याच्या ऐवजी बाकीच्याच गोष्टी सुरु आहेत. सन्माननीय सदस्यांना प्रश्नाचे उत्तर हवे की नको.

(सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत बसून बोलतात.)



श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा भांडणाचा विषय नाही. मी प्रश्नाचे उत्तर देतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या सगळ्या गोष्टींबाबत काय कारवाई करण्यात येणार आहे ते माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपण आश्रमशाळा सुरु केल्या, तेव्हा त्यामागचा मूळ उद्देश असा होता की, आदिवासींच्या मुलांना शिकावयास मिळाले पाहिजे. त्यावेळी आश्रमशाळा काढत असताना त्या-त्या भागातील म्हणजे जंगल भागामध्ये किंवा ज्याठिकाणी सोयी नाहीत तेथे काढलेल्या आहेत. आश्रमशाळा सुरु करीत असताना तेथील जागा पाहता त्याठिकाणी साध्या इमारती बांधण्यात आल्या. कारण त्यावेळी तेथील मुलांना शिकविणे हा त्यामागील मूळ उद्देश होता आणि हे काम 1972 सालापासून सुरु आहे. नंतर माझ्याकडे या विभागाचा कारभार सोपविण्यात आल्यानंतर सगळया भागातील आश्रमशाळांच्या इमारती दुरुस्त झाल्या पाहिजेत या दृष्टीकोनातून यावर्षी आपण 94 आश्रमशाळांची कामे पूर्ण करीत आहोत आणि बाकीच्या आश्रमशाळा टप्प्याटप्प्याने पुढील तीन वर्षामध्ये पूर्ण करीत आहोत आणि त्यासाठी आपण निधी सुध्दा दिलेला आहे हा एक भाग झाला.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ...

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, 464 वसतिगृहांना परवानगी देण्यात आली होती त्याप्रमाणे ती वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत. 464 वसतिगृहांपैकी फक्त 28 वसतिगृहांसाठी जागा होती. गेल्या दोन वर्षामध्ये 250 ठिकाणी जागा घेतलेल्या आहेत आणि त्या ठिकाणी वसतिगृहे बांधण्यास सुरुवात केलेली आहे. टुथपेस्टपासून सर्व वस्तू दिल्या पाहिजेत, अशा प्रकारचा दंडक घातलेला आहे आणि त्या पध्दतीने या वस्तू देण्यात येतात त्या संदर्भात शासनाकडून आर.सी. करण्यात आलेली आहे आणि खादी ग्रामोद्योगकडे हे काम दिलेले आहे. कारण या वस्तू बाजारातून खरेदी करण्यात आल्या तर पुन्हा त्यावर चर्चा होते. जेथे खरेदी करण्यात येते तेथे अडचण आहे ही वस्तुस्थिती आहे. मग या वस्तू कोणाकडून घेतल्या पाहिजेत. त्यासाठी खादी ग्रामोद्योगला सांगण्यात आले.

सभापती महोदय, या संदर्भात 1995 साली समित्या तयार करण्यात आलेल्या आहेत. काय खरेदी करावे आणि काय खरेदी करु नये हे राज्य पातळीवर ठरत नाही तर त्यासाठी आयुक्त पातळीवर 1,2,3,4 अशा प्रकारच्या समित्या नेमलेल्या आहेत. त्या समित्यांच्या सदस्यांनी स्थानिक बाजारपेठेची माहिती घेऊन खरेदी करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. कारण या वस्तू बाजारातून घेतल्या शिवाय त्या ठिकाणी देता येणार नाहीत. त्या ठिकाणी ज्या वस्तू देण्यात येतात त्यामध्ये सुधारणा केली पाहिजे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे ते बरोबर आहे. म्हणून या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार करुन प्रत्येक आश्रमशाळेला या वस्तू कशा असाव्यात हे कळविलेले आहे. उदा. पाटी अमुक अशा प्रकारची असावी असे कळविलेले आहे. अन्नधान्याच्या संदर्भात सॅम्पल तयार करण्यात आले आणि ते प्रत्येक आश्रमशाळेला पाठविण्यात आलेले आहेत. तसेच सकाळी सूर्य उगवल्यानंतर सूर्यास्तापर्यंत धान्याची गाडी आली तरच ते धान्य उतरवून घेण्यात यावे अन्यथा ते उतरवून घेण्यात येऊ नये. तसेच ते धान्य सॅम्पल प्रमाणे असेल तरच ते घेण्यात यावे अन्यथा ते घेण्यात येऊ नये. जर सॅम्पलप्रमाणे अन्नधान्य घेतले नाही तर कारवाई करण्यात येईल असे सांगण्यात आलेले आहे. याचा मला चांगल्या प्रकारचा अनुभव आलेला आहे. चार-पाच ठिकाणी चुकीचे ट्रक गेले ते परत पाठविण्यात आले आहेत. या संदर्भात तक्रारी करण्याऐवजी काही तरी इलाजच केला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते.... .

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचे या विषयाकडे जास्त लक्ष आहे. ते आश्रमशाळांना भेटी देतात ही गोष्ट खरी आहे. आपण श्री. हळपेच्या संदर्भात सांगितले त्यांना सस्पेंड करण्यात आले आहे. त्यांना परत घेण्यात येणार आहे असे आपल्याला कोणी तरी सांगितलेले आहे पण त्यांना अजिबात परत सेवेत घेण्यात येणार नाही. मी या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यापासून 9 लोकांना सस्पेंड करण्यात आले आहे आणि हे श्री. हळपे दहावे आहेत. यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्यात येणार नाही. आदिवासी विकास विभाग पहिल्यांदाच बिगर आदिवासी मंत्र्यांकडे देण्यात आलेला आहे, या विभागामध्ये काही तरी सुधारणा व्हावी, या दृष्टीकोनातून तो देण्यात आलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे ती परिस्थिती खरी आहे. शाळेचा वर्ग सकाळपासून दुपारपर्यंत असतो आणि दुपारी सुट्टी देण्यात येते हे बरोबर नाही. पण जंगलामध्ये शिक्षक येतात की नाही, हे कोण पाहणार? शाळा कधी भरते तर शिक्षक आल्यावर, सुटते कधी तर शिक्षक गेल्यावर. शाळेला सुट्टी कधी असते तर ज्या दिवशी शिक्षक येत नाहीत त्या दिवशी सुट्टी असते असे सांगण्यात येते. तेव्हा यातून काही तरी मार्ग काढला पाहिजे. म्हणून हजेरीच्या संदर्भात व्यवस्था केलेली आहे. बायोमॅट्रिक सिस्टिमने हजेरी घेतली तर यामध्ये आपोआप सुधारणा होईल त्याप्रमाणे यामध्ये सुधारणा झालेली आहे. यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. औषधे मिळत नाहीत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या गोष्टी सांगितेल्या आहेत त्या गोष्टी मी नाकारत नाही. पण ज्यांच्याकडून खरेदी करण्यास सांगण्यात आलेले आहे त्यांच्याकडून खरेदी करण्यात आलेली आहे. त्यासाठी वेगवेगळ्या समित्या आहेत. या समित्यांमध्येही गैरव्यवहार होत असेल तर सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी माहिती दिलेली आहे त्यासंदर्भात चौकशी करण्यास मी तयार आहे आणि त्यामध्ये जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर या पूर्वी ज्या प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे त्याप्रमाणे कारवाई करण्याची शासनाची तयारी आहे.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत यांनी अत्यंत गंभीर मुद्दे या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. त्याला सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. त्या उत्तरामध्ये त्यांनी

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार. . .

असे सांगितले की, " ही सर्व खरेदी आयुक्तालयाकडून होत आहे." जर या विभागाच्या आयुक्तालयाकडून ही खरेदी होत असेल तर त्या आयुक्तांना जबाबदार धरण्यात यावे. आयुक्तांच्या नेतृत्वाखाली अशा प्रकारची खरेदी होत असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. माझा दुसरा प्रश्न असा की, या राज्याचे राज्य मंत्री डॉ. राजेंद्र गावित हे पुण्यातील आश्रमशाळांमध्ये आचानक गेले आणि त्या ठिकाणी मुलांना देण्यात आलेले जेवण अधिकाऱ्यांना खावयास सांगितले पण अधिकाऱ्यांना ते जेवण खाता येत नव्हते, अशा प्रकारचे निकृष्ट अन्न व वस्तू देण्यात येतात ही खरोखरच क्रूर थट्टा आहे. म्हणून या मध्ये जे कोणी दोषी आयुक्त असतील किंवा आणखी कोणी असतील त्यांच्यावर शासनाने कठोर कारवाई केली पाहिजे ती शासन करणार का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. आता पर्यंत 19 प्रकल्प अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे आणि 13 जणांच्या विरोधात क्रिमिनल गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

तालिका सभापती ( श्री. मोहन जोशी ) : खरे म्हणजे या निवेदनावर बराच वेळ चर्चा झालेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या सर्व प्रॉडक्टची सत्यासत्यता तपासण्यासाठी हे सर्व प्रॉडक्ट एफडीएकडे पाठवून याची चौकशी करणार का? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, राष्ट्रीय उपभोक्ता संघ म्हणजे किराणा मालाचे दुकान चालविणारे लोक आणि खादी ग्रामोद्योग कमिशन म्हणजे कपडे शिवणारे लोक हे या प्रॉडक्टचा आणि औषधांचा दर्जा तपासून बघण्यासाठी सक्षम आहेत का? या बाबतीत राज्य सरकार किती धूळफेक करीत आहे, हे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. यांच्याकडे काम देण्यात येते म्हणजे यातून अधिकारी सुटतात, मंत्री महोदय सुटतात कारण हे सर्व शासकीय आहे. सभापती महोदय, राष्ट्रीय उपभोक्ता संघ सक्षम आहे का आणि औषधांचा दर्जा तपासण्यासाठी खादी ग्रामोद्योग सक्षम आहे का कारण हे सर्व एफडीएच्या अंतर्गत येते.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सूचवतील त्या सक्षम अधिकाऱ्याकडून तपासणी करण्यात येईल आणि सदर तपासणी अहवालाच्या अनुषंगाने कारवाई केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी ज्या वस्तू दाखविलेल्या आहेत त्यांच्यावर केवळ इंग्रजी भाषेतून लिहिलेले आहे. मराठी भाषेच्या संदर्भात महाराष्ट्र राज्यामध्ये कायदा करण्यात आलेला आहे. त्यामुळे इंग्रजी भाषेबरोबरच मराठी भाषेतसुध्दा लिहिले गेले पाहिजे. आश्रमशाळांसाठी मोठया प्रमाणात खरेदी करण्यात येते. आणि ती फक्त महाराष्ट्रातील आश्रमशाळेसाठीच करण्यात येते. असे असताना फक्त इंग्रजीभाषेमध्ये लिहिलेल्या वस्तू खरेदी का करण्यात येतात? महिला उद्योजकांच्या माध्यमातून ही सर्व खरेदी करण्यात येते. कोटयवधी रुपयांची ही खरेदी आहे. लाखो मुलांना कोलगेटचे डबे दर महिन्याला दिले जातात. महाराष्ट्रातील आश्रमशाळांसाठी ज्या कोलगेटच्या डब्यांची निर्मिती करण्यात येते त्या डब्यांवर मराठीतून लिहिले पाहिजे. त्यावर फक्त हिंदी आणि इंग्रजीतून लिहिलेले आहे. तेव्हा शासन या संदर्भात आग्रह धरणार आहे का? शासनाने कालच या संदर्भात समिती नेमलेली आहे. आज विधान परिषदेच्या प्रेक्षक गॅलरीमध्ये 200 मुले बसलेली आहेत त्यांच्यापुढे शासनाचे धोरण गेलेले आहे. सभापती महोदय, हे गंभीर आहे. शासनाने महाराष्ट्राची अस्मिता सांभाळली पाहिजे तेव्हा या बाबतीत आदेश देण्यात यावेत अशी माझी विनंती आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात पूर्ण चौकशी केली जाईल. औषध आणि पूरक पोषण आहाराचा प्रस्ताव हा आरोग्य विभागाकडून दिला जातो तरी सुध्दा या संदर्भात आदिवासी विभागाकडून चौकशी केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी जे मांडलेले आहे त्यापेक्षा सन्माननीय सदस्य श्री. उल्हास यांनी जे मांडलेले आहे ते भयंकर आहे. तरी देखील आपण आश्रमशाळेतील मुलांना न्याय देण्यासाठी वेळ दिलेला आहे, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देऊ इच्छितो.

----

..5...



**नियम 93 अन्वयेच्या सूचनेबाबत**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : थोडया वेळा पूर्वी नियम 93 अन्वयेच्या सूचना विचारात घेण्यात आल्या होत्या त्यातील एक सूचना राहून गेली होती ती आता घेण्यात येत आहे.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "ज्याअर्थी शिवतेज आरोग्य सेवा संस्था संचलित छत्रपती संभाजी राजे सेनिक शाळा, जामगे, ता.खेड,जि.रत्नागिरी या संस्थेच्या शाळेचा इमारत भाडे प्रस्ताव श्री. भालचंद्र देसले, शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्याकडून पत्र क्र.सैशा/भाडे प्रस्ताव/रत्नागिरी/15 क 7/ 11860 संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-1, दिनांक 30/9/2010 रोजी कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना पाठविण्यात येणे आणि

ज्याअर्थी, असे असतानाही संबंधित विभागाकडून अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी या संस्थेवर आर्थिक भार पडत असून त्यांचा परिणाम शाळेवरील कारभारावर पडत असणे आणि

ज्याअर्थी, शासनाने तातडीने सदरहू प्रस्तावावर निर्णय घेऊन या संस्थेच्या शाळेच्या इमारतीचे भाडे देण्याची आवश्यकता आणि

त्याअर्थी, या गंभीर विषयी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करते."

" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---

आता आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये क्रमांक तीनवर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना प्रथम घेण्यात येईल. त्यानंतर कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्ययात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमाप्रमाणे घेण्यात येतील.

..6...



**पृ. शी.** : सातारा वाई येथील मांढरदेवीमधील काळेश्वरी देवीच्या मंदिरात झालेली चोरी.

**मु. शी.** : सातारा वाई येथील मांढरदेवीमधील काळेश्वरी देवीच्या मंदिरात झालेली चोरी यासंबंधी श्रीमती दिप्ती चवधरी,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्वश्री मोहन जोशी, सुभाष चव्हाण, एस.क्यू. जमा, वि.प.स.

यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती दिप्ती चवधरी ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" सातारा वाई येथील महाराष्ट्रातील प्रसिध्द मांढरदेवीमधील काळेश्वरी देवीच्या मंदिरात देवीचा मुकुट, पादुका,शिवपिंड अशा सुमारे साडे पाच लाख रुपये किंमतीची 11 किलो चांदीची चोरी झाल्याची दि.7 डिसेंबर,2011 रोजी उघडकीस येणे, या चोरीमुळे राज्यभरातील तीर्थक्षेत्रांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला असून त्यामुळे स्थानिकांमध्ये व भाविकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत पोलीस यंत्रणेने त्वरित आरोपींना अटक करुन कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. आर.आर.पाटील( गृह मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7..

21-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) O-7

SMT/ D/ KTG/ 13:20

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, सातारा वाई या ठिकाणी चोरी झालेली आहे या निमित्ताने सर्व धार्मिक स्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे असे मला वाटते. लाखो लोकांचे श्रध्दास्थान असलेल्या मांढरदेवी या ठिकाणी हा चोरीचा प्रकार झालेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.

बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी ....

यापूर्वी जेजुरी येथे सुध्दा चोरी झालेली होती आणि त्याचाही तपास लवकर लागला नाही. मांढरदेवीच्या ठिकाणी मागच्या वेळी एक मोठी दुर्घटना झालेली होती. तेथे पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवलेली नाही. ज्यावेळी ही घटना झाली त्यावेळी सुरक्षा रक्षक कोठे होते, अशा घटना वारंवार घडू नये म्हणून काही उपाययोजना त्या ठिकाणी करण्यात येणार आहे का, महाराष्ट्रातील सर्वच तीर्थक्षेत्रांवर पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवणार का ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, ज्या मंदिरांना अतिरेक्यांपासून धोका आहे तेथे अतिरेक्यांपासून मंदिराचे संरक्षण करण्यासाठी आपण ट्रस्ट कडून पैसे घेतो आणि काही ठिकाणी सरकारने सुध्दा सुरक्षा दिलेली आहे. परंतु तेथील मालमत्तेचे रक्षण करण्याची जबाबदारी संबंधित ट्रस्टची आहे, देवस्थान समित्यांची आहे. सरकारने या संदर्भात एक परिपत्रक काढून सगळ्या ट्रस्टना आणि सगळ्या देवस्थान समित्यांना धार्मिक स्थळामध्ये चोऱ्या होणार नाहीत अशा पध्दतीची सुरक्षा व्यवस्था आपण करावी अशा सूचना शासनाने दिलेल्या आहेत. मांढरदेवीच्या ठिकाणी सुध्दा त्यांनी 2 सुरक्षा रक्षक नेमले आहेत परंतु ते त्या दिवशी ऑफीसमध्ये झोपले होते त्यामुळे ही चोरी झालेली आहे. पुन्हा एकदा हे परिपत्रक आम्ही सगळीकडें पाठवू. सर्व देवस्थान समित्यानी आणि ट्रस्टनी मंदिरामध्ये चोऱ्या होणार नाहीत यादृष्टीने दक्षता घेण्याच्या दृष्टीने त्यांना जे काही आवश्यक असेल ते शस्त्रपरवाने देणे, त्यांना मार्गदर्शन करणे, ही कामे सुध्दा पोलिसांमार्फत केली जातील. पण सगळ्याच मंदिरांना पोलीस संरक्षण देणे ही शक्य होणारी गोष्ट नाही. ट्रस्टने या बाबतीत उदासिनता दाखवू नये आणि जर उदासिनता दाखविली तर निष्काळजीपणाचे गुन्हे सुध्दा ट्रस्टीवर नोंद केले जातील. ज्यामुळे लोकांच्या भावना दुखावत आहेत असे कळते ते त्यांच्याकडून सुध्दा होता उपयोगाचे नाही या दृष्टीने संबंधित कमिट्यांना सूचना केल्या जातील.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न नुसत्या चोरीपुरता मर्यादित नाही. मांढरदेवी हे लाखो, करोडो लोकांचे श्रध्दास्थान आहे. ही गोष्ट खरी आहे की, त्या ठिकाणी सीसीटीव्ही लावले परंतु त्या सीसीटीव्हीचे फुटेज मिळून सुध्दा आतापर्यंत तरी पोलिसांनी काही कारवाई केल्याची माहिती नाही. त्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे जे कोणी चोर होते त्यांच्या बाबतीत काय

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

झाले ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले त्याप्रमाणे जी श्रध्दास्थाने आहेत मग मंदिरे असतील, मशिदी असतील, दर्गे असतील, त्या ठिकाणी आपणा सगळ्यांना ही गोष्ट माहीत आहे की, चोरी हा विषय नाही तर ज्या अतिरेकी कारवाया आहेत त्या गृहीत धरुन आपल्या या सुरक्षा रचनेमध्ये आणखी काही बदल करण्याचा राज्य शासनाचा विचार आहे का ? एक तर जे टीव्ही फुटेज मिळाले त्याच्या आधारे अजूनही काही कारवाई झालेली नाही. हा सुरक्षेचा व्यापक प्रश्न आहे. आपण म्हणाल्याप्रमाणे हा केवळ चोऱ्यापुरता मर्यादित विषय नाही. काही अतिरेकी कारवाया सुध्दा होतात. मग मंदिरे असतील, मशिदी असतील किंवा दर्गे असतील अशी हजारो, लाखो, करोडो भारतीयांची जी श्रध्दास्थाने आहेत अशा ठिकाणी काही वेगळी सुरक्षा योजना शासन आखणार आहे का ? कारण आपण जे म्हणाला ते सगळे त्या ठिकाणी लावलेले आहे. त्या ठिकाणी सीसीटीव्ही लावलेले आहेत. तरी सुध्दा या घटना घडत आहेत. म्हणून हे सगळे गृहीत धरुन सुरक्षेच्या बाबतीत शासन काही विशेष मोहीम किंवा विशेष योजना आखणार आहे का ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, ज्या ठिकाणी धोका होण्याची शक्यता आहे अशा प्रत्येक तीर्थक्षेत्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने ऑडीट करण्यात आलेले आहे. जे संबंधित ट्रस्ट आहेत, कमिट्या आहेत त्यांनी किती सुरक्षा ठेवली पाहिजे, कशा पध्दतीची शस्त्रे बाळगली पाहिजेत, कोठे फ्रिस्कींग केले पाहिजे, कोठे लोकांना तपासून सोडले पाहिजे, कशी काळजी घेतली पाहिजे या बाबत आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित ट्रस्टबरोबर, देवस्थान समित्यांच्या बरोबर प्रत्यक्ष साईटवर जाऊन त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम केलेले आहे. शेवटी मंदिरातील मालमत्तेचे रक्षण करण्याची जबाबदारी पूर्णपणे त्या ट्रस्टींची आहे. या घटनेच्या बाबतीत मी आपल्याला सांगितले की, त्यांनी 2 सुरक्षा रक्षक नेमले होते पण ते ऑफीसमध्ये जाऊन झोपल्यामुळे चोरांना चोरी करणे शक्य झाले. योग्य ती दखल आणि योग्य ती सुरक्षा व्यवस्था त्या ठिकाणी ठेवली गेली नव्हती. जे सीसीटीव्ही फुटेज मिळाले त्यावरुन काही लोकांच्या ओळखी पटलेल्या आहेत. परंतु आताच ती माहिती डिस्क्लोज करणे तपासाच्या दृष्टीने अडचणीचे ठरु शकेल. यासाठी एक खास पथक तयार केले आहे आणि लवकरच आरोपी पकडले जातील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मांढरदेवीच्या सुरक्षेच्या संदर्भामध्ये जसे ते दोन सुरक्षा रक्षक झोपलेले होते त्याच पध्दतीने गेल्या महिनाभरात साधारणत: असे चित्र दिसते की, चोर सुध्दा मंदिरांमध्ये रुट बघून चोऱ्या करीत आहेत. आधी नाशिक-पुणे रस्त्यावर घटना झाली. नंतर पुण्यामध्ये घटना झाली. त्यानंतर आता साताऱ्याला घटना झाली. मला असे वाटते की, ते आता त्याच हायवेने सांगली-कोल्हापूरला जातात की काय ? कारण गेल्या महिनाभरात पुण्यामध्ये सारसबागेजवळ मंदिरामध्ये चोरी झाली. अनेक ठिकाणी चोऱ्या होत आहेत. मांढरदेवीच्या ठिकाणी 8 आणि 9 जानेवारीला परत यात्रा आहे. त्या यात्रेच्या संदर्भात सभापती महोदय, आपण स्वत: लक्ष घातले होते आणि दुर्घटना झाल्यानंतर आपण जाऊन एक विकास आराखडा तयार केला. त्यासाठी 11 कोटी रुपयांची तरतूद केली आणि इतकेच नव्हे तर आपण तेथील सुरक्षिततेसाठी पावले उचलावयास सांगितली. आज अशी परिस्थिती आहे की, त्या ठिकाणी चोरी झालेली आहे आणि हा विकास आराखडा सुध्दा प्रलंबित आहे. सन्माननीय गृह मंत्र्यांनी आम्हाला एक स्पष्ट सांगावे की, जी राजन कोचर समिती नेमली त्यांनी केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या संदर्भात काय परिस्थिती आहे ? त्यामध्ये गृह विभागाशी संबंधित शिफारशी आहेत, विशेष सुरक्षेच्या संदर्भात, शॉर्टसर्कीटच्या संदर्भात शिफारशी आहेत. त्यासंदर्भात प्रश्न असा आहे की, या लोकांना कोणीच वाली नाही. म्हणून चोऱ्यांच्या संदर्भात आरोपी पकडले जाणे यामध्ये आपण जे परिपत्रक सांगितले आहे त्यानुसार चोर आणि पोलीस मिळून काय करतील हा सगळा पुढचा प्रश्न आहे परंतु किती तरी मंदिरातील आरोपी पकडलेच गेलेले नाहीत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये आणि संपूर्ण राज्यामध्ये किती मंदिरांमध्ये चोऱ्या झाल्या आणि मंदिरातील दानपेट्या कशा चोरल्या जात आहेत याचा आपण आढावा तरी घ्यावा. दुसरा प्रश्न असा आहे की, मांढरदेवीची यात्रा सुरु होत आहे. त्याबद्दलच्या सुरक्षिततेचा आढावा घेण्यासाठी आपण पावले उचलणार का ?

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, मध्यंतरी कोकणात आणि सातारा जिल्ह्यामध्ये ज्या मंदिरात चोऱ्या होत होत्या ती गँग पकडण्यामध्ये पोलिसांना यश मिळाले आहे. या वर्षी ऑक्टोबर महिन्यापर्यंत जर आपण बघितले तर 99 मंदिरातील चोऱ्या उघड करण्यामध्ये आणि सगळी चोरीला गेलेली मालमत्ता हस्तगत करण्यात पोलिसांना यश आलेले आहे. मांढरदेवीमध्ये जी

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

घटना घडली होती त्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी झाली होती. कोचर समितीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तीर्थक्षेत्र विकासमधून तरतुदी करुन आपण त्याही शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु. 8 आणि 9 तारखेला मांढरदेवीची जी यात्रा आहे त्या यात्रेच्या निमित्ताने आवश्यक असलेला सगळा बंदोबस्त त्या ठिकाणी तैनात करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मंदिरांच्या सुरक्षिततेबद्दल आणि होणाऱ्या चोऱ्यांबद्दलचा हा प्रश्न आहे. ही सगळी जी मंदिरे आहेत त्यांचे सगळीकडे ट्रस्ट आहेत. या ट्रस्टला उत्पन्नाचे साधन आहे. भक्त मंडळी दानाच्या भावनेने पैसे देत असतात त्यामधून आपण बघितले तर महाराष्ट्रातील बहुतेक सगळ्या देवस्थानांचे उत्पन्न हे मोठ्या प्रमाणावर आहे. या सगळ्या ट्रस्टची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे झालेली आहे. धर्मादाय आयुक्त त्या ट्रस्टचा व्यवहार बघण्यासाठी काही तरी ठराविक टक्के पैसे घेत असतात. अशी सगळी आर्थिक तरतूद असताना या विभागासाठी, जसे आपले एस.टी. महामंडळ असेल, एमएसईबी असेल यांच्यासाठी एक विशेष पोलीस महानिरीक्षकाचे पद निर्माण केले जाते आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांच्यावर जबाबदारी दिली जाते तशा पध्दतीने या ठिकाणी अशा घटना घडू नये म्हणून गृह खात्याने धर्मादाय आयुक्ताकडे जमा होणाऱ्या निधीचा वापर करुन या सर्व देवस्थानांच्या सुरक्षिततेसाठी एक व्यापक कार्यक्रम हाती घेता येणे शासनाला शक्य होईल का ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मंदिरांमध्ये होणाऱ्या चोऱ्या, भाविकांच्या श्रध्देला बसणारा धक्का, त्यातून निर्माण होणारे कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न, हे सगळेच प्रश्न गंभीर आहेत. एखादी चोरी अन्य ठिकाणी होणे आणि मंदिरामध्ये होणे, लोकांनी भावनिक होऊन अनेक वेळा मोर्चे काढणे, आंदोलने करणे, मोडतोडी करणे अशा घटना झालेल्या आहेत. या सगळ्या बाबी विचारात घेऊन जे ट्रस्ट सधन आहेत त्यांना कम्पल्शन करण्याच्या दृष्टीने, सुरक्षेच्या बाबतीत त्यांनी पोलिसांनी सांगितलेल्या पध्दतीने पूर्णपणे उपाययोजना केल्याच पाहिजेत अशा पध्दतीचे परिपत्रक काढण्यात येईल आणि धर्मादाय आयुक्तांना सुध्दा सुरक्षेच्या उपाययोजनेच्या बाबतीत तशा पध्दतीच्या सूचना देण्यात येतील.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 बाबत**

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर क्रमांक 1 वर दर्शविलेली लक्षवेधी सूचना आज न घेता उद्या घेण्यात येणार आहे.

---------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अनंत चतुर्दशीच्या विसर्जन मिरवणुकींवर पुणे शहर पोलिसांनी मंडळांवर घातलेली विविध प्रकारची बंधने

**मु. शी.** : अनंत चतुर्दशीच्या विसर्जन मिरवणुकींवर पुणे शहर पोलिसांनी मंडळांवर घातलेली विविध प्रकारची बंधने यासंबंधी सर्वश्री अनिल भोसले, मोहन जोशी, जयवंतराव जाधव ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनिल भोसले ( पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहरात यंदाच्या 119 व्या गणेशोत्सवावर अतिरेकी हल्ल्याचे सावट असल्याने पोलिसांनी दिलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन सर्व गणेश मंडळानी केले असून देखील, अनंत चतुर्दशीच्या विसर्जन मिरवणुकीच्या एक दिवस अगोदर पोलिसांनी विविध मंडळांना नोटीसा पाठवून रथाचा आकार 10 फूट असावा असे कळविणे, तसेच रथाच्या उंचीवर बंधने घालणे, परवानगी फॉर्मद्वारे मंडळांची माहिती मागविणे, इत्यादी ऐनवेळी अशक्य असणाऱ्या अटी लागू करणे, तसेच विसर्जन मिरवणुकीत श्री च्या रथाला बैल जोड्या लावण्याची पूर्वापार परंपरा असताना व पुण्यातील एकाही मंडळाची मिरवणूक ही सुरु झाल्यापासून पाच साडेपाच तासांपेक्षा चालत नसतानाही पोलिसांनी मंडळांवर प्राण्यांच्या छळाचे गुन्हे दाखल करणे, पारंपारिक वाद्ये वाजवण्याबद्दल गुन्हे दाखल करणे, काही मंडळांनी कमी प्रमाणात तर काही मंडळानी गुलाल उधळला नसतानाही त्याबद्दल मंडळांवर गुन्हे दाखल करणे, पुणे शहरातील गणेश मंडळांवरच पुणे पोलिसांनी गुन्हे दाखल करुन सापत्न वागणूक देणे, कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, मंडळांवर पोलिसांनी आज पर्यंत भरलेले सर्व खटले राज्य सरकारने त्वरित मागे घेण्यासाठी पुणे शहरातील सर्व मंडळांच्या लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीनुसार खटले मागे घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, 1893 साली लोकमान्य टिळकांनी पुण्यात गणेशोत्सव सुरु केला आहे. या गणेशोत्सवात सर्वसाधारण कार्यकर्ते असतात. राजकारण असो किंवा समाजकारण असो, या माध्यमातून ते चांगली सुरुवात करीत असतात. मागील गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीतील कार्यकर्त्यांवर क्षुल्लक कारणे देऊन खटले भरण्यात आले आहेत. ते खटले केव्हा मागे घेण्यात येतील याबाबतची माननीय गृह मंत्र्यांनी घोषणा करावी.

गुजरात राज्य असेल, केरळ राज्य असेल तेथे रात्रीच्या वेळी वाद्य वाजविण्यासाठी परवानगी दिली जाते. त्या प्रमाणे पुणे शहरात रात्री वाद्य वाजविण्यासंबंधी शासन कोणता निर्णय घेणार आहे ? मुंबईत एका गणेश मंडळाची मिरवणूक 22 तास चालली, पुण्यातील विसर्जन मिरवणूक 27 तास चालली होती. यावेळी 3500 गणेश मंडळांनी विसर्जन केले आहे. या मंडळातील कार्यकर्त्यांवर खटले भरण्यात आले आहेत. बैलगाडीसाठी बैल वापरला म्हणून गुन्हे नोंदविले आहेत. एवढेच नाही तर बैलांना पोलीस चौकीतही नेण्यात आले होते. अशा प्रकारची कारवाई पोलिसांनी केलेली आहे. अनंत चतुर्दशी हा दिवस शासनाने राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा करण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे, कार्यकर्त्यांवरील खटले केव्हा मागे घेण्यात येतील, गुजरात व केरळ या राज्याच्या धर्तीवर पारंपरिक वाद्य रात्रभर वाजविण्याकरिता राज्य सरकार त्याकरिता कोणते प्रयत्न करणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील केंद्र सरकारचा कायदा आहे. अन्य राज्यातील माहिती मी घेतलेली नाही. पण जेथे एनजीओंची संख्या कमी आहे, तेथे कोणी बघत नाही अशा कार्यक्रमांकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत असेल. विशेषत: पुण्यामध्ये गणेशोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात साजरे करणारे कार्यकर्ते जितके आहेत तितकेच कायद्याचे काटेकोरपणे पालन होत आहे की नाही हे बघणारे एनजीओ सुध्दा तितक्याच संख्येने व उत्साहीपणे काम करीत आहेत. एका बाजूला मिरवणुकीतील आवाज किती डेसिबल आहे, त्याची इन्स्ट्रूमेंण्ट घेऊन फिरत आहेत, कोर्टात जात आहेत, त्याबाबत कोर्टाकडून विचारणा केली जाते. केंद्रीय कायद्याचे पालन करावयाचे की लोकांचा उत्साह कमी करावयाचा असा पोलिसांसमोर प्रश्न निर्माण होतो. केंद्र सरकारच्या कायद्याप्रमाणे रात्री 10 नंतर वाद्य वाजविण्याला बंदी आहे. ठराविक डेसिबलच्या पुढे कोणतीही वाद्ये वाजविता येत नाहीत. कार्यकर्त्यांना गणेशोत्सव वाजतगाजत

4....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावयाचा असतो, मिरवणूक सुरु असताना रात्रीचे 10 वाजले की कार्यकर्ते गणपतीची मूर्ती रस्त्यावरच ठेवून निघून जातात. रस्त्यावर ठेवलेल्या गणपतीच्या मूर्तीची विटंबना होऊ नये म्हणून सकाळी बंदोबस्तासाठी आलेले पोलीस रात्रभर गणपतीच्या मूर्ती सांभाळत असतात. ते कार्यकर्ते सकाळी खाऊनपिऊन ताजेतवाने होऊन पुन्हा त्यांच्या मिरवणुका सुरु करतात. याबाबतीत कार्यकर्त्यांनी तरी समजून घेण्याची आवश्यकता आहे, गणेश भक्तांनी समजून घेण्याची आवश्यकता आहे किंवा केंद्र सरकारने सुध्दा व्यवहार्य कायदे करण्याची गरज आहे. कोठे तरी तज्ज्ञ मंडळी बसतात आणि ते कायदे करतात आणि त्या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलिसांवर येते. म्हणून या कायद्यातील अट शिथिल करण्याबाबत किंवा कायद्यात बदल केले पाहिजेत अशी राज्य सरकारची आग्रहाची मागणी केंद्र सरकारला निश्चितपणे करु.

सभापती महोदय, आता एक पायंडाच पडला आहे. पहिल्यांदा गुन्हे दाखल करुन घेतले जातात. त्यानंतर विधानसभेत किंवा विधानपरिषदेमध्ये त्याबाबत चर्चा झाल्यानंतर राजकीय कार्यकर्त्यांचे गुन्हे मागे घ्यावयाचे. गुन्हे दाखल केले तरी ते मागे घेतले जाणार आहेत असे गृहित धरल्यामुळे कायद्याची जरबच कमी होत चालली आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आतापर्यंत दाखल केलेल्या गुन्हयांबाबत शासनाची सहानुभूतीची भूमिका राहील. पण आजच्या तारखेपासून राजकीय स्वरुपाचे असोत किंवा कोणत्याही प्रकारचे गुन्हे असोत कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे मागे घेण्याची भूमिका राज्य सरकारकडून घेतली जाणार नाही. अनेक वेळा काही विपर्यस्त बातम्या येत असतात. यावेळच्या मिरवणुकीसंबंधीच्या बातमीमध्ये बैलांना अटक करण्यात आली अशी बातमी छापण्यात आली होती. याबाबत मी माहिती घेतली असता बैलांना कोठेही अटक करण्यात आली नसल्याचे समजले. बैलांवर शारीरिक परिणाम झाला असल्यास डॉक्टरांना नेऊन दाखवून प्रमाणपत्र आणून दाखविण्यास सांगितल्यावर कार्यकर्त्यांनी उत्साहाने पोलीस स्टेशनमध्ये बैलांनाच आणले. पोलिसांनी बैलांना आणावे असे सांगितले नव्हते किंवा बैलांना अटकही केलेली नव्हती. प्राण्यासंबंधीचे जे कायदे आहेत त्याचेही पालन पुणेकरांनी केले पाहिजे. हा ॲक्ट आपल्या राज्यात, देशात आहे. बैलगाडीला 5 तासापेक्षा सलग बैलांना जुंपले असेल तर त्याबाबतही गुन्हा दाखल करण्याचा कायदा राज्याने केलेला आहे. काही प्रकरणाबाबत पोलिसांना स्वत:हून तक्रारी

5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

घेण्याचा अधिकार असतो. एनजीओज तक्रारी करीत असतात. चार मिरवणुकीत बैलगाडया चालविल्या म्हणून जे गुन्हे दाखल झालेले आहेत. या बैलगाडी वाल्यांनी 5 तासाचे उल्लंघन केले आहे काय हे तपासून पाहिले जाईल. बैलांवर गुन्हे दाखल केलेले नाहीत. ज्यांनी बैल नेले होते त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल केलेले आहेत. बैलांची तपासणी केली होती त्यावेळी त्यांच्यावर कोणताही शारीरिक परिणाम आढळून आलेला नसल्यामुळे त्यांच्या मालकांवरील गुन्हे परत घेण्याचा शासन विचार करील.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहरातील गणेशोत्सव हा केवळ महाराष्ट्राच्या नाही तर देशाच्या, जगाच्या नकाशावर आलेला आहे. लोकमान्य टिळकांनी या पुणे शहरात गणेशोत्सव सुरु केला. आमच्या गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते अतिशय शिस्तप्रिय आहेत. नियमांच्या संदर्भातील गोष्टी जर कार्यकर्त्यांना आगाऊपणे विश्वासात घेऊन केल्या तर यापुढील काळात अशा घटना घडणार नाहीत. मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. आमच्या पुणे शहरातील गणेशोत्सव मंडळातील कार्यकर्त्यांवर दाखल केलेले खटले मागे घेण्याबाबत आज विधिमंडळात आदेश दिले आहेत. पुणे गणेशोत्सव मंडळातील कार्यकर्त्यांची मागणी आपण मान्य केली आहे त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

**उप सभापती** : विधिमंडळाच्या इतिहासामध्ये आजचा दिवस शासनाच्या अभिनंदनाचा दिवस म्हणून कोरला जाईल. मी मंत्री महोदयांना विचारतो की, आपण मघाशी बैलांवर शारीरिक परिणाम झाला की नाही याबाबत काही उल्लेख केला होता.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, बैलांची डॉक्टरांनी आणि पोलिसांनी सुध्दा तपासणी केली होती. बैलांचे पाय सुजल्याचे आढळून आलेले नाहीत, बैलांच्या तब्येतीवर कोणताही परिणाम पोलिसांना आढळून आलेला नाही. त्यामुळे त्यांच्या मालकावरील गुन्हे परत घेण्याचा शासन विचार करील.

**उप सभापती** : पुण्यातील गणेशोत्सव मंडळातील सर्व कार्यकर्ते शिस्तप्रिय आहेत. मिरवणुकीत सहभागी बैल सुध्दा शिस्तबध्द होते. त्यामुळे त्यांच्यावर कोणताही शारीरिक परिणाम झालेला नाही.

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : पाच तास बैल उभे राहिले म्हणून त्यांची काळजी घेण्यात येत आहे. परंतु गणपतीच्या मिरवणुकीमध्ये पोलीस फोर्स चोवीस तास संरक्षण करतो, त्यांच्या बाबतीत राज्य शासन काय काळजी घेणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : अशा मिरवणुकीच्या वेळी पोलिसांची देखील काळजी घेण्यात येत असते.

श्रीृ दिवाकर रावते : माननीय गृहमंत्री म्हणाले की, पोलिसांना अपरिहार्यपणे संरक्षणाचे काम करावे लागते. त्या मिरवणुकीमध्ये एन.जी.ओ.काळजी घेत असतात. पूर्वीच्या काळी खाजगी गणवेश परिधान करुन पोलीस मिरवणुकीमध्ये बंदोबस्तासाठी फिरत होते. आता ते काम एन.जी.ओ.करीत आहेत. मी मघाशी बैलासंबंधी प्रश्न विचारला तर आपणाकडून सांगण्यात आले की, सु-मोटो केले. आता श्रीमती मिरा बोरवणकर या प्रमुख आहेत, त्यांनी नांगर, ज्योत, या सर्व गोष्टी मोजून घेतल्या. त्यांच्या बाबतची माहिती वृत्तपत्रात छापून आली होती. बैल एकाच ठिकाणी पाच तास उभे राहिले. त्या बैलांच्या जागी कोणाला जुंपावयाचे? सभापती महोदय, माझा प्रश्न वेगळा आहे. या महाराष्ट्र राज्यात तुम्ही सु-मोटो कार्यवाही करीत असाल तर त्याचा उपयोग काय ? शाहिस्तेखानाची बोटे तोडली असा उल्लेख झाला तर हे लोक व्याकूळ होतात. अफझलखानाचा कोथळा बाहेर काढला अशा वाक्याचा उल्लेख झाला तर हे लोक व्याकूळ होतात. (अडथळा) सभापती महादेय, मी कोणाचे नाव घेऊन बोललो नाही. मी जर शाहिस्तेखानाचा आणि अफझलखानाचा उल्लेख केला तर समोर बसलेल्या सदस्यांना वाईट वाटण्याचे कारण काय ? या वर्षाच्या गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीमध्ये पुतळा तसेच त्यांचे पोस्टर सोबत घेऊ नयेत असे आदेश पोलीस विभागाच्या अधिका-यांनी काढले. (अडथळा ) सभापती महोदय, मला आपले संरक्षण हवे आहे. मी या ठिकाणी कोणताही असंसदीय शब्द बोललेलो नाही. मी माननीय श्री. शरदराव पवार, माननीय अजित पवार यांना काही बोललो काय ? मी कोणत्याही प्रकारचा असंसदीय शब्द बोललो नाही तरी समोरच्या बाकावरील सदस्य आपल्या जागेवर बसून मला बोलण्यासाठी अडवीत आहेत. मी माझ्या भाषणात अफझलखानाचा उल्लेख केला, शाहिस्तेखानाचा उल्ल्ेख केला.(अडथळा)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य विषयाला सोडून बोलत आहेत...

2....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माझे मत व्यक्त करीत आहे. कृपया त्यांना खाली बसवा. ते आपल्या जागेवर उभे राहून माझ्या भाषणात अडथळा आणत आहेत. सभापती महोदय, आपण आपले अधिकार वापरुन त्यांना खाली बसण्यास सांगावे. त्यांना बोलण्याचा वसा दिला आहे काय ?

श्री. भाई जगताप : सभागृहात बोलण्याचा वसा आपल्यालाच दिला आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : आम्ही विरोधी पक्षाचे सदस्य आहोत. आम्हाला बोलण्याचा वसा देण्यात आला आहे. मघाशी माननीय मुख्यमंत्र्याचे उत्तराचे भाषण सुरु असताना देखील आपण बोलता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री आपणाकडे पहात होते. आपण खूप महान आहात. सभापती महोदय, मी अफझलखान आणि शाहिस्तेखानाबद्दलचा उल्लेख केला आहे. ते त्यांचे वारसदार आहेत की नाही याची मला माहिती नाही. पुणे गणपती मंडळांच्या कार्यकर्त्यांवर कारवाईचा बडगा उभारुन, त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. पुणे येथील गणपतीच्या मिरवणुकीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा आणि पोस्टर मिरवणुकीत आणू नका अशा प्रकारचे आदेश ज्या पोलीस अधिकाऱ्याने काढले, त्या अधिकाऱ्यास निलंबित करणार आहात काय, या महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा मिरवणुकीमध्ये आणू नये अशा प्रकारची बंदी घालणारी औलाद तुमच्या पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असेल, छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणारे अधिकारी असतील तर त्यांना आपण जाब विचारणार नाही काय ? त्यांच्यावर कारवाई का होणार नाही ? गणेश मंडळाच्या कार्यकत्यांविरुध्द पोलीस विभागाने गुन्हे दाखल केले. शिवाजी महाराजांचा पुतळा गणपती विसर्जन मिरवणुकीत आणू नये अशा प्रकारची बंदी घातली होती.

महोदय, मी सांगत असलेली माहिती खोटी असेल तर या सभागृहात पुणे जिल्हयातील अनेक सदस्य उपस्थित आहेत त्यांना विचारा. या सभागृहात पुणे जिल्हयातील सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयवंत जाधव हे देखील उपस्थित आहेत.त्यांना या बंदी बाबतची विचारणा आपण करु शकता. महाराष्ट्रातील सर्वांना या बंदी बाबतची माहिती होती. गणपती विसजन मिरवणुकीत शिवाजी महाराज यांचा पुतळा आणण्यास बंदी घालणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सांगितले की, तुम्हाला जी कार्यवाही करावयाची असेल ती करु शकता.

3..

श्री.दिवाकर रावते...

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा गणेश विसर्जन मिरवणुकीत आणू नये अशा प्रकारचा आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्या प्रकारची कारवाई केली जाणार आहे याबाबतची आम्हाला माननीय गृहमंत्र्यांकडून माहिती हवी आहे. आपण सु-मोटो कार्यवाही म्हणालात, त्यामुळे मला आनंद झाला. संदलची मिरवणूक निघते त्यावेळी तरुण वर्ग तलावारी घेऊन खेळ दाखवितात. अशा वेळी सु-मोटो कार्यवाहीच्या बाबतीत काय करणार आहात, याचा देखील या ठिकाणी खुलासा झाला पाहिजे.

श्री. आर.आर.पाटील : जेथे जेथे आक्षेपार्ह असेल मग ती कोणत्याही जातीची, कोणत्याही धर्माची, कोणत्याही जमातीची धार्मिक मिरवणूक असेल तर पोलिसांनी बंदी घालण्याची भूमिका नेहमीच घेतलेली आहे. गणेश मिरवणुकीमध्ये छत्रपतीचा पुतळा, पोस्टर आणण्यावर बंदी घातली गेली होती, याबद्दलची विचारणा केली गेली आहे. शासनाने यासंदर्भात सरसकट असे कोणतेही धोरण घेतलेले नाही. मी एक बाब या सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. अशाच एका पोस्टरवरुन सांगली शहरात मोठी दंगल झाली होती. सांगली शहरात शांतता रहावी म्हणून तेथे बैठक घेतली होती, त्या बैठकीस सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब आपणही उपस्थित होतात. आपणही त्या ठिकाणी मध्यस्थी करण्याचा व शहरात शांतता ठेवण्याचा प्रयत्न केला होता. काही लोकांच्या धार्मिक भावना भडकवून दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. ज्या परिसरामध्ये अशा प्रकारच्या दंगली भडकण्याची शक्यता असते व तशी माहिती इंटेलिजन्स कडून मिळते. त्यावेळी स्थानिक पोलीस अशा प्रकारचे निर्बंध घालण्याची भूमिका घेतात. राज्यात तसे निर्बंध घालण्याचे सरसकट धोरण नाही. पण स्थानिक परिस्थितीमध्ये कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होऊ नयेत म्हणून स्थानिक पातळीवरील पोलीस अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारचे निर्णय घेतले जातात. आपण पुणे येथील घटनेची माहिती दिली, त्याबाबतची सविस्तर माहिती निश्चितपणे घेण्यात येईल.(अडथळा)

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत. त्यांचे पूर्ण उत्तर ऐकून घ्यावे.

श्री. आर.आर.पाटील : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयामुळे धार्मिक भावना दुखावतात असे मी कोठेही म्हटलेले नाही. काही धर्माची काही आक्षेपार्ह चित्र लोकांनी लावली तर

4..



श्री.आर.आर.पाटील..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण होते.अशा पोस्टर्सच्या बाबतीत स्थानिक पातळीवर पोलीस अधिकाऱ्यांकडून निर्णय घेतले जातात. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाबद्दल आणि पोस्टरबद्दल सरसकट बंदी आणण्याचे कोणतेही धोरण राज्य सरकारने कधीही घेतलेले नाही आणि यापुढे देखील घेतले जाणार नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : अनंत चतुर्थीची मिरवणूक संपली. या गणेश विसर्जन मिरवणुकीच्या अनुषंगाने मला या ठिकाणी आवर्जून सांगितले पाहिजे की, पारंपारिक वाद्यांसाठी पोलिसांनी पूर्वी दिलेल्या सूचना आणि त्या अनुषंगाने गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांवर केलेल्या केसेस यामध्ये तफावत आहे. गणेश उत्सव मंडळाने माननीय गृहमंत्र्यांना निवेदन दिलेले आहे, ते निवेदन त्यांनी वाचले तर तेथे कशा प्रकारे केसेस दाखल करण्यात आल्या आहेत याची निश्चितपणे कल्पना येईल. गणेश मंडळास दोन कमानी उभारण्यास परवानगी दिलेली होती. बऱ्याच मंडळांनी एकच कमान बांधली तरी मंडळाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारण नसताना गुन्हे पाठीमागे घ्यावेत अशी मागणी कोणी सदस्य करीत नाही. गुन्हे पाठीमागे घ्या, या सभागृहात बैलाचा प्रश्न आला आहे. त्यास विनोदाचे स्वरुप सदस्यांकडून दिले गेले आहे. परंतु मी फरासखाना पोलीस स्टेशनमध्ये जाऊन यासंबंधीचा एफ.आय.आर. वाचला आहे. तो एफ.आय.आर. माननीय गृहमंत्र्यांकडे पाठविलेला आहे. त्या एफ.आय.आर.मध्ये नमूद करण्यात आले आहे की, पाच तास बैल चालले. त्या बैलांनी रस्त्यात शेण टाकले. त्यावरुन काही लोक घसरले. आम्ही पोलिसांना विचारले की, तुमचे शत्रू तुमच्या विभागात बसले आहेत काय? अशा प्रकारचा एफ.आय.आर.नोंदला त्यामुळे पोलिसांची पूर्णपणे शोभा झाली.

महोदय, कसबा पेठ गणपतीची विसर्जन मिरवणूक अतिशय वेळेवर संपली. तरी देखील कसबा पेठेतील गणेश मंडळातील कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्या ठिकाणी 10 हजार महिला गणपतीच्या मंडपात बसून अर्थव शिर्ष् म्हणून देवाची भक्ती करतात. ढोल-ताशे वाजवितात. जी पारंपारिक वाद्ये आहेत, तबला, मृदुंग, टाळ यांच्या आवाजावर तुम्ही बंदी आणता. या पारंपारिक वाद्यांचा आवाज किती डेसिबल येतो याची एकदा तपासणी झाली पाहिजे. पुणे, ठाणे आणि मुंबई शहरापूरता हा प्रश्न मर्यादित नाही. शिस्त म्हणजे काय, कायद्याची अंमलबजावणी कशी करावयाची या बाबतीत पोलिसांमध्ये सुस्पष्ट धोरण नसल्यामुळे गणेश उत्सवावर कळत न कळत धार्मिक आणिबाणी

5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नीलम गोऱ्हे...

आणण्याचा प्रयत्न करीत आहे की काय अशी भावना राज्यातील सर्व लोकांमध्ये झालेली आहे. आज आपण गुन्हे मागे घ्याल. तुम्ही सगळया पोलीस स्टेशनमधील एफ.आय.आर.तपासा. त्यांना कळत न कळत बाजुला टाकण्याच्या दृष्टीने ढोल, ताशे वाजविणाऱ्यांवर तसेच गणेश मंडळाच्या कार्यकत्यांवर सुडबुध्दीने भूमिका घेतली गेली आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा गणेश विसर्जन मिरवणीत आणू नये अशा प्रकारची पोलीस विभागाने बंदी आणली अशा प्रकारचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी उपस्थित केला. याबाबतीत अनेक संघटनानी निवेदने दिलेली आहेत. भारतीय पुतळयासंबंधीचा उल्ल्ेख केला..

**उप सभापती** : आपल्या प्रश्नाची खूपच वाढत चालली आहे. संक्षिप्त प्रश्न विचारावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : पोलिसांना स्थानिक पातळीवर निदेश दिले पाहिजेत.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी छत्रपती शिवाजी महाराजाच्या पुतळयाचा उल्लेख केल्याबरोबर आपण भाषण बंद करण्यास सांगता आहात...

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब आपला चुकीचा समज झालेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल जेवढा आदर आपल्याला आहे, तेवढाच आदर मला देखील आहे. त्यांच्या प्रश्नांची लांबी फार वाढत आहे एवढे मी बोललो त्यानंतर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयासंबंधीचा उल्लेख केला. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतले म्हणून मी त्यांना थांबविलेले नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ KTG/ 14:00

लक्षवेधी सूचना क्रमांक-4.......

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा गैरसमज झालेला दिसतो. छत्रपती शिवरायांबद्दल जेवढा आदर आपल्याला आहे तेवढाच आदर मलाही आहे. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या प्रश्नाची लांबी व व्याप्ती वाढत होती. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतले. महाराजांचे नाव घेऊ नका असे मी त्यांना म्हटलेले नाही. प्रश्नाची व्याप्ती मोठी असेल तर प्रश्न समर्पक आणि थोडक्यात विचारावा असे मला म्हणायचे होते.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले जातात त्या संदर्भातील वस्तुस्थिती आपल्यासमोर मांडण्याचा मी प्रयत्न करीत होते. जे चित्र आम्हाला पुण्यामध्ये दिसून आले आणि जे उत्तर मंत्री महोदय सभागृहात देत आहेत त्यामध्ये आम्हाला खूप तफावत दिसून येते. सत्ताधारी पक्षाच्या माननीय सदस्यांनी जरी हा प्रश्न विचारला असला तरी आम्ही विरोधी पक्षाचे सदस्य देखील या प्रश्नाबाबत एकत्र आहोत. तेथे स्थानिक पातळीवर अनेकदा गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांवर सूडबुध्दीने गुन्हे दाखल केले जातात, अशी पुण्यातील सर्व गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांची भावना आहे. या संदर्भात मध्यम मार्ग काढण्याची भूमिका आपण घ्याल असे आम्हाला अपेक्षित आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पारंपारिक वाद्यांबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे. येणारा आवाज हा पारंपारिक वाद्यातून येतो की युरोपमधून आयात केलेल्या वाद्यातून येतो हे तपासण्याबद्दलची व्याख्या कायद्यामध्ये केलेली नाही. ठराविक अनुज्ञेय डेसीबलपेक्षा जास्त आवाज कोणत्याही वाद्यातून आला तर त्या संदर्भात गुन्हा नोंद करावा लागतो. या संदर्भात केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाला सुध्दा राज्य सरकार विनंती करेल की, आपल्या देशातील सांस्कृतिक, धार्मिक परिस्थिती, मिरवणुका, उत्सव, कार्यक्रम लक्षात घेऊन या संदर्भात जो कायदा देशामध्ये अस्तित्वात आहे तो अव्यवहार्य आहे. राज्य सरकारला वर्षासाठी 12 दिवस रात्री 12.30 वाजेपर्यंत सूट देण्याचा अधिकार आहे. मुंबईत जर एखाद्या कार्यक्रमाला परवानगी दिली तर त्या 12 दिवसातून एक दिवस कमी होतो. मुंबईत एखादे वाद्य वाजले तर त्याचा आवाज गडचिरोलीमध्ये ऐकू येईल आणि तेथील परिस्थिती बिघडेल अशी परिस्थिती आहे. त्या पोलीस स्टेशनच्या हद्दीच्या बाहेर त्या वाद्यामुळे किंवा स्पीकरमुळे अडचण येत नाही. परंतु एक दिवस सवलत दिली तर राज्याच्या 12 दिवसामधून एक दिवस कमी होतो. राज्य सरकारला वर्षाकाठी 12 दिवस सवलत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

देण्याचे अधिकार आहेत. राष्ट्रीय सण आहेत, दसरा, दिवाळी, गणेशोत्सव या सणांसाठी हे दिवस निघून जातात. त्यामुळे अनेकजण नाराज होतात. त्यांना सण साजरा करता येत नाही. ही परिस्थिती लक्षात घेऊन 12 दिवसांची सवलत राज्य सरकारला दिली आहे त्यामध्ये वाढ केली पाहिजे. एका पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये स्पीकर लावण्यास परवानगी दिली असेल तर त्याचा परिणाम म्हणून तो एक दिवस सवलतीचा धरण्यात येऊ नये अशी विनंती केली जाईल. आम्ही केंद्र सरकारकडे प्रयत्न करीत आहोत. पारंपारिक वाद्ये यामधून वगळण्यात यावीत आणि तुम्हीही गणेशभक्तांना विनंती करावी. पारंपारिक वाद्ये आपल्याला ऐकू येतील, दुसऱ्यांना ऐकू जाणार नाहीत अशा पध्दतीने वाजविण्याची विनंती आपण गणेशभक्तांना करावी.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा पुण्याचा विषय असला तरी महाराष्ट्रात अनेक गणेशोत्सव मंडळे आहेत. ठाण्यामध्ये अनेक गणेशोत्सव मंडळे चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत. गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांना आरोपी असल्यासारखे पोलिसांकडून वागविले जाते. कायदा व सुव्यवस्था राखली पाहिजे याबद्दल कोणाचे दुमत नाही. परंतु गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांना ते आरोपी आहेत, चोर आहेत अशा पध्दतीने पोलिसांकडून वागणूक दिली जाते. वाद्ये वाजविण्यासाठी किंवा देखावा उभारण्यासाठी परवानगी घ्यायची असेल तर गणेशोत्सव मंडळांना ऐनवेळी नोटीस दिली जाते. देखाव्यामध्ये फेरफार करण्यास सुचविले जाते. वेळेवर परवानगी दिली जात नाही. शेवटच्या क्षणी कार्यकर्त्यांची धावपळ होते.

सभापती महोदय, माझी सूचना आहे की, या संदर्भात पोलीस यंत्रणा उभी केली पाहिजे. पोलीस स्टेशनमधील पोलीस निरीक्षक बंदोबस्तामध्ये व्यस्त असतात. पोलीस उप आयुक्त कामानिमित्त किंवा बैठकीसाठी बाहेर गेले असतात. त्यामुळे शेवटच्या दिवसापर्यंत परवानगीची कार्यवाही पूर्ण होत नाही. वेळेवर परवानगी देण्यासाठी नियम केला जाईल काय? अनेकदा छत्रपती शिवरायांच्या संदर्भात देखावा उभारला जातो. छत्रपती शिवरायांचा देखावा असेल तर आपोआप अफझलखानाचा वध, शाहिस्तेखानाची बोटे छाटणारे चित्र ओघानेच त्या देखाव्यामध्ये दाखविले जाते. पराक्रम या नात्याने तो देखावा तयार केला जातो. यामुळे कायदा व सुव्यवस्था भडकविण्याचा प्रयत्न नसतो. महाराष्ट्र शासनाने अशा देखाव्यावर बंदी घातली आहे का? छत्रपती

..3..



SGB/ D/ ST/ KTG/ 14:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.........

शिवरायांचे चरित्र म्हणून तो देखावा उभारला जातो. त्या देखाव्यामध्ये अफझलखानाचा वध दाखविला, शाहिस्तेखानाची बोटे छाटणारे चित्र दाखविले तर हरकत घेतली जाते. शासनाने असा देखावा दाखविण्यावर बंदी घातली आहे का?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी कोणत्या पोलीस स्टेशनकडून परवानगी मिळत नाही, आरोपीसारखी वागणूक दिली जाते हे सांगितले तर तेथील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील. सार्वत्रिक निवडणुकीपेक्षा सुध्दा अधिकचा बंदोबस्त गणेशोत्सवामध्ये ठेवावा लागतो. गणेशोत्सवाच्या काळामध्ये पोलिसांच्या डयुटीचे सर्वाधिक तास असतात. पोलीस अत्यंत चांगल्या पध्दतीने बंदोबस्त करतात असे प्रमाणपत्र अनेकदा दिले गेले आहे. या काळात पोलीस अहोरात्र डयुटी करतात. एखाद्या ठिकाणी काही घडले म्हणून सर्व पोलीस दल आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची गरज नाही. स्पेसिफीक घटना सांगितली तर आम्ही योग्य ती दुरुस्ती करु.

श्री.संजय केळकर : आम्ही सर्व पोलीस दलाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केलेले नाही. ठाणे शहरातील जे पोलीस अधिकारी आहेत, निरीक्षक असतील, सहाय्यक पोलीस आयुक्त असतील त्या संदर्भात आमचे गाऱ्हाणे आहे. पोलीस दल रात्रंदिवस काम करीत आहे याबद्दल कुणाचा आक्षेप नाही. चोरी आणि दरोडे पडतात त्यावेळी पोलीस कमी का पडतात? गणेशोत्सव मंडळांना तातडीने नोटीस का देतात याबद्दल आक्षेप आहे. आम्ही संपूर्ण पोलीस दलाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणार नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणावयाची आहे. श्री.थोरात हे पुण्यातील काँग्रेस पक्षाचे जुने आमदार आहेत, ते गणेशोत्सव मंडळाचा कारभार पाहतात. त्यांचे निवेदन आम्ही ऐकले. दरवर्षी प्रत्येक मिरवणुकीच्या वेळी आयुक्त स्वत: उपस्थित राहतात, स्वत: मिरवणुकीची पाहणी करतात. माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांना मी नम्रपणे सांगू इच्छितो की, पोलीस आयुक्त श्रीमती मीरा बोरवणकर यांनी बहिष्कार टाकला. का टाकला याची मला माहिती नाही. आम्हाला यामध्ये आकसाचा संशय आहे. मी काही वेडेवाकडे बोललेलो नाही. मी शाहिस्तेखानाचे नाव घेतल्याबरोबर त्याचे दोन वंशज उभे राहिले.....(अडथळा)..

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा उल्लेख केला म्हणून आम्ही हरकत घेतली नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी असे म्हणालो की, या राज्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा कोथळा काढला. एवढे मी बोलल्याबरोबर त्याचे वंशज उठले.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहामध्ये बोलण्यासाठी उभे असतात)

त्यांची संख्या आणखी वाढत आहे. आणखी किती संख्या वाढते हे आम्हाला बघायचे आहे.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही शासनाच्या या कृत्याचा निषेध म्हणून सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाच्या सर्व माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती सांगितली त्या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, मुंबईतील सेना भवनामध्ये छत्रपतींचा पुतळा आहे तो बघा. छत्रपतींचा पुतळा छोटा आहे. कोणाचा पुतळा मोठा आहे हे बघा. असे जर कुठे घडले असेल तर तेथे सुध्दा सूचना देण्यात येतील. छत्रपतींचा पुतळा कोणत्याही नेत्याच्या पुतळयापेक्षा छोटा असू नये.

----------



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य परिवहन महामंडळाच्या परळ आगार, मुंबई येथील खाजगी एजंटांनी आगाऊ तिकीट आरक्षणाची रक्कम भरणा न करणे

**मु. शी.** : राज्य परिवहन महामंडळाच्या परळ आगार, मुंबई येथील खाजगी एजंटांनी आगाऊ तिकीट आरक्षणाची रक्कम भरणा न करणे यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, राजन तेली, सुभाष चव्हाण, भाई जगताप, उल्हास पवार, मोहन जोशी, एस.क्यू.ज़मा, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य परिवहन महामंडळाच्या मुंबई विभागात खाजगी एजंटानी ५८ लाख रुपयांचा भरणा न केल्याप्रकरणी विभागीय कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांवर विलंबनाची कार्यवाही करण्यात येणे, मात्र या प्रकरणात प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या तब्बल २४ कर्मचारी, अधिकाऱ्यांचा सहभाग असताना केवळ सहा जणांवरच कारवाई करण्यात येणे, या गैरव्यवहार प्रकरणी मुख्य जबाबदार असलेल्या विभागीय वाहतूक अधिकारी, वाहतूक निरीक्षक, आगार प्रमुख आदी अधिकाऱ्यांवर अद्यापी कोणतीच कारवाई न होणे, परिणामी एस.टी.कर्मचारी वर्गात पसरलेले संशयाचे वातावरण, शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र चिड व संतापाची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनातील परिच्छेद क्रमांक-4 पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा. "राज्य परिवहन महामंडळाचे 11 कर्मचारी प्राथमिक चौकशीमध्ये दोषी असल्याचे आढळले. त्यातील 6 कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. गंभीर दोष असलेला एक कर्मचारी वगळता उर्वरित कर्मचाऱ्यांचे सुनावणी धेऊन निलंबन उठविण्यात आले. 11 पैकी 8 कर्मचाऱ्यांविरुध्द दोषारोपपत्र बजावण्यात आले. दोन कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून त्यांची प्रदाने रोखण्यात आली आहेत. एका कर्मचाऱ्याची मध्यवर्ती कार्यालयात बदली झाली असल्यामुळे त्याचे प्रकरण कार्यवाहीसाठी संबंधित खात्याकडे पाठविण्यात आले आहे."

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ KTG/ 14:00

लक्षवेधी सूचना क्रमांक-2....... श्री.गुलाबराव देवकर.....

सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे दुरुस्तीसह मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : सुधारित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल. सूचना क्र. 2 .......

ॲड. जयप्रकाश छाजेड : महोदय, एस.टी. महामंडळ हे राज्य शासनाचे सर्वात मोठे महामंडळ असून या महामंडळाचे कायदे अत्यंत कडक आहेत. राज्याचे माननीय मुख्यमंत्री हेच या विभागाचे प्रमुख आहेत. येथे लक्षवेधी सूचनेला जी उत्तरे दिलेली आहेत ती अत्यंत असमाधान कारक आहेत. एस. टी. महामंडळामध्ये चालू असलेल्या भ्रष्टाचारावर पांघरुण घालणारे असे हे उत्तर आहे. या निमित्ताने मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, आपण एस.टी. महामंडळाच्या वतीने खाजगी आरक्षण एजंट नेमण्याचा निर्णय घेतला व त्यासंबंधीचे परिपत्रक सन 2007 मध्ये काढण्यात आले होते. त्यानुसार खाजगी एजंटामार्फत ही कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई येथील परळ एस.टी. आगारात 58 लाखाचा भ्रष्टाचार झाला कारण या खाजगी एजंटांनी एस.टी. ला पैसा भरला नाही व त्यामुळे महामंडळाचे नुकसान झालेले आहे. त्यातील काही रकमेची वसुली झाली असल्याचाही आपण उत्तरात उल्लेख केला आहे. सह व्यवस्थापकीय संचालकांनी हा चौकशीचा अहवाल दिलेला आहे. मला वाटते सह व्यवस्थापकीय संचालकांना जो चौकशीचा स्पॅन दिला जातो त्यात सन 2007 च्या परिपत्रकाचा उल्लेख नव्हता. वास्तविक डी.सी., डीटीओ आणि रिजनल मॅनेजर या तिघांनी तीन तीन महिन्यांची यासंबंधीची माहिती घ्यावयाची असते ती न घेतल्यामुळे हे नुकसान झालेले आहे.

माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, सन 2007 च्या परिपत्रकाची अमलबजावणी न केल्यामुळे ज्या अधिकाऱ्यांवर ही जबाबदार टाकली होती त्यांनी ती पार पाडली नाही. ही जबाबदारी प्रामुख्याने रिजनल मॅनेजर, विभाग नियंत्रक आणि डी.टी.ओ. यांच्यावर असते. या अधिकाऱ्यांना निलंबन करुन त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय ? कंडक्टरने 10 रुपयांचा जरी अपहार केला तरी त्याला नोकरीतून तत्काळ घरी पाठविले जाते पण येथे 58 लाखाचा भ्रष्टाचार झाला तरी देखील संबंधित व जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई केली नाही. या निमित्ताने मी असे विचारु इच्छितो की, या तीन अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन आवश्यक ती कारवाई करणार काय ?

श्री. गुलाबराव देवकर : आरक्षणासाठी ज्या 21 एजंट्सना काम दिलेले होते त्यांच्याकडून 58 लाख रुपये येणे होते. ही रक्कम न आल्यामुळे महामंडळाने जवळपास 11 कर्मचाऱ्यांवर विविध प्रकारची कारवाई केली. यामध्ये लेखाकार श्री. कांबळे यांना प्रमुख जबाबदार

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल. सूचना क्र. 2 .......

धरुन दि. 24.9.2011 रोजी निलंबित करण्यात आले आहे. त्याचबरोबर इतर विभागीय कार्यालयातील पाच कर्मचाऱ्यांवर सुध्दा कारवाई करण्यात आली असून त्यात दोन सहाय्यक विभाग अधीक्षक आणि लेखनिक अशा पाच कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते तसेच त्यांच्यावर दोषारोप पत्र बजावण्यात आले होते. तसेच त्यांचे निलंबन नंतर मागे घेण्यात आले आहे. उर्वरित चार कर्मचाऱ्यांवर आरोप पत्र बजावण्यात आलेले असून महाव्यवस्थापक यांच्यावर कारवाई करण्याबाबत सुध्दा कळविले आहे. काहींची प्रदाने रोखण्यात आली आहेत. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार जे प्रमुख जबाबदार एम.डी. आहेत त्यांना 15 नोव्हेंबर रोजी कारणे दाखवा नोटीस इश्यू केली आहे. 7 दिवसांच्या आत त्यांचा खुलासा आल्यानंतर जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर निश्चितपणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्याच पध्दतीने अजूनही श्री. कायरकर, खाडे आणि जाधव यांना सुध्दा कारणे दाखवा नोटिसेस देण्याच्या सूचना दिल्या असून येत्या तीन दिवसात या नोटिसेस त्यांना देण्यात येतील.

ॲड. जयप्रकाश छाजेड : महोदय, तत्कालीन आर.एम., डी.सी. आणि डी.टी.ओ. यांच्यावर कारवाई करणार की नाही ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, श्री. हळदीकर, डी.एम.मोरे आणि विभाग नियंत्रक श्री. एस.डब्ल्यू. सुपेकर आणि आगार व्यवस्थापक अशा लोकांवर सुध्दा कारवाई केली आहे.

ॲड. जयप्रकाश छाजेड : महोदय, तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक यांची सुध्दा चौकशी करण्यात येईल व त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्यांच्यावर उचित कारवाई करण्यात येईल.

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर जिल्ह्यात सिकलसेल नियंत्रणात होत असलेली दिरंगाई

**मु. शी.** : नागपूर जिल्ह्यात सिकलसेल नियंत्रणात होत असलेली दिरंगाई यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार, एस.क्यू.जमा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राष्ट्रीय ग्रामीण स्वास्थ अभियानाचा आयुक्तांनी सिकलसेल नियंत्रण कार्यक्रमाला प्रभावीपणे लागू करण्याकरीता स्वयंसेवी संस्थेच्या नियुक्तीची घोषणा केली असताना नागपूर जिल्ह्यात स्वयंसेवी संस्थेच्या नियुक्तीत घोळ असल्याचे निदर्शनास आले आहे, नागपूर जिल्ह्यात सिकलसेल नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एकही कार्यक्रम झालेला नसणे, केंद्र शासनाकडून नागपूर जिल्ह्याला एन.आर.एच.एम.अंतर्गत आवंटीत केलेल्या राशीचा उपयोग झालेला नसणे, यामुळे सिकलसेल निर्मूलन करण्याकरीता होत असलेली दिरंगाई याबद्दल सर्वसामान्य लोकांमध्ये शासनाबद्दल असंतोष व्याप्त असून यावर शासनातर्फे करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

.......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार : महोदय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान योजनेच्या आयुक्तांनी सिकलसेल नियंत्रण कार्यक्रमाला प्रभावीपणे लागू करण्याकरिता स्वयंसेवी संस्थेच्या नियुक्तीची घोषणा केली पण नागपूर जिल्ह्यात स्वयंसेवी संस्थेच्या नियुक्तीत घोळ असल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वी दोन वर्षे यासाठी दिरंगाई करण्यात आली आणि जो निधी या कार्यक्रमासाठी 191 लाखाचा निधी मंजूर करण्यात आला, त्यापैकी 94.43 लाख इतका निधी खर्च करण्यात आला. या दिरंगाईला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

प्रा. फौजिया खान : महोदय, सिकलसेल रोगावर नियंत्रण आणण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून टेस्टींग आणि समुपदेशनाचे काम करावयाचे होते. नागपूर विभागात यासंबंधी 29.3.2010 रोजी "सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया" या संस्थेची निवड करण्यात आली. त्यानंतर दि. 12.4.2010 रोजी "अनिकेत" या सोसायटीने "सिकलसेल" बद्दलल तक्रार केली म्हणून जिल्हाधिकाऱ्यांना या तक्रारीची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले. जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी केली नाही कारण या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य त्यांना आढळून आले नाही. त्यानंतर एक्झीक्युटीव्ह कौन्सिल ऑफ एनआरएचएम यांनी असे ठरविले की, ही प्रक्रिया पुन्हा करावी. त्यानुसार त्या कौन्सिलने दि. 23.2.2011 रोजी ही प्रक्रिया पुन्हा केली. त्यात "अनिकेत" या संस्थेला 71 मार्क्स देऊन त्या संस्थेची निवड करण्यात आली. त्यानंतर पुन्हा "सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया" या संस्थेने दि. 7 जुलै, 2011 रोजी तक्रार केली. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले की, या दोन्ही संस्थांना समोरासमोर बसवावे आणि त्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती करुन घ्यावी. त्यानुसार 22 जून रोजी हिअरिंग घेण्यात आले. शेवटी "सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया" नावाच्या संस्थेने "आमची कोणतीही तक्रार नाही, म्हणून जी तक्रार केली होती ती मागे घेतली" असा रिपोर्ट एनआरएचएमकडे दिल्यानंतर 19 जुलै, 2011 रोजी "अनिकेत" या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व कालावधीत "आशा" (A.S.H.A) या संस्थेच्या माध्यमातून हे सर्व काम करण्यात आले. पीएचसी मध्ये टेस्टींग आणि समुपदेशनाचे काम सुध्दा चालू होते. अशा प्रकारे आतापर्यंत 2.2 लाख एवढ्या चाचण्या करण्यात आल्या आणि यावर 94 लाख एवढा खर्च झालेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सिकलसेल हा रोग अस्वच्छ भागात तसेच झोपडपट्टीमध्ये मोठया प्रमाणात होत असतो. त्यामुळे सिकलसेल रोगाचे प्रमाण झोपडपट्टीमध्ये सर्वात जास्त आहे. सिकलसेलच्या रोगाची चाचणी करण्याच्या संस्था स्थापन करण्यासाठी शासनाला दोन वर्षाचा कालावधी लागलेला आहे. सिकलसेल रोगाच्या तपासण्या मोफत केल्या जातात ही वस्तुस्थिती आहे. सिकलसेलच्या तपासणीचे सेंटर नागपूरमध्ये असून या ठिकाणी सिकलसेलच्या तपासण्या मोफत केल्या जातात. परंतु रुग्णांना प्रत्येक वेळी ब्लड देण्यासाठी यावे लागते त्यामुळे ब्लडचा खर्च तसेच येण्या-जाण्याचा खर्च झोपडपट्टीतील गरीब लोक करु शकत नाहीत. शासनाच्या समुपदेशाने किंवा सांगण्याने या रुग्णांचे दु:ख कमी होणार नाही कारण हा रोग बरा न होणारा आहे. खरे म्हणजे सिकलसेलच्या रुग्णांना शासनाच्या सहकार्याची गरज आहे. सिकलसेलची लागण सर्वात जास्त लहान मुलांना झालेली आहे.त्यामुळे सिकलसेलच्या रुग्णाना नागपूर पर्यंत ने-आण करण्याचा खर्च, ब्लड देण्याचा खर्च शासन करणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सिकलसेलच्या रुग्णांना खर्च देण्याची बाब तपासून घेण्यात येईल. परंतु मी सांगू इच्छिते की, प्रत्येक पीएचसीमध्ये स्क्रिनिंग टेस्ट् केली जात असते. स्क्रिनिंग टेस्ट्मध्ये तसेच सॉल्यूबिलिटी टेस्ट्मध्ये सिकलसेल आढळला तरच त्यांना केंद्रामध्ये पाठविले जाते.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयात सिकलसेलचे रुग्ण सर्वात अधिक आहेत. त्यामुळे रुग्णांना नागपूर पर्यंत जाणे-येणे व दर वेळेला ब्लड देणे शक्य होत नाही म्हणून सिकलसेलच्या गरीब रुग्णांना आर्थिक मदत दिली जाईल काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ही बाब आर्थिक असल्यामुळे ती तपासून घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अनिकेत सोसायटीला रिस्टोअर करण्यात आलेले आहे असे सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. अनिकेत सोसायटीला काम देण्यामध्ये काही तरी व्यवहार झाला आहे हे मी जबाबदारीने सांगू इच्छितो. त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी पुन्हा एकदा माहिती घ्यावी अशी माझी नम्र सूचना आहे. सिकलसेलच्या दुर्धर

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

आजारावर काम करणा-या संस्थांना आपण पाठीशी घालण्याचे काम करु नये. त्यामुळे अनिकेत सोसायटीला जे काम देण्यात आलेले आहे त्यासंदर्भातील माहिती पुन्हा घेऊन डि-रिकग्नाईज्ड केली जाणार आहे काय ? सिकलसेलसाठी केंद्र शासनाकडून पैसे येत असतात. सिकलसेल आजारासाठी केंद्राकडून सन 2008-09 मध्ये थोडेसे पैसे आले होते परंतु त्यानंतर या आजारासाठी पैसे आलेले नाहीत. त्यामुळे सिकलसेलच्या आजारासाठी केंद्राकडून पैसे उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी निवड समितीच्या संदर्भात जो उल्लेख केलेला आहे त्यासंदर्भात सांगू इच्छितो की, या निवड समितीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांचे प्रतिनिधी असतात तसेच कॅफो, जिल्हा आरोग्य अधिकारी, सिव्हील सर्जन, एडीएचओ,डीपीएम, डीएएम असून ही समिती संपूर्ण चौकशी करुन निकषा प्रमाणे मार्क्स देत असते. या प्रकरणात निवड समितीने योग्य काम केलेले आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहात सन्माननीय सदस्य जी माहिती देतात ती खरी मानून त्याची चौकशी केली पाहिजे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ही संपूर्ण प्रक्रिया दुस-यांदा पूर्ण करण्यात आलेली असून सदर सोसायटीला निकषा प्रमाणे मार्क्स देण्यात आलेले आहे. परंतु तरी देखील सन्माननीय सदस्य जी मागणी करीत आहेत त्याबाबत माहिती घेण्यात येईल.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, हमारा पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट सिकलसेल के बारे में गंभीर नहीं है. मैं आपके माध्यम से मत्री महोदय का ध्यान आकर्षित करना चाहता हूं कि महाराष्ट्र में इसकी बहुत स्टडी हुई है. महाराष्ट्र के 19 जिले इससे बहुत ज्यादा प्रभावित हैं. विदर्भ के लगभग सभी जिलों में इस बीमारी का प्रकोप है. विशेषकर हमारा जो ट्राइबल डॉमिनेटेड एरिया है, वहां पर इसका प्रकोप बहुत ज्यादा है.

मेरा पेहला प्रश्न यह है कि सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया के बारे में आपके डिपार्टमेंट ने रिपोर्ट दिया है कि उनको मेरिट के आधार पर बाहर किया है. यहां पर .....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

डॉ. दीपक सावंत जी ने भी कहा है कि भारत में सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया पहली सोसायटी है जिसने 20-25 साल पहले से यह लड़ाई शुरु की. क्योंकि यह सोसायटी थोड़ी एग्रेसिव है इसलिए अधिकारियों ने एक नेक्सस बनाकर उस सोसायटी को बाहर किया है.

सभापति महोदय, मैंने इस बारे में माननीय मुख्यमंत्रीं जी को भी पत्र लिखा है और माननीय स्वास्थ्य मंत्री जी को भी लिखा है तथा इसकी एक कापी मैं राज्यमंत्री महोदय को भी दूंगा. मैं माननीय मंत्री महोदय से प्रश्न करना चाहता हूं कि इस सोसायटी को किस कारण से बाहर किया गया है, क्या इस बारे में मंत्री महोदय द्वारा इंक्वायरी की जाएगी ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि सिकलसेल दूसरे राज्यों में भी बहुत जगह है. बहुत सारे प्रगतिशील देशों में भी यह बीमारी है. हमारा कहना है कि केंद्र सरकार ने इस बारे में कोई नेशनल एक्ट नहीं बनाया है. हमारे राज्य को इस बारे में एक्ट बनाने पर कोई पाबंदी नहीं है. इसकी फंडिंग केंद्र सरकार की ओर से होती है, एनआरएचएम की ओर से इसकी फंडिंग की जाती है. महाराष्ट्र सरकार द्वारा इसके लिए एक पैसे की भी फंडिंग नहीं की जाती है. इसलिए हमारा कहना है कि महाराष्ट्र सरकार इसके लिए कुछ फंड देगी या नहीं ? मेरा तीसरा प्रश्न यह है कि भारत सरकार का इस वर्ष का जो बजट है, उसके अंतर्गत इस काम के लिए उन्होंने 19. 34 कोड़ रुपए दिए हैं. वह पैसा भी पूरी तरह से खर्च नहीं किया गया है, बहुत कम पैसा खर्च किया गया है. इसलिए माननीय मंत्री जी से मेरा प्रश्न है कि इस पूरे पैसे को खर्च करने के लिए तथा हमारे बच्चों को राहत देने के लिए जो पैसा केंद्र से आता है उसमें कुछ पैसा अपनी ओर से मिलाकर, क्या कुछ ठोस उपाय हमारी सरकार करेगी, तथा इस बारे में महाराष्ट्र सरकार कुछ ठोस कानून बनाएगी ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपल्या पहिल्या प्रश्नात निवड प्रक्रियेच्या बाबतीत माहिती घेतली जाणार आहे काय अशी विचारणा केलेली असून सदर निवड प्रक्रियेच्या बाबतीत निश्चितपणे माहिती घेतली जाईल.

सिकलसेलसाठी महाराष्ट्र सरकार पैसे उपलब्ध करुन देणार आहे काय अशा प्रकारचा दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असून या प्रश्नाच्या बाबतीत माहिती घेतली जाईल.

...4

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

प्रा.फौजिया खान ....

सभापती महोदय, सिकलसेलच्या बाबतीत आर्थिक बोजा किती पडेल याची माहिती घेतली जाईल. तसेच चौथ्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, सिकलसेलच्या रुग्णांच्या ट्रान्स्पोर्टसाठी काय करता येईल याबाबत माहिती घेतली जाईल. -----

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शाळेतील शिक्षकांवर तसेच शाळेच्या मुख्याध्यापकांवर बाहेरच्या लोकांडून हल्ले होण्याच्या प्रकारात वाढ झालेली आहे. या विषयाच्या संदर्भात नियम 93 अन्वये मी सूचना देखील दिलेली होती. ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यातील न्यु इंग्लिश स्कूल, मुरबाड येथील शाळेत श्री. संजय गोडंबे हे अध्यापनाचे काम करीत असतांना 5-6 गुडांनी शाळेत घुसून त्यांना जबर मारहाण केलेली आहे.

यानंतर श्री. भारवि..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

ते गंभीर जखमी झाले आहेत म्हणून आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, याची आपण गंभीर दखल घ्यावी. माननीय शिक्षण राज्यमंत्री येथे उपस्थित आहेत. शिक्षकांसंबंधातील हा प्रश्न आहे. याबाबत चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशा प्रकारची विनंती मी आपल्या माध्यमातून शासनाला करीत आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला विषय अत्यंत तातडीचा आणि महत्त्वाचा आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे. शाळेत शिक्षक शिकवत असताना शाळेत येऊन, वर्गात येऊन काही गुंड शिक्षकाला मारहाण करत असतील तर ती बाब गंभीर आहे. तेव्हा याबाबत राज्य शासनाने पोलीस अधीक्षक, ग्रामीण यांना या प्रकरणाची तातडीने चौकशी करून सदर प्रकरणातील जे गुंड आहेत त्यांना तात्काळ अटक करून या कामाची पूर्तता केल्यासंबंधीचा अहवाल उद्या सकाळी 11.00 च्या आत सभागृहाला सादर करण्यास सांगावे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.30 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 2.31 ते 3.30 वाजेपर्यंत मध्यंतर)

.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्री. मोहन जोशी)**

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: एम.बी.ए. सह इतर व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांची मुदत देणे

**मु.शी.**: एम.बी.ए. सह इतर व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांची मुदत देणे याबाबत श्री. सतीश चव्हाण वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात 11 वी व 12 वी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्याच महाविद्यालयामार्फत जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठविला जातो. काही प्रमाणात अशा विद्यार्थ्यांनाही प्रवेश प्रक्रिये अगोदर जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने त्यांनाही आरक्षणाच्या लाभापासून वंचित रहावे लागते.

एम.बी.ए. सह इतर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशाच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे बंधन घालणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसमोर समस्या उभ्या राहिल्या आहेत. कारण कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयामार्फत जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर केला जात नाही. त्यामुळे एम.बी.ए. सह व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना फटका बसणार आहे.म्हणून अशा विद्यार्थ्यांना प्रवेश घेतल्यानंतर 6 महिन्यात जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत द्यावी यावर शासनाने् केलेली व करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया".

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आर्थिक तरतूद नसल्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शासनाच्या सवलतीचा लाभ न मिळणे

**मु.शी.**: आर्थिक तरतूद नसल्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शासनाच्या सवलतीचा लाभ न मिळणे याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यभरातील 371 वसतिगृहामध्ये राहणाऱ्या सुमारे 31 हजार विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध करणारा आणि त्यांचा निर्वाह भत्ता रुपये 75/- वरुन रुपये 600/- पर्यंत वाढविणारा शासकीय आदेश दि.26 जुलै 2011 रोजी काढण्यात आलेला आहे.

या आदेशात विद्यार्थ्यांना पोषक आहार मिळावा तसेच विविध अत्याधुनिक उपकरणांसह इंटरनेट सुविधा मिळाव्यात, प्रत्येकी 10 विद्यार्थ्यांमागे कॉम्प्युटरची सोय उपलब्ध व्हावी असे नमूद करुन वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यात आला आहे.

मात्र या आदेशानुसार अद्यापि राज्यातील कोणत्याही विद्यार्थ्याला लाभ मिळालेला नाही. शासनाचा हा आदेश फक्त कागदावर असल्यामुळे आणि पुरेशी आर्थिक तरतूद केलेली नसल्यामुळे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सवलती वसतिगृहापर्यन्त पोहोचलेल्या नाहीत. सबब, त्यामुळे या विद्यार्थ्यांमध्ये असंतोष पसरला आहे.

या महत्वपूर्ण बाबीकडे शासनाचे लक्ष वेधून या आदेशाची शासनाने त्वरित अंमलबजावणी करावी म्हणून मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे."

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: मुंबई शहरामध्ये दिवसा ढवळया सोन्याच्या दागिन्यांची लूटमार व घरफोडयांचे वाढलेले प्रमाण

**मु.शी.**: मुंबई शहरामध्ये दिवसा ढवळया सोन्याच्या दागिन्यांची लूटमार व घरफोडयांचे वाढलेले प्रमाण याबाबत डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"पोदार वाडी, तेजपाल स्किम रोड नं.5, विलेपार्ले, मुंबई येथील रहिवाश्यांचे दिवसा ढवळया रस्त्यावरुन चालतांना गळयातील मंगळसूत्र, चैन, सोन्याचे दागिने इत्यादी खेचून लूटमार करण्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चालले आहे. तसेच सदर भागातील चाळीमध्ये सुध्दा घरफोडीचे प्रकार वाढत असल्यामुळे तेथील रहिवाशी जीव मुठीत धरुन जगत आहेत. या ठिकाणी पोलिसांची गस्त वाढविण्याची तसेच पोलिसांना गस्तीसाठी मोटार सायकली व प्रतिकारासाठी आवश्यक ती शस्त्रे पुरविण्याची आवश्यकता आहे. माननीय गृह मंत्री यांनी विलेपार्ले येथील वरील भागात आवश्यक ती पोलीस व्यवस्था करण्यात यावी, अशी मी विशेष उल्लेखाव्दारे मागणी करीत आहे."

सभापती महोदय, मुंबईमध्ये चेन स्नॅचिंग आणि घरफोडयांचे प्रमाण खूप वाढले आहे. घरे बंद आहेत असे पाहून ती फोडली जात आहेत. अनेक महिलांना आपल्या गळयातील सोन्याची मंगळसूत्रे गमवावी लागली आहेत. विशेषत: विलेपार्ले (पूर्व) आणि सांताक्रुझ (पश्चिम) या भागामध्ये चेन स्नॅचिंगचे प्रमाण खूप वाढले आहे. मोटार सायकलवरुन तरुण येऊन ते चेन स्नॅचिंग करुन निघून जातात. चोरलेले मंगळसूत्र 1 ग्रॅमचे केलेले असेल तर हे चोर दुसऱ्या दिवशी पुन्हा येऊन त्या महिलेच्या थोबाडीत मारतात व त्या महिलेला मंगळसूत्र परत करतात. अशा प्रकारच्या दुर्दैवी घटना घडत आहेत. या करिता तेथील रहिवाश्यांनी पोलीस स्टेशनबरोबर संपर्क साधून निवेदने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. दीपक सावंत...

सादर केली आहेत. त्यावेळी पोलिसांनी त्यांना आम्ही गस्त वाढविली असून रात्रीच्या वेळी पेट्रोलिंग करतो असे सांगितले. मुख्य गोष्ट म्हणजे पोलिसांकडे स्टाफ कमी असल्यामुळे या गुन्हेगारीवर त्यांचे कंट्रोल नाही. मध्यरात्रीच्या सुमारास म्हणजे पहाटे 3 ते 4 च्या दरम्यान अनेक दुकाने फोडली जातात. यामुळे विलेपार्ले (पूर्व) आणि सांताक्रुझ (पश्चिम) या भागात सोनसाखळी चोरण्याचे आणि घरफोडीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे त्याला त्वरित आळा घालण्यात यावा अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: संत गजानन महाराज शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने जाहीर केलेली विकास आराखडयाची कामे त्वरित पूर्ण करणे

**मु.शी.**: संत गजानन महाराज शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने जाहीर केलेली विकास आराखडयाची कामे त्वरित पूर्ण करणे याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"शेगांव हे बुलढाणा जिल्ह्यातील संत गजानन महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले प्रमुख तीर्थस्थळ असून या ठिकाणी दररोज सरासरी 10 हजार भाविक येत असतात. सन 2010 मध्ये संत गजानन महाराज शताब्दी महोत्सव संपन्न झाला. शताब्दी सोहळयाच्या अनुषंगाने शासनाने विकास आराखडा जाहीर केला. या सोहळयापूर्वी साधारणत: एक वर्ष अगोदर विकास कामे सुरु झाली परंतु सोहळा होऊन वर्ष उलटले तरी कामे अपूर्णच आहेत. सुरु असलेल्या कामांची गती इतकी संथ आहे की, ही कामे पूर्ण होण्यास किमान दीड ते दोन वर्ष लागण्याचा संभव आहे. वास्तविक विकास आराखडयाची सुरुवातीची कामे 9 ते 10 महिन्याच्या कालावधीत पूर्ण होणे गरजेचे असतानाही ही कामे पूर्ण झालेली नाहीत. शासनाने विकास आराखडा मंजूर केल्यानंतर कामे करण्याकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या किमान 80 पेक्षा जास्त आढावा बैठका माननीय पालक मंत्र्यांसमवेत घेतल्या परंतु सद्यस्थितीत विकास आराखडयातील 50 टक्के कामे अर्धवट स्थितीत आहेत. यामध्ये प्रामुख्याने रेल्वे उड्डाण पूल, शिवाजी चौक ते मंदिरापर्यन्तच्या रस्त्याचे काम, परिक्रमा मार्ग (जुने महादेव मंदिर-तीन पुतळा-माळीपुरा-शितलामाता मंदिर-गांधी चौक-बाजारफैल-एमएईबी) ही विकास कामे रखडलेली आहेत. विकास आराखडयांतर्गत शहरातील अंतर्गत रस्ते, गटार योजना,उड्डाण पूल, शहर सौंदर्यीकरण आदी कामे पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. पांडुरंग फुंडकर....

सर्वसामान्य भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक असलेली कामे पाहिजे त्या वेगाने पूर्ण होताना दिसत नाहीत. शेगांव हे "संतनगरी" "विदर्भाची पंढरी" या नावाने ओळखले जात असून संत गजानन महाराजांचे समाधी स्थळ असलेले या शहराचे देशभरात मोठेपण वाढविण्यासाठी संत गजानन महाराज शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने शासनाने जाहीर केलेल्या विकास आराखडयानुसार प्रलंबित असलेली कामे त्वरित पूर्ण व्हावी, या करिता माननीय मुख्यमंत्री महोदयांना सूचित करावे म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणीत आहे."

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धेत पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकरी देणे

**मु.शी.**: राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धेत पदक मिळविणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकरी देणे याबाबत श्री. प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धेत पदक मिळविणाऱ्या तसेच ऑलिम्पिकपटूंना शासकीय नोकरी देण्याचा ठराव डिसेंबर, 2010 मध्ये संमत करण्यात येणे, तद्नंतर अनेक वेळा ऑलिम्पिक संघटनेने शासनाकडे पाठपुरावा करुन पदक विजेत्यांना शासकीय नोकरी दिली न जाणे, तसेच लंडन ऑलिम्पिकसाठी दोन भारतीय ऑलिम्पिकपटूंची निवड झाली असतांना निधी अभावी सदर ऑलिम्पिकपटूंची संधी हुकण्याचा निर्माण झालेला प्रश्न, या बाबत सखोल चौकशी करुन पदक विजेत्यांना नोकरी देण्याची तसेच ऑलिम्पिकसाठी शासनाने वेळीच निधी उपलब्ध करुन द्यावा अशी या विशेष उल्लेखाव्दारे मी मागणी करीत आहे."

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीबरोबर विधिमंडळ सदस्यांची चर्चा घडवून आणणे

**मु.शी.**: डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीबरोबर विधिमंडळ सदस्यांची चर्चा घडवून आणणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्रातील विविध प्रदेशांचा समतोल विकास व्हावा ह्यासाठी डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 31.05.2011 रोजी उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. समितीला एक वर्षाचा कालावधी देण्यात आला आहे. सद्याच्या विकासातील प्रादेशिक असमतोल कमी करण्याच्या शिफारशीबरोबर भविष्यात असमतोल निर्माण होऊ नये म्हणून उपाय योजना सुचविणार आहे किंवा नाही हेही स्पष्ट व्हावयास हवे. डॉ.विजय केळकर समिती बरोबर विधान परिषद व विधान सभा सदस्यांशी चर्चा घडवून आणल्यास उपयुक्त होईल. तरी राज्य शासनाने अग्रक्रमाने ह्याबाबत निर्णय घ्यावा."

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर पेपर मिलचे रासायनिक पाणी सोडल्यामुळे वर्धा नदीचे दूषित झालेले पाणी

**मु.शी.**: चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर पेपर मिलचे रासायनिक पाणी सोडल्यामुळे वर्धा नदीचे दूषित झालेले पाणी याबाबत श्रीमती शोभा फडणवीस,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर पेपर मिलच्या पाण्यामध्ये रासायनिक प्रक्रियेमुळे पाण्याचा रंग काळसर होणे, त्यात प्रतिदिन 52700 घन मीटर सांडपाणी निर्माण होणे, ते पाणी वर्धा नदीत सोडत असल्यामुळे तेथील पाणी बल्लारशाचे पुढील गावात पिण्यालायक नसणे, त्यातच त्या पाण्यामुळे नदीतील मासे मरण पावणे, तसेच बल्लारशा पेपर मीलच्या स्लॅजचे मोठे ढिगारे उभे राहणे, प्रतिवर्षी 74000 मे.टन चुना स्लॅज निर्माण होणे, महसूल खात्याने दिलेल्या 68 हजार निवासी जागेवर पेपर मिलने स्लॅज टाकून त्याचा गैरवापर करणे, बल्लारशा गावाजवळ स्लॅजचे ढिगारे उभे झाल्यामुळे पावसाळयात स्लॅज गावात वाहून येणे, उन्हाळयात वाऱ्याबरोबर स्लॅज गावात उडत येऊन तेथील रहिवाश्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होणे, सदर पाण्याची तपासणी करण्याकरिता प्रदूषण नियंत्रण विभागाने प्रयोगशाळेत पाठविल्यानंतर सदर रिपोर्टमध्ये दोष आढळून येऊन त्यावर न झालेली कारवाई, त्यामुळे सदर विषय हा नागरिकांच्या हिताचा असल्याने सदर विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे."

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 3.40

**पृ.शी.** : मुंबईमध्ये दिवसेंदिवस होत असलेली वाहतुकीची कोंडी

**मु.शी.** : मुंबईमध्ये दिवसेंदिवस होत असलेली वाहतुकीची कोंडी याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेख संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मुंबईतील वाहतुकीची कोंडी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. शहरातील वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे ट्रॅफीक जाम व प्रदूषण यांच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. मुंबई शहरातील या ट्रॅफीक जामच्या समस्येवर पर्याय म्हणून सरकारने नरिमन पॉईंट ते बोरीवली व्हाया वांद्रे, जुहू, वर्सोवा, मार्वे त्याचप्रमाणे भाऊचा धक्का, गेट-वे ते अलिबाग, उरण, नेरुळ अशी जलवाहतूक मोठ्या प्रमाणात सुरु करावी. नवी मुंबई येथील नेरुळ मार्गावर रो-रो सेवा सुरु केल्यास या परिसरातील नागरिकांना त्यांच्या मोटारी या बोटीतून घेऊन जाता येतील. अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----

एक्स-2 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील दोन एकर जागेवरील मैदान बीओटी तत्वावर देण्याचा घाट उघडकीस येणे.

**मु.शी.** : म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील दोन एकर जागेवरील मैदान बीओटी तत्वावर देण्याचा घाट उघडकीस येणे याबाबत श्री.अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा▯▯▯य सदस्य श्री.अनिल भोसले यां▯ विशेष उल्ले▯▯संबंधीची सूच▯ दिली आहे. त्यां▯ ती मांडावी.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले▯▯संबंधीची सूच▯ मांडतो.

"म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील दोन एकर जागेवरील मैदान परस्पर बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (बीओटी) तत्वावर देण्याचा घाट उघडकीस आला असणे, विशेष म्हणजे ज्यांच्यावर या मैदानाची जबादारी आहे त्याच क्रीडा संकुलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह दोन क्रीडा मार्गदर्शकांचाही समावेश असणे, राज्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा मिळाव्यात त्यातून ऑलिम्पिक, आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये पदक विजेते खेळाडू तयार व्हावेत यासाठी हे संकुल तयार करण्याचा विचार शासनाकडे कोणताही प्रस्ताव न पाठविता तोंडी चर्चेत सदर दोन एका जागा विकसित करण्यात येत असल्याचे निदर्शनास आणणे. याठिकाणी ॲड.पद्माकर वळवी क्रीडा व युवक मंत्री यांनी भेट दिली असता स्थानिक क्रीडाप्रेमींनी बीओटी तत्वावर मैदान विकसित होण्याबाबत तक्रार केली होती. त्यावेळी मंत्र्यांनी काम बंद करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. परंतु मंत्र्यांच्या आदेशाला न जुमानता मैदान विकसित करण्याचे काम सुरु असून अंदाजे 10-15 लाख रुपयांचा खर्च झाला असल्याचे लँण्डस्केपिंग मधील तज्ज्ञांनी माहिती देणे, मुळात तोंडी आदेशावर काम कसे करण्यात आले ? शासन स्तरावर कोणताही पत्रव्यवहार नाही, याबाबत क्रीडा खात्यातील अधिकारी आश्चर्य व्यक्त करीत आहेत. दोन मार्गदर्शकांच्या मध्यस्तीने होत असलेल्या या व्यवहारात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येणे, या प्रकरणी सखोल चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या अधिकारी व इतर व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाकडे करीत आहे."





**पृ.शी.**: सांगली जिल्ह्यातील कवठे-महांकाळ,जत,आटपाडी,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खानापूर या तालुक्यात निर्माण झालेली दुष्काळाची
परिस्थती.

**मु.शी.**: सांगली जिल्ह्यातील कवठे-महांकाळ,जत,आटपाडी,
खानापूर या तालुक्यात निर्माण झालेली दुष्काळाची
परिस्थिती याबाबत श्री.रमेश शेंडगे वि.प.स. यांनी
दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ,जत,आटपाडी,खानापूर या तालुक्यात पाऊस कमी पडल्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज तेथील शेतकरी शेतीला टँकरव्दारे पाणी पुरवठा करीत आहे तर काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याकरिता टँकरव्दारे पाणी विकत घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांना प्रति पाण्याच्या टँकरकरिता रु.1500 ते 2000 पर्यंत रक्कम अदा करावी लागत आहे. यामुळे जिल्ह्यातील द्राक्षबागा व इतर फळबागा संकटामध्ये सापडलेल्या आहेत. या प्रश्नावर लोकप्रतिनिधींनी वारंवार सभागृहात पाठपुरावा केलेला आहे.परंतु त्याची योग्य ती दखल घेण्यात आलेली नाही. अशा परिस्थितीमध्ये जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे. शासनाने या प्रश्नाकडे लक्ष घालून तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी या विशेष उल्लेखाव्दारे मी करीत आहे."

----

एक्स-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : सातारा जिल्ह्यात शासकीय विद्यानिकेतनांची
दुरवस्था दूर होण्यासाठी शासनाने आर्थिक

तरतूद व कृति आराखडा तयार करणे.

**मु.शी.** : सातारा जिल्ह्यात शासकीय विद्यानिकेतनांची दुरवस्था दूर होण्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद व कृति आराखडा तयार करणे याबाबत बाबत श्री.रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्य शासनाच्यावतीने पाच शासकीय विद्यानिकेतने सुरु असून त्यामध्ये ग्रामीण भागातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना या संस्थांमध्ये प्रवेश दिला जातो. या संस्था सातारा जिल्ह्यात पुसेगाव, औरंगाबाद, धुळे, अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर येथे सुरु आहेत.

या शासकीय तंत्र निकेतनांमध्ये अत्यंत दुरवस्था असून कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, इमारती मोडकळीस येणे, जुनाट फर्निचर, प्रयोगशाळा व ग्रंथालयाचे गोदाम सदृश्य अवस्था निर्माण होणे, वसतीगृहात खाटा नसणे, शौचालयांची दुरवस्था होणे आणि अशा अत्यंत वाईट परिस्थितीमध्ये विद्यार्थी व शिक्षक नरक यातना सहन करीत आहे.

उदाहरण द्यावयाचे तर पुसेगाव येथे 67 पैकी 26 पदे रिक्त आहेत. इमारत केव्हाही कोसळेल अशी शाळांची अवस्था आहे आणि हीच अवस्था सर्व विद्यानिकेतनांची आहे. या विद्यानिकेतनातून शिक्षण घेतलेले सुमारे 200 पेक्षा अधिक विद्यार्थी विविध उच्च पदांवर काम करीत आहेत. त्यातील काही आमदार आहेत, काही खासदार आहेत.या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर साहेब हे सुध्दा या विद्यानिकेतमधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी आहेत. माननीय राष्ट्रपतींचे सन्माननीय स्वीय सहाय्यक श्री.जाधव साहेब हे सुध्दा या विद्यानिकेतनातील विद्यार्थी आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये, गृह विभागामध्ये उच्च पदांवर काम करणारे अनेक लोक हे विद्यानिकेतनातील विद्यार्थी आहेत. श्री.कृष्णराव शेलार जे एक्साईजचे कमिशनर आहेत, ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





सुध्दा या विद्यानिकेतनातील विद्यार्थी आहेत. या राज्यातील शिक्षण संचालक श्री.दिलीप गोगटे हे सुध्दा याच शाळेमध्ये होते. तसेच श्री.विनय सहस्त्रबुध्दे देखील याच शाळेचे विद्यार्थी होते. एकूणच

या विद्यानिकेतनाची दुरवस्था दूर होण्याची नितांत आवश्यकता आहे. या विद्यानिकेतनांची दुरावस्था दूर होण्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद करावी, एक कृती आराखडा तयार करावा आणि लवकरात लवकर या विद्यानिकेतनांच्या सोयी-सुविधांमध्ये सुधारणा करावी अशा प्रकारची विनंती मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास करीत आहे. धन्यवाद.

----

. . . .एक्स-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : कोकणातील सिंधुदुर्ग,रत्नागिरी,रायगड व ठाणे जिल्ह्यातील काही भागात जांभा दगड जास्त असल्याने कृष्णा खोऱ्याच्या धर्तीवर पाईपलाईनने पाणी पुरवठा करणे

**मु. शी.** : कोकणातील सिंधुदुर्ग,रत्नागिरी,रायगड व ठाणे
जिल्ह्यातील काही भागात जांभा दगड जास्त
असल्याने कृष्णा खोऱ्याच्या धर्तीवर पाईपलाईनने
पाणी पुरवठा करणे याबाबत श्री.संजय केळकर
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□□य सदस्य श्री.संजय केळकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

गत विधानसभेतील शेवटच्या अधिवेशनात लोकलेखा समितीचा 12 वा अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व ठाणे जिल्ह्यातील काही भागात जांभा दगड जास्त प्रमाणात असल्याने कालव्याने पाणी वहन शक्य होणार नसल्याने ज्या प्रमाणे कृष्णा खोऱ्यात एकत्रित निधी उभारला, त्याच धर्तीवर कोकणात पाईपलाईनने पाणी पुरवठा करणेसाठी एकत्रित निधी उभारावा, याव्दारे कोकणाच्या हजारो कोटींचा सिंचन अनुशेष भरुन निघण्यास मदत होईल. यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य ती कार्यवाही शासन स्तरावर व्हावी यासाठी आपल्या माध्यमातून मी ही सदर बाब विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात मांडत आहे, याबाबत कार्यवाही व्हावी ही विनंती. धन्यवाद.

----

. . . .एक्स-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : बीड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण सेवक पदांच्या अंतिम
यादीत विमुक्त जाती प्रवर्गातील दोन उमेदवारांचा
समावेश न होणे

**मु.शी.** : बीड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण सेवक पदांच्या अंतिम यादीत विमुक्त जाती प्रवर्गातील दोन उमेदवारांचा समावेश न होणे, याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

मुख्य कार्यकारी अधिकारी बीड जिल्हा परिषद यांनी श्री.जाधव सुभाष छगन व बाभडे मनिषा रामराव यांना दिनांक 4-7-2011 रोजी लेखी पत्रान्वये कळविले की, वरील संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण दिनांक 5-4-2011 रोजी शिक्षण सेवक पदाचे मुलाखतीस हजर होता. तथापि आपली विमुक्त जाती प्रवर्गाचे सद्यस्थितीत व चालू वर्षात पद रिक्त होत नसल्यामुळे अंतिम यादीत समावेश होऊ शकला नाही. आपले काही म्हणणे असल्यास आपण मा.आयुक्त महाराट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्या प्रमाणे मा.आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी शासनाकडे आम्ही प्रस्ताव पाठविला आहे असे सांगणे आणि आजपर्यंत त्याबाबत निर्णय न होणे आणि जर 31 डिसेंबर पूर्वी हा निर्णय झाला नाही तर या दोघांना नोकरीपासून वंचित रहावे लागेल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या विषयाबाबत शासनाने ताबडतोब उपाययोजना करावी. धन्यवाद.

-----

. . . .एक्स-8



**पृ. शी.** : रत्नागिरी जिल्ह्यामध्ये डोंगराळ भागातील गावांमध्ये रस्त्यांची सोय नसल्यामुळे निर्माण झालेली वाहतुकीची समस्या

**मु. शी.** : रत्नागिरी जिल्ह्यामध्ये डोंगराळ भागातील गावांमध्ये रस्त्यांची सोय नसल्यामुळे निर्माण झालेली वाहतुकीची समस्या याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स.यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये विशेषत: डोंगराळ भागात घेरा पालगड, मोरेवाडी ते किल्लेपाची, आंबये-नातूनगर रस्ता, जामगे बौध्दवाडी ते राजपुरेवाडी, भेलसई गावठण ते डोंगरेवाडी, शिवथर ते खिंडवाडी येथे रस्तेच नसल्यामुळे तेथे वाहतूक, दळणवळण पूर्णपणे ठप्प आहे.अनेक वेळा तेथील लोकप्रतिनिधींनी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांना वेळोवेळी निवेदन देऊन सुध्दा कोणतीही कारवाई न होणे.यामुळे तेथील आबालवृध्द व रुग्णांना ने-आण करण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, परिणामी स्थानिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याकरिता शासनाने त्याठिकाणी नवीन रस्ता करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आणि याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, डोंगराळ भागामध्ये रत्नागिरी जिल्ह्यामध्ये स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाल्या नंतरही तेथे कोणताही वाहतुकीचा पर्याय निर्माण न करणे हे आपल्याला शोभादायक नाही. गेल्या चार-पाच वर्षापासून सतत शासनाकडे पत्रव्यवहार करुन देखील, माननीय मंत्री महोदयांना पत्रे लिहून देखील अनेक वेळेला या सदनामध्ये अनेक आयुधांच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केल्या नंतर देखील आतापर्यंत कोकणातील या रस्त्यांना न्याय न देणे ही बाब निश्चितपणे शासनाला भूषणावह नाही. म्हणून माझी आपल्या माध्यमातून शासनाला पुन्हा एकदा विनंती आहे की, याबाबतीत तातडीने या सर्व रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. धन्यवाद.

-------

21-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) X-9

APR/ 3.40

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**तालिका सभापती** : आता अर्धा तास चर्चा घेण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अधिवेशनाच्या पाहिल्या आठवड्यामध्ये विरोधी पक्षातर्फे विदर्भातील सिंचनाच्या संदर्भातील एक प्रस्ताव चर्चेसाठी मांडण्यात आला होता. हे अधिवेशन विदर्भामध्ये होत आहे. त्यादिवशी सन्माननीय मंत्री महोदयांनी विनंती केल्यानुसार माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि आम्ही चर्चा केल्यानंतर असे सांगितले की, ठीक आहे. आम्हीही थोडे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

समजून घेतो. मग त्या प्रस्तावावरील चर्चा दुसऱ्या आठवड्यामध्ये घेणे आवश्यक होते. परंतु ती घेण्यात आली नाही.

यानंतर कु.थोरात . . ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे ..... 15:50

श्री. दिवाकर रावते.... . .

सोमवार,दिनांक 19 डिसेंबर पासून या अधिवेशनाचा शेवटचा आठवडा सुरु झाला आहे. विरोधी पक्षाचा प्रस्ताव आज चर्चेला घेण्यात यावा अशी आम्ही सोमवारी आणि मंगळवारी माननीय सभापती यांना विनंती केली होती. आज या सभागृहासमोर कुठलेही कामकाज शिल्लक नाही. कालही वेळच्या अगोदर या सभागृहाचे कामकाज आटोपले होते. या सदनामध्ये ज्या वेळी अत्यंत अटीतटीची परिस्थिती निर्माण होते त्यावेळी विरोधी पक्षाची कामकाज करण्याची तयारी असते. रात्रौ दहा वाजेपर्यत बसून आम्ही कामकाज करु पण अमुक एका मुद्याला महत्व दिले पाहिजे असे विरोधी पक्षाकडून सांगण्यात येते त्याप्रमाणे या अधिवेशनात आतापर्यंत सभागृहासमोर आलेले कामकाज पूर्ण झालेले आहे. फक्त पहिल्या दोन दिवसांचे प्रश्नोत्तराचे तास सोडले तर या सदनासमोर आलेले सर्व कामकाज पूर्ण झालेले आहे मग भलेही आमच्या अनुपस्थितीमध्ये ते झाले असेल परंतु कामकाज झ ालेले आहे.

सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरविण्यात आल्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज करण्यात येते. अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयात विरोधी पक्षाचा अतिंम आठवडा प्रस्ताव चर्चेसाठी असतो. पण विरोधी पक्षाचा मागील आठवडयातील प्रस्तावच अजून चर्चेसाठी आलेला नाही. त्यामुळे या आठवडयातील प्रस्तावावर चर्चा करण्याची संधी नाही. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये तो प्रस्ताव दाखविण्यात आला असता तर आज त्या प्रस्तावावर चर्चा झाली असती. सत्ताधारी पक्षाकडून येणाऱ्या प्रस्तावाबाबत त्यांच्या नेतृत्वाने सध्या सत्ताधारी पक्षाकडून कोणताही प्रस्ताव मांडण्यात येऊ नये असे सांगितलेले आहे, याचे कारण असे की, शासनाला शासकीय कामकाज उरकावयाचे आहे. विधेयके मंजूर करावयाची आहेत. या सभागृहाच्या कामकाज पत्रिकेमध्ये आता पर्यंत जेवढी विधेयके दाखविण्यात आली आहेत, ती मंजूर झालेली आहेत. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेले विधेयक चर्चेला घेण्यात यावे अशी मी स्वत: विनंती केली होती. एवढेच नाही तर विधानपरिषदेचे कामकाज एक तास तहकूब करण्यात यावे तोपर्यंत विधानसभेमध्ये हे विधेयक मंजूर होईल त्यानंतर विधानपरिषदेमध्ये हे विधेयक मंजूर करता येईल, कारण शासनाचे ते तातडीचे कामकाज असते, असे मी मांडले होते. आता या सभागृहासमोर अर्धा-तास चर्चे शिवाय दुसरे कुठलेही कामकाज शिल्लक नाही. आजच्या कामकाज पात्रिकेमध्ये विरोधी पक्षाकडून देण्यात आलेला प्रस्ताव दाखविण्यात आला असता तर त्यावर चर्चा

..2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.... . .

झाली असती. पण त्या प्रस्तावावर उद्या चर्चा घेण्यात येणार आहे त्यामुळे विरोधी पक्षाची अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करण्याची संधीही जाणार आहे. विधानसभेचे आजचे कामकाज स्थगित झालेले आहे त्यामुळे विधानसभेकडून या सभागृहात कुठलेही विधेयक येण्याची शक्यता नाही.

सभापती महोदय, माझ्या समोर असा प्रश्न आहे की, उद्या विधानसभेत असाच काही तरी गोंधळ निर्माण झाला आणि त्या गोंधळात कामकाज आटोपण्यात आले तर एकदम पाच-सहा विधेयके या सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येतील. आम्ही काही मर्यादेपर्यंत सत्तारुढ पक्षाची, शासनाची भूमिका समजू शकतो. काही कायदे करण्याकरिता आम्ही मदतही करतो. म्हणजे त्या विधेयकावर आम्हाला जे भाष्य करावयाचे आहे ते भाष्य करतो. चांगली विधेयके असतील तर अभिनंदन करतो आणि ती विधेयके मंजूर करतो. पण विधेयकांवर चर्चा झाली पाहिजे असा आमचा कायम आग्रह असतो. गोंधळात इतर कुठलेही कामकाज केले तरी चालेल पण विधेयकांवर या सदनामध्ये चर्चा झाली पाहिजे, असा माझा कायम आग्रह असतो. कामकाज सल्लागार समितीमध्ये देखील तसाच आग्रह असतो.

सभापती महोदय, मी अत्यंत नम्रपणे आपल्याला विनंती करु इच्छितो की, शुक्रवारचा दिवस अशासकीय कामकाजाचा आहे. मागच्या आठवडयात अशासकीय कामकाजाच्या दिवशी महत्वाची शासकीय विधेयके मंजूर करण्यात आली आहेत. त्या विधेयकांचे महत्व मी आदरणीय सभापती यांना त्यांच्या दालनात जाऊन सांगितले तेव्हा ते मला असे म्हणाले की, हा महत्वाचा विषय आहे पण आता विधेयक मंजूर झालेले आहे. आपण त्यावर चर्चा करुन मार्ग काढू. पण असे कधी होत नसते. आता त्या विधेयकावर चर्चा कुठे करणार? म्हणून जर उद्या डझनभर विधेयके या सभागृहात चर्चेसाठी आली तर ती विधेयके मंजूर केलीच पाहिजेत अशी आमच्यावर जबरदस्ती केली जाऊ नये, कारण त्यामध्ये आमचा काही दोष नाही. मी कामकाज सल्लागार समितीमध्ये असे मांडले होते की, विधान परिषदेने मंजूर केलेली विधेयके विधानसभेत चर्चेला घेण्यात यावीत, त्याचप्रमाणे विधानसभेने मंजूर केलेली विधेयके विधानपरिषदेत चर्चेला घेण्यात यावीत. ते मान्य करण्यात आले होते पण त्याकडे कोणी लक्ष देत नाही. याचा सरळ अर्थ असा की, ज्याप्रमाणे अजीर्ण होते त्याप्रमाणे सत्ता अजीर्ण झालेली आहे.आपल्याला पुन्हा सत्ता मिळालेली आहे. भविष्यात आपण ती पुन्हा मिळवू शकतो, त्यामुळे काम केले काय किंवा नाही केले काय अशी भावना निर्माण

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ 15:50

श्री. दिवाकर रावते.... . .

झालेली आहे. या बाबतीत इंग्रजीमध्ये 'लेथार्जीक' असा शब्द आहे तो सत्ताधाऱ्यांना आलेला आहे. तो सत्ताधारी पक्षाला येऊ देत पण कामकाजाची जबाबदारी विरोधी पक्षावर टाकली जाऊ नये, हे सांगण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. जे अजीर्ण आहे ते सत्ताधारी पक्षाने जिरवावे परंतु विरोधी पक्ष म्हणून आम्हाला अगतिक करुन भाग पाडू नये, एवढीच विनंती आहे.

सभापती महोदय, आज वेळ शिल्लक होता या वेळेत दोन-तीन विधेयके झाली असती. विधानपरिषदेने मंजूर केलेली विधेयके विधानसभेत घेण्यात यावीत असे मी सांगितल्यानंतर माझे कौतुक करण्यात आले होते, ही सूचना चांगली असून याप्रमाणे विधानपरिषदेत आणि विधानसभेमध्ये कामकाज होईल असे सांगण्यात आले होते. पण पालथ्या घडयावर पाणी. पाठ फिरली की रोजचे कामकाज सुरु झाले. याचे कारण असे की, मंत्री नोंद घेत नाहीत, अधिकारी नोंद घेत नाहीत. संसदीय कार्यमंत्र्यांचे कार्यालयही याची नोंद घेत नाही. या संदर्भातील नियोजन संसदीय कार्य मंत्र्यांनी करावयाचे असते पण ते वर्षानुवर्षे तेच काम करीत असल्यामुळे त्यांनी एकदा मला असे सांगितले होते की, किती दिवस मी या विभागाचे काम करावयाचे? त्यामुळे आता त्यांचे ते पठडीतील काम झालेले आहे. आम्हाला एकत्र आणण्याकरिता महालक्ष्मी चिवडयाची एक पुडी ते आणतात, त्या एका पुडीत सगळे भागते. ठीक आहे. तो विषय येथे नाही. लोकशाहीमध्ये या सगळया गोष्टी चालतात. पण उद्याच्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावाच्या बाबतीत आमची विनंती अशी आहे की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात यावी त्यानंतर इतर कामकाज घेण्यात यावे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना याबाबतीत काही सूचना करावयाची असेल तर त्यांनी ती करावी. पण उद्याच्या कामकाजात विरोधी पक्षाच्या प्रस्तावाला महत्व देण्यात यावे.

सभापती महोदय, याचे कारण असे की, या अधिवेशनातील विरोधी पक्षाच्या एकमेव प्रस्तावावर उद्या चर्चा होणार आहे. या अधिवेशनात सत्ताधारी पक्षाकडून देखील प्रस्ताव आलेला नाही. कुठल्याच प्रस्तावावर या अधिवेशनात चर्चा झालेली नाही. म्हणून आमची विनंती आहे की, उद्याच्या प्रश्नोत्तराच्या तासानंतर पाहिजे तर आणखी एक तास कामकाज करण्यात यावे पण दुपारी 12.30 नंतर अर्ध्या-तासाची सुट्टी घेऊन दुपारी 1.00 वाजता विरोधी पक्षाचा प्रस्ताव मांडला गेला पहिजे. विरोधी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत जो वेळ

..4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते. . . .

शिल्लक असेल त्या वेळेत सभागृहासमोर जे कामकाज शिल्लक असेल ते करण्यात येईल, ते आम्ही नाकारणार नाही. त्यानंतर शुक्रवारी शासकीय कामकाज होता कामा नये, अशी मी पुन्हा एकदा विनंती करतो. शासनाला कामकाज करण्यासाठी विरोधी पक्षाचे सहकार्य असेल हे देखील सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला सांगू इच्छितो. धन्यवाद.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जी सूचना केलेली आहे, ती गोष्ट खरी आहे. हिवाळी अधिवेशन विदर्भात आज होत नाही तर हिवाळी अधिवेशन विदर्भात घेण्यात यावे ही सूचना आधीच मान्य झालेली आहे तेव्हा पासून हिवाळी अधिवेशन विदर्भात होत आहे. याचा मुख्य उद्देश असा होता की, विदर्भ महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर विदर्भाचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने एक अधिवेशन उप राजधानीच्या ठिकाणी झाले पाहिजे आणि या अधिवेशनामध्ये विदर्भातील प्रश्नांची तड लागली पाहिजे. या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विदर्भातील कापसाचा प्रश्न ऐरणीवर आला होता. कापसाच्या हमी भावाचा प्रश्न होता. हमी भावाच्या प्रश्नासंबंधी विदर्भातील शेतकऱ्यांची मागणी या सभागृहात रेटून धरण्यात आली आणि या सभागृहात त्यावर दोन दिवस चर्चा झाली. खरे म्हणजे कामकाज सल्लागार समितीमध्ये तसे ठरले होते. प्रत्येक आठवडयात विरोधी पक्षाकडून देण्यात आलेल्या एका प्रस्तावावर आणि सत्ताधारी पक्षाकडून देण्यात आलेल्या एका प्रस्तावावर चर्चा होत असते. परंतु मागच्या आठवडयात विरोधी पक्षाकडून देण्यात आलेला प्रस्ताव चर्चेला येऊ शकला नाही. सत्ताधारी पक्षाकडूनही प्रस्ताव मांडण्यात आला नाही. या आठवडयामध्ये विरोधी पक्षाकडून विदर्भातील सिंचनाच्या बॅकलॉगचा प्रस्ताव देण्यात आला होता पण त्या प्रस्तावावर सोमवारी चर्चा झाली नाही. काल मंगळवारीही चर्चा झाली नाही. आज आम्हाला असे सांगण्यात आले की, उद्या त्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी सूचना केल्या प्रमाणे विरोधी पक्षाकडून देण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा होत असताना त्या प्रस्तावाला कामकाजात शेवटचा क्रम देण्यात येऊ नये. उद्या प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर त्या प्रस्तावावरील चर्चेला लगेच सुरुवात करण्यात यावी. विदर्भात वर्षानुवर्षे शेकडो कोटीचा सिचंनाचा बॅकलॉग आहे आणि जवळपास 10 लाख हेक्टरचा भौतिक बॅकलॉग निर्माण झालेला आहे, त्या संबंधी या सभागृहात सांगोपांग चर्चा करण्यात यावी आणि विदर्भातील प्रश्न नीटपणे मार्गी लागावेत यासाठी या चर्चेचे महत्व आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विधेयकाच्या बाबतीत सांगितल्याप्रमाणे कामकाज सल्लागार समितीमध्ये तसे ठरले होते. काही विधेयके विधानपरिषदेमध्ये मांडण्यात यावीत आणि काही विधेयके विधानसभेत मांडण्यात यावीत. विधानपरिषदेमध्ये मंजूर

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.. .

झालेली विधेयके विधानसभेमध्ये पाठविण्यात यावीत आणि विधानसभेमध्ये मंजूर झालेली विधेयके विधानपरिषदेमध्ये चर्चेला घेण्यात यावीत असे ठरले होते, परंतु तसे झाले नाही. खरे म्हणजे आज आमच्या समोर कुठलेही कामकाज शिल्लक नाही. विरोधी पक्षाचा प्रस्ताव आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आला असता तर त्या प्रस्तावावर आज चर्चा झाली असती पण तो प्रस्ताव आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आला नाही.

सभापती महोदय, विधानसभेचे कामकाज दिवभरासाठी तहकूब झाल्यामुळे, आता विधानसभेमध्ये कुठलेही विधेयक मंजूर होऊ शकत नाही. उद्या विधानसभेत गोंधळ झाला आणि गोंधळात पाच-सात विधेयके मंजूर झाली तर ती विधेयके विधानपरिषदेमध्ये मंजूर करण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल आणि विदर्भाच्या बाबतीत जो प्रस्ताव चर्चेला येणार आहे त्याला दुसऱ्या क्रमांकाचे स्थान देण्यात येईल, असे होऊ नये. याचे कारण असे की, शुक्रवार हा अशासकीय कामकाजाचा दिवस असतो. त्यामुळे त्या दिवशी कुठलेही शासकीय कामकाज करता येणार नाही. म्हणून उद्या गडबडीमध्ये विधेयके मंजूर करण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला जाईल, तो होऊ नये, विधेयकाचे रुपांतर कायद्यात होते आणि तो कायदा संपूर्ण महाराष्ट्राला लागू होतो. म्हणून विधेयकांवर सांगोपांग चर्चा झाली पाहिजे. अशी आमची मागणी आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

म्हणून आधी ठरावाला प्राधान्य द्यावयाचे आणि उरलेला जो वेळ असेल त्या वेळेमध्ये जी विधेयके विधानसभेतून मंजूर होऊन येतील त्या बिलांवर या ठिकाणी चर्चा होईल. आम्ही अधिक वेळ बसण्यास तयार आहोत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी सूचना मांडली त्याप्रमाणे उद्याचे कामकाज दाखवावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, जो भावना हमारे माननीय सदस्यों ने व्यक्त की है उस बारे में मुझे इतना ही कहना है कि यह शीतकालीन अधिवेशन दो सप्ताह का है. इस सेशन की तैयारी हर साल बहुत जोर-शोर से होती है. इस अधिवेशन के काम के लिए खर्च भी बहुत किया जाता है. इस अधिवेशन से विदर्भ के लोगों की आशाएं भी बहुत रहती हैं. लोगों को लगता है कि इस अध्धिवेशन से यहां की जनता को कुछ राहत अवश्य मिलेगी. मेरा कहना है कि हमारी जो कामकाज सलाहकार समिति है, उस कमेटी में इस अधिवेशन का पूरा एजेंडा बनाया जाता है. उस समिति में हमारे विरोधी पक्ष नेता तथा सभी पार्टी के गट नेता भी रहते हैं. मेरा कहना है कि हमारा पहला सप्ताह तो कपास तथा बेळगाव जैसे बहुत ही महत्वपूर्ण विषयों पर चला गया . परसों यह अधिवेशन खत्म हो जाएगा और उस दिन कोई भी शासकीय कामकाज नहीं होगा. इसलिए माननीय सदस्यों की भावनाओं को ध्यान में रखते हुए मेरा सुझाव है कि अब अंतिम दो दिन बचे हैं. मुझे कहना है कि हमारी जिन लक्षवेधी सूचनाओं को पोस्टपोंड कर दिया गया है, वे अभी तक चर्चा के लिए नहीं आ पायी हैं. माननीय विरोधी पक्ष नेता ने अभी यहां पर कहा कि नियम 260 के अंतर्गत आने वाला उनका प्रस्ताव भी यहां पर चर्चा के लिए नहीं आ पाया है और शासन पक्ष की ओर से आने वाला प्रस्ताव भी यहां पर चर्चा के लिए नहीं आ पाया है. इसलिए मेरा कहना है कि यदि कल और परसों यानी 22 दिसम्बर और 23 दिसबर को हम सुबह एक घंटा जल्दी आ कर और शाम को एक घंटा देर तक बैठकर यानी 6 बजे के बजाय शाम को 7 बजे तक काम करें तो हमारा जो काम पोस्टपोंड किए जाने के कारण पूरा नहीं हो पाया है, वह काम हम पूरा कर सकते हैं. जो बिल विधान सभा में पास होकर यहां पर कल आएंगे, उन पर भी यहां पर चर्चा हो सकेगी. इसलिए हमारे विधान कार्यमंत्री तथा कामकाज

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री एस. क्यू. जमा.....

सलाहकर समिति के माननीय सदस्य आपस में बात कर के इन आखिरी दो दिनों में 4 घंटे का समय यदि बढ़ा देते हैं तो हम पेंडिग काम को पूरा कर सकते हैं, यही मेरा सुझाव है.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, सिनियर सिटिझन्सच्या प्रश्नाच्या संदर्भात अतिशय महत्वाची चर्चा घ्यावी म्हणून आम्ही प्रस्ताव दिलेला होता. ती चर्चा सुध्दा आलेली नाही. सिनियर सिटिझन्सचे जे प्रश्न आहेत, त्यांच्या ज्या अडचणी आहेत, त्या बाबतीत सर्वांचे एकमत होईल की, त्यांच्या संदर्भात आपण काही तरी केले पाहिजे, काही तरी निर्णय घेतले पाहिजेत. त्यामुळे आपण ती चर्चा घेतली पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जमा साहेबांनी केलेली सूचना योग्य आहे की, थोडासा वेळ वाढवून जर आपण या सर्व चर्चा केल्या तर आणि त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला तर त्यातून प्रश्न सुटण्यासाठी मदत होईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, शनिवार, दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजीच्या कामकाज पत्रिकेमध्ये अशासकीय ठरावामध्ये अनुक्रमांक 4 वर माझा अशासकीय ठराव दाखविलेला होता. त्या दिवशी माझा अशासकीय ठराव चर्चेला घ्यावयास पाहिजे होता परंतु आपण सांगितले की, सदरहू ठराव पुढे ढकलण्यात आलेला आहे. आपण मला आश्वासित केले होते की, या आठवड्यात सदरहू ठराव चर्चेला घेण्यात येईल. म्हणून माझी आपल्याला विनंती राहील की, तो ठराव या आठवड्यात चर्चेला घ्यावा. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'चैत्यभूमी' दादर येथे स्मारक असल्यामुळे दादर रेल्वे स्थानकाला 'चैत्यभूमी' असे नाव देण्यासंबंधीचा हा अतिशय महत्वाचा ठराव होता. या राज्यातील दीनदुबळ्या दलित बांधवांच्या भावनेचा, राज्यातील सर्वांच्या भावनेचा आणि अस्मितेचा हा प्रश्न आहे. म्हणून मी हा अशासकीय ठराव दिलेला होता. आपण मला आश्वासित केले होते की, या आठवड्यात तो ठराव घेण्यात येईल. माझी आपल्याला विनंती आहे की, या आठवड्यामध्ये हा ठराव सभागृहामध्ये चर्चेला येईल याची आपण काळजी घ्यावी आणि मला न्याय द्यावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल जी चर्चा झाली त्यावेळी मी असे म्हणालो की, अधिवेशन वाढवावे. त्यावेळी असे सांगण्यात आले की, अधिवेशन संपल्याबरोबर आचारसंहिता

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

लागणार आहे. त्यामुळे अडचण असू शकते. परंतु आता मुंबई महापालिकेच्या संदर्भातील बाब न्यायालयामध्ये गेल्यामुळे 3 जानेवारीच्या अगोदर निवडणूक जाहीर होत नाही त्यामुळे आता आपल्याला एक आठवडा अधिवेशन वाढविण्याची संधी आहे. ती सूचना सुध्दा आपण करावी. उद्या तातडीने कामकाज सल्लागार समितीची बैठक घेतली तर ते आपल्याला करणे शक्य आहे. तोही विचार करण्यास हरकत नाही. कारण आता आचारसंहिता लागत नाही. 3 तारखेच्या अगोदर निवडणुकीच्या संदर्भात कोणताही निर्णय होणार नाही. त्यामुळे तोही विचार जर शासनाला करता आला तर करावा.

**तालिका सभापती** (मोहन जोशी) : आपल्या सर्व भावना माननीय सभापतींच्या कानावर घालण्यात येतील आणि त्याप्रमाणे माननीय सभापती योग्य तो निर्णय घेतील. आज दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये ज्या दोन अर्धा-तास चर्चा दाखविण्यात आलेल्या आहेत त्यातील पहिली अर्धा-तास चर्चा सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी दिलेली आहे. संबंधित मंत्री महोदय थोड्या वेळात सभागृहात येणार आहेत. त्यामुळे अनुक्रमांक 2 वर असलेली सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी दिलेली अर्धा-तास चर्चा आधी घेण्यात येईल.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात खरिपाचा हंगाम सुरु होताच शासनामार्फत खते आणि बियाणांचा आवश्यक तेवढा पुरवठा करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : राज्यात खरिपाचा हंगाम सुरु होताच शासनामार्फत खते आणि बियाणांचा आवश्यक तेवढा पुरवठा करण्याची आवश्यकता यासंबंधी अॅड. उषा दराडे, वि. प. स. यां□ उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा.

अॅड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अ□मती□ □यम 92 अ□ये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित □रते :-

"राज्यात खरिपाचा हंगाम सुरु होताच शासनामार्फत खते आणि बियाणांचा आवश्यक तेवढा पुरवठा करण्याची आवश्यकता असताना खते, बियाणांचा अपुरा पुरवठा होणे, त्यामुळे शेतकऱ्यांची होत असलेली लूट थांबविण्याची आवश्यकता, याबाबत खताचा आलेला पुरवठा, प्रत्यक्षात वाटप झालेले बियाणे, खते याची नोंद असणे आवश्यक असणे तसेच शेतकऱ्यांच्या गरजेनुसार बियाणे शेतकऱ्यांना मिळण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सभापती महोदय, शेतीची पूर्वीची परंपरागत पध्दत आणि आताच्या पध्दतीमध्ये प्रचंड बदल झालेला आहे. पूर्वी शेतकरी स्वत:च्या शेतामध्ये खत तयार करीत असे. शेणखत मोठ्या प्रमाणामध्ये वापरले जात असे. गांडूळ निसर्गत: जमिनीमध्ये तयार होत असे. कारण किटकनाशके, रासायनिक खते यांचा पूर्वी अजिबात वापर होत नसे. शेतकरी स्वत:चे बियाणे स्वत:च निर्माण करीत असे. मला आठवते की, आम्ही ज्यावेळला मामाच्या गावाला जात होतो त्यावेळी पुढच्या वर्षी लावावयाच्या लसणाच्या पेढ्या अडकवून ठेवलेल्या असावयाच्या. ज्वारीची कणसे ठेऊन त्याचे बियाणे तयार करावयाचे. ज्वारीची कणसे कापून जशीच्या तशी माळ्यावर माळवदीला अडकून ठेवलेली असावयाची. सूर्यफुलाचे बी अशाच पध्दतीने ठेवले जावयाचे आणि ज्याचे दाणे तयार केले असतील, मग बाजरी असेल, सूर्यफूल असेल, छोटे कारळे असेल, सूर्यफुलाला कारळ म्हणतात, ते सर्व बियाणे गाडग्यामध्ये जपून ठेवलेले असावयाचे. गाडगे हे इतके सुरेख पिझर्वेटिव्ह आहे की, वर्षभर

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

त्या बियाणाला कीड सुध्दा लागत नव्हती. त्या काळामध्ये शेतकरी खूश असावयाचा कारण त्यावेळी महागाई सुध्दा नव्हती. त्यावेळी ती जी पारंपरिक शेती होती ती शेतीची पध्दत आणि आजची शेतीची पध्दत यामध्ये बदल झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये आपण हरितक्रांती आणण्याचा प्रयत्न केला. सिंचनाचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न केला. सुधारित बी-बियाणे आणण्याचा प्रयत्न केला. ज्याप्रमाणे संकरित जनावरे आली त्याप्रमाणे हायब्रीड बियाणे आणण्याचा प्रयत्न केला. आधी आपल्याकडे पांढरी ज्वारी, दगडी ज्वारी, झिप्री ज्वारी असे जे सगळे ज्वारीचे वाण होते ते बाजूला पडले आणि जी हायब्रीड ज्वारी खरिपाला पेरली जाते, रब्बीमध्ये पेरली जात नाही, ती ज्वारी पुढे आली. बाजरीमध्ये हायब्रीडचे वाण पुढे आले. कापसामध्ये नांदेड 44 हे वाण बाजूला जाऊन बी.टी. बियाणे पुढे आले. आता कनक वाणाची फार मोठ्या प्रमाणावर मागणी होत आहे. नवीन प्रकारची वेगवेगळी बियाणे समोर आली.

सभापती महोदय, खरे म्हणजे शेती हा आपला मुख्य व्यवसाय आहे. शेतीप्रधान देश असे आपल्या देशाला म्हटले जाते. शेतकरी देशाला जगवतो. शेतकऱ्यांच्या कष्टावर देश जगतो. शेतकरी अन्नधान्य निर्माण करतो, कापूस पिकवतो, ऊस पिकवतो, केळी पिकवतो, संत्रा पिकवतो आणि त्यामुळे आपला देश जगत आहे. शेतकऱ्यांच्या या श्रमाला मूल्य मिळावे, त्यांना चांगले उत्पादन मिळावे, त्याला चांगली बाजारपेठ मिळावी, त्याच्या मालाला चांगली किंमत मिळावी या सगळ्या गोष्टी सिंचनावर, मातीच्या प्रतवारीवर, बियाणांवर, खतांवर आणि माणसांच्या श्रमावर अवलंबून आहे. त्यापैकी माणसाचे श्रम हे शेतकरी दिवस-रात्र करावयास तयार आहे. आता लोड शेडींग असते. रात्री 12.00 वाजता किंवा 2.00 वाजता लाईट आली तरी आमचा शेतकरी ऊसाच्या फडामध्ये जातो. तो कशाचीही पर्वा बाळगत नाही. त्यामुळे श्रमाच्या बाबतीत आपल्याकडे काही कमी नाही. आपले श्रम पुष्कळ प्रमाणामध्ये उपलब्ध आहे. श्रम करण्याची माणसांची तयारी सुध्दा आहे. जमीन उपलब्ध आहे. आता प्रश्न कोठे शिल्लक राहतो ? निसर्गावर अवलंबून असणारी शेती ही वैज्ञानिक पध्दतीने व्हावी, नवीन पध्दतीने व्हावी याचे प्रयोग अनेक वर्षापासून जागतिक

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

पातळीवर झाले, देश पातळीवर झाले आणि राज्य पातळीवर झाले. आपले राज्य सुध्दा जगापेक्षा वेगळे नाही. म्हणून हे सगळे प्रयोग आपल्याकडे सुध्दा करण्यास सुरुवात झाली. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर रासायनिक खते वापरण्यास सुरुवात झाली. या धरतीवर प्रेम करणारी बहिणाबाई चौधरी असे म्हणते की,

"धरतीच्या कुशीमंदी, बीजबियाणं निजलं
वर हातरली माती, जशी पांघरली शाल"

धरतीच्या पोटामध्ये हे बियाणे पडल्यानंतर त्यावर जी माती आहे ती माती म्हणजे या वसुंधरेने शाल पांघरलेली आहे. वसुंधरा स्वत:च शाल आहे आणि आपल्या पोटामध्ये जाणारी सगळी संपत्ती ती झाकून ठेवते.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे )**

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

ज्यावेळी हेच दाणे उगवून वर येतात त्यावेळी धरतीच्या अंगावर शहारे येतात. म्हणजे माणसासारखी धरती जीवंत आहे. जमीन जीवंत आहे. ही भूमिका बहिणाबाईंनी सुध्दा आपल्या कवितेतून मांडलेली आहे. आम्ही लहान असताना खेळत असू त्यावेळी "रामाच्या बागे मंदी ग बागे मंदी मोटाला जाते ग पाणी झुळझुळ वाणी" असे म्हणत होतो. मामाच्या शेतामध्ये जात होतो. पाण्याच्या संदर्भात एक विधेयक सभागृहासमोर सादर होणार आहे असे मी वाचले आहे. त्यात किती मिटर विहीर खोदावयाची यावर बंधने घातली जाणार आहेत असे कळले आहे. पाण्याचे नियोजन होण्याची आवश्यकता सुध्दा आहे. पाण्यावरुन मला आठवते की, साधा नाला किंवा ओढा बारा महिने वाहत असे. गुरे पकडण्यासाठी आमचे भाऊ जात होते. त्यावेळी गुडघ्या इतके त्या ओढ्यात पाणी असायचे. आता ज्या दिवशी पाऊस पडेल त्याच दिवशी ओढ्यात पाणी असते. दीड परस खोल विहीर असली तरी बैल त्या मोटेला जोडला आणि त्याच्या दोरखंडावर मामा बसला तर कमीत कमी मामाला भूक लागेपर्यंत बैल थकत नव्हते आणि सांगळाही पडत नव्हता. मोटेचे पाणीही कमी होत नव्हते. जेवण होईपर्यंत पाणी उपसल्यानंतर जेवण संपेर्यंत ती विहीर पुन्हा भरली जात होती. त्या पाण्यावर कापूस, मिरची, ज्वारी, बाजरी, टोमॅटो, कांदा ही सर्व पिके शेतकरी भरभरुन घेत होता. त्यामुळे शेतकरी मोठ्या खुषीत रहात असेल. त्यांच्या चेहऱ्यावर चिंता दिसत नव्हती.

आज शेतकरी नवनवीन बियाणे वापरत आहेत, परंतु त्यांच्या चेहऱ्यावर चिंता दिसू लागली आहे. त्याचे कारण असे आहे की, रासायनिक खतांवर शेतकऱ्यांना विसंबून ठेवले आहे. त्याच्याबरोबरच सेंद्रिय खतांचा प्रचार व प्रसार व्हावयास पाहिजे त्यापासून आपण शेतकऱ्यांना दूर नेलेले आहे. या दोन्हीचा मेळ बसविणे फार गरजेचे आहे. मागील वर्षी शेतीच्या प्रश्नावर चर्चा होत असताना मी सेंद्रिय खताचे महत्व या सभागृहात विशद केले होते. सेंद्रिय खतामध्ये खूप शक्ती आहे. एक ग्राम रांगोळी 13 मिनिटे क्लॉकवाईज, ॲण्टीक्लॉकवाईज पाण्यात घोळ तयार करुन आकाशाकडे फवाऱ्याचे तोंड करुन सूर्य किरण त्या पिकावर पडण्यापूर्वी एक तासभर फवारणी केली तर एक ग्राम खतामध्ये त्या संपूर्ण जमिनीवर स्प्रे करता येतो. त्याचा खूप

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

फायदा होतो. त्यामुळे कीटकनाशक वापरण्याची गरज रहात नाही. आपण या सगळया गोष्टींचा प्रचार करण्याची गरज आहे.

माझ्या शेतातील 5-25 केळीची झाडे गळून पडली आहेत. कृषी अधिकाऱ्यांनी मला पहिला असा प्रश्न विचारला की, उषाताई तुम्ही सिलिकाची फवारणी केली नाही का ? सिलिका म्हणजे रांगोळीचे खत. या खतामध्ये खूप ताकद आहे. पूर्वी गांडूळ खत तयार होत होते. कारण आपण रासायनिक खत वापरत नव्हतो. आता रासायनिक खतांमुळे जमिनी दगडासारख्या झालेल्या आहेत. पडलेला पाऊस वरुन अजिबात वाहून जात नाही. पूर्वी सेंद्रिय खत म्हणजे उकिरड्यावरील खत म्हणत असू. घरे पांढऱ्या मातीने सारवली जात होती, त्यामुळे त्या खतात पांढरी माती झाडून जात होती, दारातील गायींचे शेण त्यात मिसळले जात होते, दारात दगड घोटून तयार केलेली रांगोळी काढली जात होती, त्यात कोणतेही मिश्रण नसे, उत्कृष्ट पध्दतीचे ते खत तयार होत होते. ते खत शेतामध्ये वापरले जात होते. त्यामुळे जमीन भुसभुशीत होत असे. लोण्यासारखी जमीन तयार होत असे. शेताला पाणी दिल्यानंतर एक तासात तुम्ही गेलात आणि हातामध्ये एक मातीचा गोळा घेतल्यावर हातातील गोळा पुन्हा उघडला तर लोण्यासारखा मऊ असलेला गोळा परत विखुरला जात होता. त्यात दगड असण्याचे कारणच नव्हते. अशा प्रकारची जमीन होती. आता रासायनिक खते वापरु लागलो आहोत, त्यामुळे जमिनी घट्ट होऊ लागल्या आहेत. पूर्वी शेतात नांगर घातल्यानंतर पायाला लागत नव्हते. आता नांगरलेल्या जमिनीतून जात असताना पायाला धसकटे लागावीत अशा प्रकारे मातीचे गोळे लागतात. शेतात पाणी घालत असताना किंवा औत जोडलेला असताना बैलाला शेतातून चालण्यासाठी सुध्दा त्रास होतो. इतका कडकपण जमिनीत आलेला आहे.

दुसरा एक परिणाम असा झाला आहे की, पावसाचे पाणी जमिनीमध्ये अजिबात मुरत नाही. जमिनीत पाणी मुरले पाहिजे. त्यासाठी आपल्याला खतांच्या प्रतवाऱ्या बदलाव्या लागतील. यामध्ये काही संशोधन करता येत असेल तर ते केले पाहिजे. एखादे खत कसे वापरले पाहिजे त्याचे शास्त्रीय ज्ञान शेतकऱ्यांना दिले जात नाही. युरिया, पोटॅश, पालाश, स्पूरद ही सर्व खते कधी व किती टाकावयाची हे सांगितले जात नाही. जमिनीचे माती परीक्षण केले पाहिजे. त्यात चुनखडी

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जास्त आहे की कमी आहे, मुरमाड जमीन आहे, भिजव जमीन आहे, काळी जमीन आहे अशी प्रतवारी पाहून खताच्या प्रमाणाची माहिती शेतकऱ्यांना दिली पाहिजे. खरे तर माती परीक्षण केंद्रे प्रत्येक जिल्ह्यात आहेत. पाणी परीक्षणाची केंद्रे सुध्दा जिल्ह्यात आहेत. विहिरीच्या पाण्यात असलेल्या क्षारांची तपासणी करुन ते पाणी जमिनीला किती प्रमाणात दिले पाहिजे हे सांगितले जाते. आपण एकदा मोटेचे पाणी सुरु केले की, ते प्रमाणात पाणी जात होते. वाफ्यामध्ये पाणी खेळत असे, त्यानंतर दुसऱ्या वाफ्यात जाऊन दारे धरेपर्यंत शेतकऱ्याला थोडीशी तंबाखू खाण्यासाठी उसंत मिळत होती. आता एकदा मोटर लावून धाडधाड पाणी शेतात जाण्याची सुरुवात झाली आणि शेतकऱ्याला डुलकी लागली तर बांध ओलांडून किंवा वाफा ओलांडून रस्त्याच्या कडेला कोठे पाणी जाते ते कळत नाही.

एक तर पाण्याचा उपसा कसा करावयाचा त्याची शास्त्रीय पध्दत शिकविली जात नाही. खत किती प्रमाणात वापरावयाचे हे शिकवित नाही. मातीचे परीक्षण कसे करावयाचे हे शिकवित नाही. पाण्याचे परीक्षण कसे करावयाचे हे आपण शिकवित नाही. या सगळयाचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर होतो. पर्यायाने शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेवर होतो. शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था कोलमडली असे आपण म्हणतो. एखाद्या वर्षी पाऊस पडला नाही किंवा अतिवृष्टी झाली किंवा दुष्काळ पडला किंवा पूर आला अशा प्रकारच्या कारणांमुळे शेतकरी अडचणीत येतो असे नाही. अनेक वर्षांपासून शेती करण्याच्या रुढी, प्रथा व परंपरा आहेत या सगळया मोडून काढण्याची गरज आहे. यासाठी प्रत्येक गोष्ट गांभीर्याने घेण्याची गरज आहे. सेंद्रिय खत तयार करण्याचा विचार केला तर शेताच्या बांधावरील धसकट, सरपण, गव्हाचा भुसा, ऊसाचे पाचट, ऊसाचे पाचट म्हणजे शेतीच्या अंगावरील पाचट जाळतो म्हणजे शेतीला जाळतो. माती जीवंत आहे, तिच्यामध्ये जिवाणू आहेत. त्यात जिवाणू आहेत म्हणून पीक उगवून येते. कोकणात मी असे पाहिले की, धान पेरले जाते. पण पुढील वर्षी धानाचे पीक घ्यावयाचे असेल तर त्या धानाचा काडी कचरा संपूर्ण जाळून टाकला जातो. ही चुकीची पध्दत असतानाही जाळून टाकला जातो. हा कचरा एकत्रित करुन त्यात सीपीपीचा वापर केला, बीडी 502 बीडी 503, बीडी 504, बीडी 505, बीडी 506 व बीडी 507 चा वापर केला तर गाईच्या शेणापासून खत मिळते, रांगोळीपासून व शेताच्या बांधावर

4.....





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आलेल्या गाजर गवतापासून एवढेच नाही तर बेशरम गवताच्या फोकापासून सुध्दा आपल्याला गवत मिळते. आपला देश इतका श्रीमंत आहे. या खतांचा वापर मोठ्या प्रमाणात केला तर रासायनिक खतांचा तुटवडा भासतो तो भासणार नाही. शेतकऱ्यांनी किमान 50 टक्के रासायनिक व 50 टक्के सेंद्रिय खत वापरले पाहिजे असे त्यांना सांगितले पाहिजे.

आपल्याला शेतात एक कीड दिसली की आपण लगेच रासायनिक खतांची फवारणी करतो. त्याऐवजी धसपटचा अर्क तयार करुन फवारणी केली तर त्यापासून तयार होणारे पीक खाण्यास चांगले असते, शेतातील माती मरत नाही, रासायनिक खतापासून तयार झालेली ज्वारी एक क्विंटल 3 हजार रुपये या दरात मिळते आणि सेंद्रिय खतापासून तयार झालेली ज्वारी 4500 रुपयांपर्यंत लोक विकत घेऊ लागले आहेत. याचे दुष्परिणाम आपण बघत आहोत. आपली पिढी वरचेवर विक होत चालली आहे. त्यांच्यावर नवीन नवीन आजार आघात करीत आहेत. या सगळया गोष्टींचा विचार करावा लागेल. सेंद्रिय खते वापरण्याची सुरुवात केली आणि रासायनिक खते कमी केली किंवा दोन्ही खतांचे प्रमाण 50 टक्के ठेवले तरी आपल्याला खतांचा भासत असलेला तुटवडा कमी होईल.

दुसरी गोष्ट अशी आहे की, शेतकऱ्यांच्या मागणी प्रमाणे शासनाकडून पुरवठा होतो काय, सगळया गोष्टींचा मेळ बसला पाहिजे. शासनाने असे सांगितले की, 25 मे रोजी कापसाची पेरणी करावी. बीटी कॉटनचे वाण असेल, कडकचे वाण असेल, 2 x 1 या अंतराने ही पेरणी करावी असा प्रचार तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, जिल्हा कृषी अधिकारी हे सर्वजण करीत असतात. कृषी आठवडा असतो त्यावेळी ते गावोगावी जाऊन सांगत असतात. आता प्रत्येक जिल्ह्यात प्रगत शेतकरी तयार झाले आहेत. त्यांची दिनांक 25 मे रोजी कापूस पेरण्याची तयारी असते. त्यांना दिनांक 25 मे पूर्वी कापसाचे बियाणे उपलब्ध करुन दिले जाणार आहे काय, त्याच्या गरजे इतके खते दिले जणार आहे काय, बियाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू दिल्या जाणार आहेत काय, जूनपर्यंत खत उपलब्ध करुन दिले नाही तर त्याने दि.25 मे पर्यंत शास्त्रीय पध्दतीने कापूस कसा पेरायचा ? त्याचे एकरी 50 क्विंटल उत्पादन येऊ शकते असा दावा कृषी अधिकारी करीत असतील तर तो योग्य नाही, त्याच्या शेतामध्ये एकरी 2-3 क्विंटलपेक्षा अधिक कापूस येत नाही.

नंतर श्री.गिते......

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

या सगळया गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे.

महोदय,मागणी प्रमाणे खताचा पुरवठा केला पाहिजे. या वर्षाचा रब्बी हंगाम संपण्याच्या आत पुढील वर्षाच्या खरीप हंगामाची तयारी आपण केली पाहिजे. रब्बी पिके पेरण्याची तयारी आपण केली पाहिजे. पुरवठयाप्रमाणे शेतकऱ्यांना खत उपलब्ध करुन दिले पाहिजे. यात सर्वात महत्वाचे म्हणजे प्रशासकीय यंत्रणेवर अंकुश ठेवला पाहिजे. कोल्हापूर येथील खत खाजगी वाहनाने बीडपर्यंत पोहचू शकते. नांदेड येथील खत लातूरपर्यंत पोहचू शकते. अशा पध्दतीने कोणी व्यापारी खताची साठवणूक करीत असेल तर, स्वत:कडे कोणी खत दाबून ठेवत असेल तर ते बरोबर नाही. अशा प्रकारची खताची साठवणूक सरकारी अधिकाऱ्याच्या संगनमताने होऊ शकत नाही. केंद्राकडे जेवढया खताची मागणी केली जाते, तेवढे खत केंद्र सरकारकडून राज्य शासनास उपलब्ध करुन दिले जात नाही. प्राप्त झालेले खत रेल्वे रॅक्समध्ये पडून आहे. गेल्या वर्षी नाशिक येथे रेल्वे रॅक्समधील खत उतरवून घेण्यासाठी हमाल उपलब्ध होऊ शकले नव्हते. बाहेरील हमालांकडून ते खत उतरवून घेण्याचा प्रसंग त्या ठिकाणी आला होता. जे खत प्राप्त होते, ते काळया बाजारात विकले जाऊन कृत्रिम खत टंचाई निर्माण केली जात असेल आणि शेतकऱ्यांना दोन-दोन हजार रुपये क्विंटल या भावाने विकले जात असेल तर शेतकऱ्यांनी जगावयाचे कसे हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या सभागृहात विदर्भाच्या अनुषंगाने चर्चा झाली पाहिजे अशा प्रकारची मागणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केली. त्यांनी केलेल्या मागणीत तथ्य आहे. खरोखरच शेतकऱ्यांना जगवावयाचे असेल तर त्यांना रास्त भावात खते, बियाणे उपलब्ध करुन दिली पाहिजेत. तसेच साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर शासनाने अंकुश ठेवला पाहिजे. तरच राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक दर्जा उंच होऊ शकतो.

सभापती महोदय, राज्यात बियाण्याच्या संदर्भात मोठया प्रमाणात तक्रारी येऊ लागल्या आहेत. कापसाचे बियाणे, सोयाबीनचे बियाणे हे शेतात पेरल्यानंतर उगवतच नाही. पूर्वी शेतकऱ्याने कापूस पेरला तर त्यांच्या कापसाच्या झाडाला 150 ते 200 बोंडे येत होती. परंतु आता कापसाच्या झ ाडास फक्त 25 ते 50 बोंडे येतात. राज्यात खराब बियाणे येऊ नये, तसेच शेतकऱ्यांची

2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

फसवणूक होऊ नये म्हणून त्यावरही शासनाने अंकुश ठेवण्याची निंतात आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना सरकारकडून चांगल्या प्रकारचे बियाणे उपलब्ध करुन दिले पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या पाटामध्ये झुळझुळ पाणी वाहिले पाहिजे, पाण्याचे देखील संवर्धन झाले पाहिजे. पावसाचे पाणी अडविले पाहिजे आणि ते जमिनीमध्ये जिरविले पाहिजे. शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचा लाभ दिला पाहिजे. स्प्रिंकलर योजनेचा लाभ दिला पाहिजे. शेतकऱ्यांसाठी ज्या योजना शासनाने कार्यान्वित केल्या आहेत, त्याचा फायदा त्यांना दिला पाहिजे. शेतकऱ्यांना वेळेवर बियाण्यांचा तसेच खतांचा वेळेवर पुरवठा केला गेला पाहिजे. राज्यात सेंद्रीय खताचा प्रचार केला पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो आणि या विषयावरील माझे मनोगत पूर्ण करते. धन्यवाद.

-------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर ( कृषी व जलसंधारण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी कृषी व जलसंधारण विषयक अतिशय चांगले विचार या सभागृहात व्यक्त केले आहेत. एखाद्या हाडाच्या शेतकऱ्याला शेती विषयक जेवढी माहिती नसेल त्यापेक्षा जास्त माहिती सन्माननीय सदस्या ॲड.दराडे यांना आहे असे मला दिसून येते. ॲड.उषाताई दराडे यांच्यामध्ये एक जीवंत शेतकरी मला दिसून आला. शेत जमिनीचा पोत, शेतकऱ्याला पुरविण्यात येणारे बियाणे, खते, त्यातून त्यांना मिळणारे उत्पन्न इत्यादी बाबी संबंधी त्यांनी अनेक उदाहरणे या ठिकाणी विशद केले. कृषी क्षेत्रामध्ये शेतकऱ्यांनी कशा पध्दतीने कामे केली पाहिजेत, शेतकऱ्यांनी आपल्या शेतीतून उत्पन्न कसे वाढेल या अनुषंगाने अतिशय चांगले अनुभव या ठिकाणी सांगितले. या सभागृहात त्यांनी सेंद्रीय खताच्या बाबतीत उल्लेख केला. सेंद्रीय खताचा वापर मोठया प्रमाणात झाला पाहिजे असेही त्यांनी यावेळी मत व्यक्त केले. रासायनिक खताचा वापर केल्यामुळे शेत जमिनीचे कशा पध्दतीने नुकसान होत आहे, पिकांचे कशा पध्दतीने नुकसान होत आहे. या खताचा वापर केल्यामुळे शेतीतील उत्पन्नाचा उतारा कसा कमी येतो आहे. यासबंधातील चांगली उदाहरणे देऊन भविष्यात सेंद्रीय खतांचा वापर शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात केला पाहिजे अशी मागणी केली. यापुढच्या काळात सेंद्रीय खताचा वापर मोठया प्रमाणात व्हावा म्हणून राज्य शासनाने उचलण्याची आवश्यकता आहे. मी सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांनी सेंद्रीय खताचा वापर मोठया प्रमाणात करावा म्हणून राज्य शासन विशेष लक्ष घालण्याचे काम करीत आहे. यासाठी अधिकाधिक योजना राबविण्याचा तसेच त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे काम राज्य शासनाच्या वतीने करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, माती परीक्षणाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. शेतकरी आपल्या शेतातून उत्पन्न काढतो. परंतु शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी खतांचा वापर करतो. परंतु आपल्या शेतीतील माती कोणत्या पध्दतीची आहे, त्या शेत जमिनीस कोणत्या पध्दतीचे खत लागू पडेल, यासंदर्भातील माहिती शेतकऱ्यांना आतापर्यंत नव्हती. त्याला शेतजमिनीचा पोत माहिती नव्हता म्हणून पिकासाठी टाकलेले खत वाया जात होते. काही वेळेस खताचा जास्त वापर झाला तर त्या शेतकऱ्यांच्या पिकाच्या ॲव्हरेज उत्पन्नावर त्याचा विपरीत परिणाम होत होता. म्हणून माती परीक्षणाच्या बाबतीत राज्य सरकारने गांभीर्याने लक्ष घातलेले आहे. यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर माती परीक्षणाच्या प्रयोगशाळा सुरु केलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. गुलाबराव देवकर...

महोदय, आता तर मागील वर्षांपासून मोबाईल व्हॅन कंपनीच्या माध्यमातून आपण सुरु केली आणि त्या माध्यमातून गावागावात जाऊन माती परीक्षणाचे काम केले जाते. त्यानुसार कोणत्या गावात कोणत्या क्षेत्रातील किती व कोणत्या शेतकऱ्याची जमीन अशा प्रकारची आहे याचा फलक ग्राम पंचायतीच्या नोटीस बोर्डवर आपण लावतो. तसेच कृषी विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम करीत आहोत. आपण असेही सांगितले की, "पाणी अडवा पाणी जिरवा" सारख्या योजना शासनाने मोठ्या प्रमाणात घ्याव्यात. त्या माध्यमातून शासन निश्चितपणे प्रयत्न करीत आहे, जेणेकरुन पाण्याचा वापर पुढील अनेक वर्षेपर्यंत आपल्याला करता येईल. वास्तविक पुढील काळात पाण्याच्या संदर्भात युध्द होऊ शकेल असे म्हटले तरी वावगे होणार नाही अशी परिस्थिती येणार आहे. परंतु यासंबंधीचे नियोजन आपल्याला भविष्यासाठी सुध्दा करणे आवश्यक आहे. आज अशी परिस्थिती आहे की, आमच्या धरणाचे पाणी दुसरीकडे घेतले जाते व शेतीला पाणी कमी पडते. तर काही ठिकाणी औद्योगिक क्षेत्रासाठी पाणी कमी पडते अशा प्रकारे पाण्याची ओढाताणा पुढील काळात होणार आहे. याबाबतीत सुध्दा पाणी अडवा आणि पाणी जिरवा असे अनेक प्रयोग आपण कृषी व जलसंधारण विकास कामाच्या माध्यमातून करीत आहोत.

महोदय, कृषी खात्याच्या माध्यमातून खास करुन पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम, शेत तळ्यांचा कार्यक्रम, विंधण विहिरी घेण्याचे कार्यक्रम राबविण्याचे आपण प्रयत्न करतो आहोत. त्यामुळे सुध्दा पाण्याचा वापर संतुलित पध्दतीने करण्याचे काम केले जाणार आहे.

सभापती महोदय, खते व बियाण्यांच्या मागणीच्या संदर्भात सुध्दा येथे चर्चा झाली. त्या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे चालू वर्षात आपल्या राज्याची रासायनिक खताची खरीपासाठी मागणी 46.35 लाख मे.टन एवढी होती, केंद्र सरकारने आपल्याला 43 लाख मे.टन इतका खताचा पुरवठा केला. महिनानिहाय दिलेले आवंटन 68 लाख एवढे आहे. आणि आपण एकूण पुरवठा 38.61 लाख टन एवढा केला. म्हणजे आवंटनाच्या जवळपास म्हणजे 199 टक्के खत चालू वर्षाच्या हंगामासाठी उपलब्ध करण्यात आले. बीड जिल्ह्याच्या संदर्भात मला अशी माहिती द्यावयाची आहे की, मागील पाच वर्षात सरासरीचा विचार करता 108 टक्के खताचा पुरवठा आपण केलेला आहे. या जिल्ह्यात मागील पाच वर्षात 1,15,014 मे.टन खताचा वापर झाला व त्या प्रमाणात पुरवठा करण्यात आलेला आहे. तीच गोष्ट बियाण्यांच्या बाबतीत सुध्दा आहे. राज्याची बियाण्याची एकंदर

5...

21-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) BB-5

ABG/ प्रथम श्री.खंदारे 16:20

श्री.गुलाबराव देवकर..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मागणी आणि गरज जवळपास 18.35 लाख क्विंटल एवढी होती पण पुरवठा मात्र 20.77 लाख क्विंटल म्हणजेच जवळपास 113 टक्के एवढा करण्यात आला आहे. त्याच पध्दतीने बीड जिल्ह्याबाबत सांगायचे तर या जिल्ह्यात सुध्दा 73 टक्के पुरवठा शासनाने केलेला असून जो पुरवठा केला त्याच्या 95 टक्के विक्री त्या जिल्ह्यात झालेली आहे. त्यामुळे बियाण्यांच्या संदर्भात कोणतीही अडचण निर्माण झाली नव्हती, अत्यंत चांगल्या प्रकारे दोन वर्षांपासून शासनाने नियोजन केलेले आहे. सुरुवातीच्या काळात थोड्याफार प्रमाणात टंचाई निर्माण झाली होती, थोडी ओढाताण झाली होती. त्याबाबतीत तालुका स्तरावर तक्रारी येत होत्या आणि मागणी सुध्दा वाढली होती. त्याची वेगवेगळी कारण म्हणजे सुरुवातीला माथाडी कामगारांचे असहकार आंदोलन, रेल्वेच्या वाहतुकीची मुव्हमेंट वेळेवर होत नव्हती, खत उत्पादक कंपन्यांच्या काही अडचणी अशी अनेक कारणे होती. त्यानंतर मात्र यासंबंधीचे नियोजन करुन चांगल्या प्रकारची सुसूत्रता आणली आणि राज्याला लागणारे खत आणि बियाणे जवळपास 100 टक्के पुरविण्याचे काम मागील दोन वर्षांपासून होत आहे.तसेच नियोजन या वर्षासाठी देखील करीत आहोत. तसेच या पुरवठ्याच्या संनियंत्रणासाठी काही उपाययोजना देखील पुढील काळात शासनाने हाती घेतल्या आहेत. त्यात केंद्र शासनाच्या स्तरावर होणाऱ्या हंगामपूर्व बैठकीत त्यांच्याकडून खत व बियाण्याची मागणी जास्तीत जास्त प्रमाणात मंजूर करण्याचे प्रयत्न तसेच कृषी निविष्ठांची वाहतूक, किंमत आणि दर्जा या सर्व बाबतीतील नियोजनाचा आढावा आणि संनियंत्रण करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केलेली आहे....

यानंतर श्री.भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:30

श्री.गुलाबराव देवकर..........

त्यामध्ये शेतकऱ्यांच्या वारंवार तक्रारी येतात, सूचना येतात आणि त्यांच्या ज्या अडचणी असतील त्या सोडविण्याचे काम निश्चितपणे केले जाते. चालू वर्षामध्ये आगाऊ नोंदणी करण्याचा प्रयोग करण्यात आला.

औरंगाबाद जिल्हयाचे अधीक्षक कृषी अधिकारी यांनी एक प्रयोग केला. त्यांनी उत्कृष्ट संकल्पना राबविली आहे. एका भागातील 100 ते 150 शेतकऱ्यांनी एकत्रितपणे येऊन खतांची नोंदणी करुन मागणी करायची. संबंधित तालुक्याच्या कृषी अधिकाऱ्याकडे मागणी नोंदविल्यानंतर अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांकडे एकत्रितपणे त्या खताची किंमत चलनाद्वारे भरायची आणि ती खताची डिमांड एमएआयडीसी वा मार्केटिंग फेडरेशनमार्फत डायरेक्ट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवायची असा प्रयोग औरंगाबादमध्ये राबविण्यात आला. हा प्रयोग राज्यात प्रत्येक जिल्हयामध्ये राबविता येईल काय हे पाहणार आहोत. एजंट किंवा लहान विक्रेते यांची साखळी कमी करुन कमी कालावधीत लवकरात लवकर खतांचा पुरवठा करता येईल आणि इतर खर्च कमी होईल. या संदर्भातील प्रयत्न येत्या वर्षात सुरु करणार आहोत.

शेतकऱ्यांच्या कृषी निविष्ठा आणि इतर प्रश्नाबाबत टोल फ्री नंबरची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांनी सूचना केल्या आहेत, त्या सूचनांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला. राज्यात कृषी निविष्ठांचे योग्यप्रकारे वितरण आणि गुणवत्ता तपासण्यासाठी 396 भरारी पथके स्थापन केली आहेत. त्याचप्रमाणे गुण नियंत्रण कार्यवाहीच्या अहवालाची माहिती घेतली तर कृषी क्षेत्रातील गैरव्यवहार कमी झाले पाहिजे, गैरव्यवहारांना आळा बसला पाहिजे आणि खतांचा पुरवठा व्यवस्थित झाला पाहिजे, शेतकऱ्यांची फसवणूक होता कामा नये, त्यांना चांगली बियाणे आणि खते मिळाली पाहिजेत यासाठी सुध्दा संबंधित वितरकांवर व कंपन्यांवर वचक राहिला पाहिजे. या दृष्टीने निश्चितपणे धडक कारवाई केली जाईल. या संदर्भात संपूर्ण राज्यात 162 खटले दाखल केले आहेत. 336 परवाने निलंबित केले असून 276 परवाने रद्द केले आहेत. 3643.50 टन खताचा साठा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत 389 लाख इतकी आहे. एकंदरीत राज्यात खतांचा आणि बियाण्यांचा पुरवठा सुसूत्र पध्दतीने होण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करीत आहे. मी माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचे स्वागत करतो आणि निश्चितपणे सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जाईल एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी अर्धातास चर्चेच्या माध्यमातून अतिशय सखोल आणि अभ्यासपूर्ण विवेचन केले. शासनाकडून जे उत्तर देण्यात आले त्या उत्तरातील आकडेवारी विचारात घेतली तर असे ध्वनित होते की, खतांचा पुरेसा आणि वेळेवर पुरवठा होत आहे. असे असेल तर शेतकऱ्यांच्या समस्या का सुटत नाहीत? हा मूलभूत प्रश्न तसाच अनुत्तरित राहतो. दोन्ही सदनातील बहुतेक सदस्य दूरदर्शनवरील बातम्यांवर विशेष लक्ष ठेवून असतात. सकाळच्या बातम्या ऐकावयाच्या असतील तर बातम्यांपूर्वी बहुतांश वाहिन्यांवर शेतकरी आणि शेतीसंबंधी कार्यक्रम सुरु असतात. असे कार्यक्रम जेव्हा आपण बघतो तेव्हा कितीतरी उपयुक्त अशा गोष्टी जे प्रयोगशील शेतकरी करतात त्या शेतकऱ्यांचे अनुभव त्या कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्यासमोर येतात. जर एक सर्वसामान्य शेतकरी असे प्रयोग करु शकतो तर त्या कार्यक्रमाचे एकत्रीकरण करुन राज्य शासन किंवा कृषी विद्यापीठे या संदर्भात लक्ष का घालत नाहीत?

सभापती महोदय, बियाणे आणि खते या नाशिवंत वस्तू नाहीत. शेती उत्पादनासाठी आवश्यक असलेला तो पुरवठा आहे. सेल्फ लाईफ स्वरुप निदान रासायनिक खतांबाबत तरी नाही. दरवर्षी असे चक्र फिरवित असताना ते आज सुरु करता येणार नाही का? मंत्री महोदयांनी भरारी पथकाची आकडेवारी सांगितली. या व्यवस्थेमध्ये दोष निर्माण झाल्यामुळेच भरारी पथकांची निर्मिती करावी लागली हे नाकारता येणार नाही. प्रत्येक वेळी भरारी पथकांवर अवलंबून राहण्यापेक्षा या व्यवस्थेमध्ये असलेले मूलभूत दोष दूर करण्यासाठी शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. सेंद्रीय खताच्या वापराबाबत आकडेवारी देण्यात आली. सेंद्रीय खताचा वापर होण्यासाठी आणि तयार करण्यासाठी लागणारे आवश्यक पशुधन आहे का? विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्हयामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना गायी व म्हशीचे वाटप करण्यात आले. राज्यातील पशुधनाची अवस्था आणि त्या दृष्टीने मिळणारे खत याचाही आढावा घेण्याची गरज आहे. शेतकऱ्यांना पूरक म्हणून अधिक चांगल्याप्रकारे पशुधन कसे देता येईल, त्याची निगराणी कशी राखता येईल आणि त्या माध्यमातून खताचा वापर करण्यासाठी उद्युक्त कसे करता येईल या गोष्टींचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे. बियाणे आणि खतांचा योग्य किंमतीत पुरवठा होत असेल तर ती समाधानाची बाब आहे. परंतु व्यवस्थेत कुठेतरी बिघाड आहे त्याकडे लक्ष द्यावे अशी विनंती या निमित्ताने करतो.

---

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : माध्यमिक शाळातील शिक्षकांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरणे

**मु. शी.** : माध्यमिक शाळातील शिक्षकांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील माध्यमिक, प्राथमिक व उच्च माध्यमिक खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांना १९८१ ची नियमावली लागू असणे, कर्मचारी या संज्ञेत प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांचा समावेश होतो, माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ/निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन शासन निर्णय काढला आहे, या शासन निर्णयातून प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांचे शिक्षक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व प्राथमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचारी वगळण्यात आले आहेत, प्राथमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक तसेच सर्व विभागीय शिक्षकेतर कर्मचाऱ्यावंर अन्याय झाला आहे, शासन निर्णयाचा लाभ सर्वांना देण्याचे मान्य करुनही सुधारित शासन निर्णय अद्यापही काढला नाही. सर्व विभागातील शिक्षकेतरांना व प्राथमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांना वंचित ठेवले आहे, एक वर्षापूर्वी पुढील अधिवेशनापूर्वी आदेश काढण्याचे मान्य करुनही कार्यवाही नाही, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, याच विषयाच्या संदर्भात तीन अधिवेशनांपूर्वी मी या सभागृहात चर्चा उपस्थित केली होती आणि त्या चर्चेला उत्तर देताना शासनाने मला हेच उत्तर दिले होते की, हा प्रश्न विचाराधीन आहे. राज्यामध्ये काही शाळा अनुदानित आणि काही शाळा विनाअनुदानित आहेत. शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. काही शिक्षकांना अनुदानित शाळेतून निवृत्त होताना विनाअनुदानित शाळेत सेवा केली असेल मग ती प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळेतील सेवा असेल किंवा शासकीय कार्यालयात केलेली सेवा असेल आणि त्यानंतर

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षक म्हणून निवृत्त झाल्यास ही सगळी पूर्वीची सेवा निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात यावी, ग्रॅच्युईटीसाठी ग्राह्य धरण्यात यावी असा शासनाने निर्णय घेतला. दुर्दैवाने विनाअनुदानित शाळेत सेवा केलेल्या शिक्षकांना समय वेतनश्रेणीमध्ये 12 वर्षानंतर वरिष्ठ श्रेणी किंवा 24 वर्षानंतर निवड श्रेणी अनुज्ञेय आहे, ती ग्राह्य धरली जात नव्हती.

सभापती महोदय, या संदर्भात या सभागृहाचे ज्येष्ठ माजी सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, प्रा.वसंतराव खोटरे यांनी देखील सातत्याने या विषयाचा गेली 7-8 वर्षे पाठपुरावा केला होता. या सभागृहात अतिशय गंभीर वातावरणात चर्चा झाल्यानंतर शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आणि दिनांक 28 नोव्हेंबर, 2006 रोजी शासनाने जी.आर.काढून विनाअनुदानित शाळांमधील सेवा वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात यावी असा निर्णय घेतला. या घटनेला सहा वर्षे झाली आहे. जी.आर.काढताना शासनाने त्यामध्ये शिक्षकांवर अन्याय केला. हा जी.आर. फक्त मर्यादित घटकांसाठी लागू केला.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.........

माध्यमिक शिक्षकांसाठी हा 28 नोव्हेंबर, 2006 चा जी.आर. काढलेला आहे. म्हणजे तत्वत: हे मान्य करण्यात आले आहे, तसा न्यायालयाने सुध्दा निर्णय दिलेला आहे की विना अनुदानित सेवा सर्व प्रयोजनासाठी ग्राह्य धरावी. मग जो जी.आर. माध्यमिक शिक्षकांसाठी काढला त्याप्रमाणे प्राथमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शिक्षक जे अनुदानित संस्थांमध्ये काम करणारे आहेत ते शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचाही या जी.आर. मध्ये समावेश करणे अपेक्षित होते. दुर्दैवाने संबंधित अधिकाऱ्याने दुर्लक्ष करुन केवळ एकाच घटकासाठी हा जी.आर. काढला आणि त्याच संस्थेत काम करणाऱ्या इतरांना मात्र वंचित ठेवले. हा विषय सातत्याने सभागृहात उपस्थित करण्यात येत आहे तरीही शासन याबाबत विचार करीत नाही. मला खेद आणि खंत सुध्दा वाटते की, एखादा विषय किती वेळा सभागृहात उपस्थित करावा किंवा मांडावा याला सुध्दा मर्यादा असणे आवश्यक आहे. अनेक वेळा आणि अलीकडची दोन तीन उदाहरणे मी देणार आहे. त्यानुसार 19.4.2010 रोजी सभागृहात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय मांडला असता शासनाच्या वतीने माननीय राज्य मंत्री महोदया यांनी असे सांगितले होते की, यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर गेलेला आहे. त्यानंतर तातडीने हा निर्णय घेण्यात येईल.

महोदय, वास्तविक याच विषयासाठी माननीय राज्य मंत्री या मंत्रीपदावर जाण्यापूर्वी आमच्या बरोबर शिक्षकांसाठी संघर्ष करीत होत्या. सुदैवाने आता स्वत: त्या मंत्रीच असल्याने त्यांना आता तो अधिकार प्राप्त झालेला आहे. ज्या शिक्षकांच्या अधिकारासाठी मंत्री महोदया अगोदर प्रयत्न करीत होत्या ते अधिकार आता त्यांना मिळाल्याने तातडीने लक्ष घालून हा निर्णय त्यांनी घ्यावा अशी मी विनंती करतो. त्यानंतर दि. 13 डिसेंबर रोजी पुन्हा सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे यांनी सभागृहात हाच प्रश्न उपस्थित केला असता त्याला उत्तर देताना हा विषय मंत्रिमंडळासमोर गेला होता पण त्या प्रस्तावात काही त्रुटी निघाल्या, त्यांची पूर्तता करुन लवकरात लवकर पुन्हा मंत्रिमंडळासमोर जाऊन निर्णय घेण्यात येईल असे ठोस आश्वासन मंत्री महोदयांनी दिले होते. तसेच न्यायालयाचा निर्णय आपल्यासमोर आहे. शासनाने न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर जे लोक न्यायालयात गेले होते त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याची मान्यता ताबडतोब देऊन टाकली. प्रत्येक शिक्षक यासाठी न्यायालयात जाऊन दहा-पंधरा हजार रुपये खर्च करु शकत नाही. कारण असे हजारो शिक्षक आणि हजारो शिक्षकेतर कर्मचारी आहेत. या

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्वांचा विचार करुन विना अनुदानित सेवा ही सर्व प्रयोजनासाठी ग्राह्य धरावी अशी न्यायालयाने जी अनिवार्यता लावलेली आहे तो निर्णय सर्वच शिक्षकांना लागू होतो, मर्यादित घटकासाठी लागू होत नाही. असा स्पष्ट निकाल असताना केवळ न्यायालयात गेलेल्यांनाच ही वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात आल्यानेच हा 13 डिसेंबरचा विषय सभागृहात उपस्थित झाला होता.

महोदय, याच विषयाच्या अनुषंगाने दि. 22 मार्च, 2011 रोजी पुन्हा सभागृहात मुद्दा मांडण्यात आला असता मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगितले होते की, नागपूरच्या अधिवेशनात मंत्री महोदयांनी यासंदर्भात आश्वासन दिले होते असे राज्य मंत्र्यांनी उत्तरातून सांगितले होते. त्यानुसार आता फाईल मुव्ह झालेली असून त्यासंबंधीचा निर्णय कॅबिनेटच्या बैठकीत होणार आहे. त्यासाठी ही फाईल मुव्ह करण्यात आली व त्यात काही त्रुटी वित्त विभागाने काढल्या आहेत. सध्या ही फाईल प्रोसेसमध्ये आहे. ही बाब आर्थिक बाबीशी निगडित असल्यामुळे लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर जाऊन या विषयावर निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते. म्हणजे वर्षानुवर्षे हा विषय सभागृहात मांडत असल्याने आता सुध्दा मंत्री महोदयांनी "ही फाईल मुव्ह झालेली आहे, ही फाईल प्रोसेस मध्ये आहे, वित्त विभागाने यात त्रुटी काढल्या होत्या, त्रुटींची पूर्तता करुन पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात येईल" अशा प्रकारची उत्तरे न देता यासंबंधीचा निर्णय या अधिवेशन कालावधीत घेणे शक्य नसले तरी किमान पुढील 15 दिवसात, एक महिन्यात घेण्यात येईल असे आश्वासन द्यावे अशी माझी विनंती आहे. केवळ असत्य आश्वासने देऊन आमची व सभागृहाची दिशाभूल मंत्री महोदयांनी करु नये. किंवा हा प्रस्ताव विचाराधीन आहे, मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव गेला पण त्यात त्रुटी होत्या अशा प्रकारची उत्तरे न देता पुढील 15 दिवसात यासंबंधीचा जी.आर. काढून उर्वरित प्राथमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सुध्दा हा जी.आर. लागू होईल असे ठोस आश्वासन द्यावे आणि पुन्हा हा विषय सभागृहात उपस्थित करण्याची संधी देऊ नये अशी अपेक्षा करतो. मंत्री महोदया या स्वत: प्राध्यापक आहेत, त्यांच्याही संस्था आहेत, शिक्षकांसाठी त्या सुध्दा लढलेल्या आहेत, याच सभागृहात आमचे नेतृत्व त्यांनीच केले आहे. आता हा चेंडू त्यांच्याच कोर्टात असल्याने त्यांनी तत्काळ निर्णय घ्यावा असा सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मी त्यांना विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहात वारंवार हा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. दि. 28 नोव्हेंबर, 2006 च्या शासन निर्णयानुसार माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत निर्णय झालेला आहे. पण शासनामध्येच असलेला एक संवर्ग, कर्मचारी वर्ग यांच्यामध्ये भेदभाव करता येणार नाही आणि असा भेदभाव केला तर ते नैसर्गिक न्यायाला धरुन होणार नाही. प्रश्न फक्त या जी.आर. मधील विसंगती दूर करण्यापुरताच मर्यादित असून त्यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक प्रश्न निर्माण होत नाही. केवळ विना अनुदान काळातील सेवा ग्राह्य धरण्यापुरताच हा विषय आहे. तसेच कोर्टापुढे असे लिहून दिलेलेच आहे की, आर्थिक परिस्थितीशी निगडीत असल्याने हा निर्णय घेता येत नाही म्हणजे शासनाने स्वत:चे पैसे वाचविले पण जे शिक्षक दहा-दहा वर्षे एका संस्थेत काम करीत आहेत त्यांचे सातत्य नाकारण्याचा हा प्रकार आहे. अशा प्रकारे शासनाला एकाच संस्थेतील दोन शिक्षकांमध्ये भेदभाव करता येणार नाही म्हणून पूर्वलक्षी प्रभावाने जे शिक्षक विना अनुदानित संस्थेत काम करीत होते त्यांच्या सेवेचे सातत्य त्यांना देणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी आणि ग्रॅच्युईटी व पेन्शनचा फायदा होऊ शकेल. अशा प्रकारे शासनाने अशा संस्था अनुदानात आणल्यानंतर त्याच संस्थेत पूर्वीपासून काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांचा न्याय नाकारणे म्हणजे त्यांच्या आयुष्याची माती करण्यासारखे आहे. हायकोर्टाने अलिकडच्या काळात पेन्शन आणि जी.पी.एफ. च्या संदर्भात निर्णय दिला आहे त्यात शिक्षण सेवकांना जो न्याय दिला तोच न्याय विना अनुदानित काळात काम केलेल्या शिक्षकांना सुध्दा देऊन त्यांनाही पेन्शन आणि जी.पी.एफ. चे खाते उघडता आले पाहिजे असा सुस्पष्ट निर्णय उच्च न्यायालयाने अनेक केसच्या बाबतीत दिलेला आहे. त्यामुळे हा प्रश्न आता राहिलेलाच नाही, केवळ इतकीच अडचण शिल्लक आहे की, शासनाने काढलेल्या जी.आर. मध्ये दुरुस्ती करावी, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-------

.....4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न नेहमीप्रमाणे सभागृहात उपस्थित केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ते व इतर आमदार महोदय हा प्रश्न सभागृहात उपस्थित करीत आहेत. शासनाने 28 नोव्हेंबरच्या जी.आर. मध्ये अनेक चुका केलेल्या आहेत. त्यात फक्त माध्यमिक शिक्षकांसाठी वरिष्ठ व निवडश्रेणी वेतनश्रेणी देण्याचे मान्य केले पण त्याच संस्थेत काम करणारे प्राथमिक, उच्च माध्यमिक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा मात्र त्यात उल्लेख केला नाही, ती दुरुस्ती करुन घ्यावी. एकाच संस्थेतील हे सर्व कर्मचारी असल्याने त्यांच्यावर अन्याय होणार नाही यासाठी ही दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे ...

सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची संख्या फार अल्प आहे. 543 कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी कोर्टात गेले व तेथून ते जिंकून आले. यासंदर्भात मागील आठवडयात मंत्रीमहोदयांनी सांगितले की, 543 शिक्षकेतर कर्मचा-यांना वैयक्तिक लाभ दिले जाणार आहेत. जसा आपण माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला आहे तसाचा तसा निर्णय यांच्यासाठी सुध्दा घेण्यात यावा, तसेच यासंदर्भातील निर्णय हे अधिवेशन संपण्याच्या आत काढला जाईल याची माहिती अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून सभागृहाला देण्यात यावी अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेला समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. या अर्धा तास चर्चेतील मूळ विषय शासनाच्या धोरणांचा आहे. शासन मालक या नात्याने वागते की, पालक या नात्याने धोरण ठरवते याबाबतचा आहे. अशासकीय, मान्यताप्राप्त शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा एकाच कायद्याच्या अंतर्गत असतांना माध्यमिक शाळेतील शिक्षकांना वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी देतांना एक न्याय व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बाबतीत वेगळा न्याय हे वागणे शासनाला शोभणारे नाही. शासन मालक नसून पालक आहे. पाल्याच्या संदर्भात दुजाभाव करणे अशोभनीय आहे.

शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षकांना वरिष्ठ आणि निवड वेतनश्रेणी देतांना वेगवेगळया अटी लावण्यात आल्या आहेत. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टाईम बाऊंड प्रमोशनच्या नावाने वरिष्ठ वेतनश्रेणी ही प्रमोशन समजून नोशनल इन्क्रीमेंट देण्यात आली व त्यामध्ये कोणतीही अट ठेवण्यात आली नाही. मात्र शिक्षक कर्मचा-यांच्या बाबतीत वेगवेगळया अटी ठेवण्यात आल्या आहेत. प्रशिक्षण, शैक्षणिक अर्हता वाढविण्याची अट ठेवण्यात आलेली आहे. निवड श्रेणी केवळ 20 टक्के लोकांना देण्याची अट आहे. वरिष्ठ आणि निवड वेतनश्रेणी देण्यामागील कारण त्यांना पदोन्नतीची संधी नाही . त्यामुळे 12 वर्षानंतर कोणतीही अट न लावता वरिष्ठ वेतनश्रेणी पदोन्नती समजून दिली पाहिजे व 24 वर्षाच्या सेवेनंतर निवड वेतनश्रेणी सरसकट सर्वांना विनाअट दिली गेली पाहिजे व शासनाने पालक म्हणून धोरण ठरवावे व धोरण ठरवतांना दुजाभाव करुन नये एवढेच मी या अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने सांगू इच्छितो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ): सभापती महोदय, 28 नोव्हेंबर, 2006 च्या जीआरला सहा वर्षाचा कालावधी लोटला आहे. या विषयाच्या संदर्भात एकंदर किती आर्थिक बोजा शासनावर पडणार आहे याबाबत माहिती संकलित केली गेली आहे आता फक्त या विषयाच्या संदर्भात निर्णय घ्यावयाचा आहे. या विषयाच्या संदर्भात शासन सकारात्मक निर्णय देणार आहे असे गृहीत धरुन मी माननीय मंत्रीमहोदयांना एक प्रश्न विचारु इच्छितो की, 20 जुलै, 2009 रोजी कायम विनाअनुदानित शाळांचा "कायम" शब्द काढलेला आहे. त्यामुळे या शाळांनाही लाभ दिला जाणार आहे काय ?

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू.जमा (विधानसभेने निवडलेले): सभापति जी, यह प्रश्न हमारे शिक्षक माननीय सदस्यों ने यहां पर बहुत बार उपस्थित किया है. माननीय मंत्री जी को मेरा बहुत ही छोटा सा सुझाव है कि माध्यमिक शिक्षकों को यदि आपने वेतन श्रेणी लागू की है और वह वेतन श्रेणी आपने उच्च माध्यमिक और प्राथमिक शिक्षकों के लिए लागू नहीं की है तो यह ठीक नहीं है. उन शिक्षकों की संख्या कितनी है और उसका फायनेंशियल इंपलीकेशन कितना है, उसकी सही जानकारी मेरे पास नहीं है. लेकिन उसका फायनेंशियल इंपलीकेशन यदि बहुत ज्यादा नहीं है तो माननीय सदस्य की बात बहुत वाजिब है. मेरा कहना है कि सर्विस कंडीशन्स में बहुत ज्यादा फर्क नहीं होना चाहिए. इसलिए मेरा कहना है कि वह डिसक्रिमिनेशन दूर करने का निर्णय शासन को लेना चाहिए. हमारे जो शिक्षक सेवक सन् 2000 के बाद के हैं उनका आप अलग ग्रुप बनाइए और जो शिक्षक उससे पहले के हैं, जो शिक्षक सन् 1981 के सर्विस कंडक्ट रुल से गाइड होते हैं उनका ग्रुप आप अलग बनाइए. किन्तु मेरा कहना यह है कि सबकी सर्विस कंडीशन एक कीजिए. उनकी वेतन श्रेणी अलग हो सकती है, प्राथमिक शिक्षक, माध्यमिक श्क्षिक तथा उच्च माध्यमिक शिक्षकों की वेतन श्रेणी में फर्क हो सकता है. लेकिन सर्विस कंडीशन एक होनी चाहिए, ताकि जो टीचिंग और नॉन टीचिंग स्टाफ है उनको पेंशन इत्यादि चीजों में उसका फायदा मिल सके. इसमें फायनेंशियल इंपलीकेशन कितना है उसकी जानकारी मेरे पास नहीं है लेकिन मुझे कहना है कि यदि उन लोगों को नोशनल फायदा भी होता है तो उसका फायदा उनको नयी वेतन श्रेणी के हिसाब से दिया जाना चाहिए.

---

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ( महिला व बालविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, वरिष्ठ व निवड श्रेणी विनाअनुदानित शाळांमध्ये लागू करण्याच्या बाबतीतील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी ही अर्धा तास चर्चा उपस्थित केली असून या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, वसंतराव खोटरे, नागो गाणार, भगवान साळुंखे यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत व सर्वांनी या विषयाच्या संदर्भात खूप आग्रही भूमिका घेतलेली आहे.

सर्व समाज घटकांना न्याय मिळवून देणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. आता सन्माननीय सदस्यांनी जी भूमिका घेतली आहे तीच भूमिका आमदार असतांना मी घेतली होती. सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे याबाबत कोणाचेही दुमत असणार नाही. या प्रश्नाच्या संदर्भात अनेक स्तर असून त्या सर्वांचा निर्णय झाल्यांनतर अंतिम निर्णय कॅबिनेट घेत असते. फायनान्शिअल इम्प्लीकेशनच्या अनेक बाजू असतात. त्यामुळे सर्व बाजूंचा वेगवेगळया स्तरावर अभ्यास केला जातो. शासनाला ही बाब मंजूर करावयाचीच नाही, जाणून बुजून हा विषय पेंडीग ठेवला जात आहे असे काही नाही. या विषयाच्या संदर्भातील फाईल आता कोठे आहे त्याचा मी या ठिकाणी उल्लेख करणार नाही. या विषयाच्या संदर्भात शासनाची भूमिका सकारात्मक आहे. या विषयाच्या संदर्भात लोक कोर्टात गेले असून कोर्टासमोर सुध्दा शासन आपली भूमिका योग्य पध्दतीने मांडणारच आहे. इंग्रजीमधील एक म्हण मला या ठिकाणी सांगावाशी वाटते. "The duck looks very smooth and calm on the water but below the water there is intense restless paddling." त्यामुळे वरुन सर्व काही स्मूथ जरी दिसत असले तरी पाण्याच्या खालच्या परिस्थितीचा सुध्दा आपल्या विचार करावा लागत असतो. या विषयाला उशीर लागत असला तरी या प्रस्तावाला मंत्रिमंडळाच्या समोर ठेवल्याशिवाय आपल्याला दुसरा पर्याय नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी तसेच मी जे आश्वासन दिलेले आहे ते आश्वासनच या विषयाच्या संदर्भात सकारात्मक भूमिका स्पष्ट करीत असते. या विषयाच्या संदर्भात तुम्ही जसे आग्रही आहात तेवढेच आम्ही सुध्दा या विषयाच्या संदर्भात आग्रही आहोत. शिक्षणाच्या संदर्भात शासनाने अनेक सकारात्मक निर्णय घेतलेले आहेत. परंतु शासनामध्ये काम करीत असतांना मंत्री महोदय, एकदा

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

सभागृहात आले की, त्यांना गोल किपरचे काम करावे लागत असते. गोल किपरने किती गोल वाचवले हे कोणी बघत नाही परंतु जो गोल मिस झालेला असतो तोच लक्षात राहत असतो. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शासन नकारात्मक विचार करीत आहे असे आपण कृपया समजू नका.

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान....

परंतु मी या सभागृहामध्ये एवढेच सांगू इच्छिते की, हा प्रश्न माझ्या स्तरावरील नसून शासन म्हणून या बाबतीत अनेक बाजूंनी विचार करुन निर्णय घेणे आवश्यक आहे, तो घेण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मिस झालेला गोल बरोबर लक्षात राहतो याचे चांगले उदाहरण दिले आहे. ते उदाहरण देत असतांना मंत्री महोदयांनी त्यांची अडचण या ठिकाणी सांगितली आहे. परंतु हा गोल होणे अपेक्षित होते तो करण्याचा आपण प्रयत्न करीत आहात. प्रत्येक वेळी चेंडू डी मधून आतमध्ये जातो त्यावेळी तो गोल करण्याचाच प्रयत्न असतो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आदरणीय मंत्री महोदयांनी खूप चांगले उत्तर दिले आहे. त्या प्राचार्य आहेत, प्राध्यापक आहेत, हुशार आहेत त्यामुळे त्यांनी एका चांगल्या विचारवंतासारखे उत्तर दिले आहे. परंतु त्यांची व शासनाची भूमिका हे देण्याच्या बाबतीत पॉझिटीव्ह जरी असली तरी आपापल्या विभागामध्ये त्याचा पाठपुरावा करुन ते प्रश्न सोडवून घेण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, जरी हा विषय मंत्री मंडळासमोर जाण्याची प्रक्रिया सुरु असली तरीसुध्दा गेल्या सहा वर्षापासून प्रलंबित असलेला शिक्षकांचा हा अत्यंत जिव्हाळयाचा विषय सातत्याने या सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला आहे. या बाबतीत आपण वित्त विभागाची अडचण सांगितली असली तरी वित्त विभागाशी संपर्क साधून, वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करुन हा विषय लवकरात लवकर मंत्री मंडळासमोर कसा येईल आणि त्याला मंजुरी कशी मिळेल यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी माझी आपणास विनंती आहे. या संदर्भात मंत्री महोदयांनी आम्हाला आश्वासित करावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, त्या दृष्टीकोनातून निश्चितपणे प्रयत्न केले जातील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे)** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 22 डिसेंबर, 2011 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

सकाळी 10.00 ते 10.45 वाजेपर्यन्त विशेष बैठक होईल. या बैठकीमध्ये महाराष्ट्र विधान परिषद नियम 97 अन्वये "राज्यात कुपोषणाने झालेले मृत्यू" या विषयावर चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर सकाळी 11.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 02 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 22.12.2011 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही